# शब्द रुची

जानेवारी २०१४ • मूल्य १० रुपये

साहित्य संमेलन विशेषांक



## नेल्सन मंडेला - एक युगांत

हेमा साने लिखित 'बुद्ध परांपरा आणि बोधिवृक्ष' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. म.के. ढवळीकर यांच्या हस्ते झाले. सोबत अन्य मान्यवर मंडळी




'ग्रंथाली' वाचकदिनी रंगला परिसंवाद...

## आमचं जग - आमची भाषा




परिसंवादात सहभागी स्वाती पेंडसे, धर्मकीर्ती सुमंत, रवी जाधव, अतिशा नाईक, कौशल इनामदार, अंबर हडप, इरावती कर्णिक, फुलवा खामकर आणि वीणा जामकर

# वाचकदिन क्षणचित्रे



सतीश काळसेकर यांचा
साहित्य अकादमी पुरस्कारानिमित्त
प्र.ल. मयेकर यांच्या हस्ते सत्कार



डॉ. लतिका भानुशाली
निवेदन



उषा तांबे



सतीश काळसेकर



प्रा. व्ही.एन. मगरे



प्र.ल. मयेकर



संगीता धायगुडे यांच्या
'हुमान' पुस्तकाचे प्रकाशन





उमेश कदम यांच्या
'शापित भूमी' पुस्तकाचे प्रकाशन





रवींद्र रुक्मिणी आणि अनुराधा मोहनी अनुवादित
'गुलाजारांच्या कविता' पुस्तकाचे प्रकाशन





सुलभा कोरे यांच्या
'स्पर्श हरवलेले' पुस्तकाचे प्रकाशन



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

जानेवारी २०१४, वर्ष १
अंक आठवा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : अरुण जोशी
मुखपृष्ठ व मांडणी : योगिता मोरे

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**
granthalisales@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठा–समान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

जमाना कसा बदल रहा है याचं प्रत्यंतर दिल्लीतील निवडणुकीत आलं. तिथल्या आम आदमीनं हातात झाडू घेतला आणि राजकारण स्वच्छ करायला सुरुवात केली. 'रोम' आदमी आणि 'राम' आदमींना दणका देऊन आम आदमी सक्रिय झाला. बऱ्याच वर्षांनी शीला दीक्षितांनी गृहिणी होऊन अंगण झाडण्याचा आनंद घेतला असावा. राहुल बाबा आणि पृथ्वीराज बाबा हाती झाडू घेतात का ते पाहायचं. चार राज्यांच्या पानिपतानंतर मनगटावर बांधलेलं घड्याळ वाजू लागलं आणि 'टिक टिक वाजते डोक्यात, धडधड वाढते कानात' अशी सध्या काँग्रेसची स्थिती आहे. वळवाचा पाऊस पडतो आणि पुढे दुष्काळ येतो असा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे आम आदमी बरसणार की पहिले पाढे पंचावन्न होणार हे मे महिन्यातील निवडणुकांत समजेल. दिल्ली अब दूर नहीं!

हा आदमी; विशेषत: तरुण पिढी सजग होताना दिसते आहे. त्यांची दखल केवळ राजकारणातच दुर्लक्षित होती, ती घ्यावी लागणार आहे. बाकी क्षेत्रांत ती बिनधास्त व्यक्त होत आहे. त्यांना त्यांची भाषा जपणारं जग हवं आहे. त्यात असलेली सूचकता आता टाळता येणार नाही.

पंडितमैत्री आणि सभेत संचार केल्यानं बुद्धिचातुर्य वाढतं हा विचार प्राचीन झाला. आता तंत्रज्ञानानं घरात पंडित आला आणि माणसाची एकेक विंडो उघडली गेली. तो रेटाच आला, कवाडं बंद करणं अशक्य होईल असा. त्यातून आधी गळली ती समाधानी वृत्ती. भौतिक जगणं आमूलाग्र बदलू लागलं. बदलत्या सिव्हिलायझेशनचा परिणाम संस्कृतिबदलात घडू लागला. जगण्याला वेग आला नि विचारांचा कालवा उठला. त्यात बदलते सामाजिक संदर्भ आले आणि जीवनरीत मोकळीढाकळी होत गेली. सार्वकालिक राहिली ती सोय, उत्थानासाठी. बदलाचा हा प्रभाव टिपणारं साहित्य सुरुवातीला गोंधळलं. गेल्या तीस वर्षांतला हा ट्रान्झिट काळ होता. नेमकं आकलन नव्हतं. अलिकडे मोकळेढाकळेपणाला विचार मिळू लागला. नव्या वास्तवाला नव्यानं भिडण्याचं धैर्य आलं. समाजही हळूहळू नव्या वास्तवात रुळू लागला आणि त्याच्या प्रभावाचा स्वीकार साहित्य, नाट्य, सिनेमा आणि संगीत ही माध्यमं करू लागली. त्यांना त्यांची स्पेस गवसली. बदलात संघर्ष बोथट होत गेला कारण त्याची गती आणि एकमेकांच्या स्पेसला समजून घेणं अपरिहार्य झालं. अत्याधुनिक विचार म्हणजे स्वैराचारच नाही, हे सांगताना तरुणाईनं आवश्यक तो इतिहासाचा पदर धरला आणि जीवनाचं वस्तुनिष्ठ चित्रण सुरू झालं. आजचं साहित्य, नाटक व सिनेमा आणि संगीत काय नवीन घेऊन येत आहे, त्यातल्या सर्जकांना काय मांडायचं आहे हे समजून घेण्यासाठी वाचकदिनी 'आमचं जग, आमची भाषा' हा परिसंवाद रंगला. हा कर्मठपणा गळून पडत असलेल्या काळाचा घेतलेला वेध होता.

कार्यक्रमाचा वृत्तांत त्याच्या सूत्रधार स्वाती पेंडसे यांनी लिहिला आहे. भारतरत्न नेल्सन मंडेलांच्या आठवणी जागवणारा विजय नाईक यांचा लेख, अरुण काकडे यांची मुलाखत आणि एकूणच साहित्यविश्वाची खबर घेणारे लेख अंकात आहेत.

'ग्रंथाली' चाळिशीत पदार्पण करते आहे. सर्वमान्य ठरलेली, अजूनही आपली वाटणारी आणि तीही साहित्यक्षेत्रातली ही बहुधा एकमेव चळवळ स्वातंत्र्योत्तर भारतात असावी. ७४ साली तिचा आरंभ झाला. लोक सामील होत गेले. हा कारवाँ असाच चालू राहील, वर्षभरात भरगच्च उपक्रमांसह.

**– अरुण जोशी**

# नेल्सन मंडेला – एक युगांत

**विजय नाईक**

दक्षिण आफ्रिकेचे पितामह नेल्सन मंडेला यांचे ५ डिसेंबर २०१३ रोजी निधन झाले. तेथील जनतेचे ते लाडके माडिबा, ताता. त्यांच्या निधनाने दक्षिण आफ्रिका शोकाकूल झाला अन् हर्षितही. १० डिसेंबर रोजी जोहान्सबर्गच्या संकुलात त्यांच्या स्मरणार्थ झालेल्या संमेलनादरम्यान मुसळधार पाऊस असूनही लाखो लोक उपस्थित होते, त्यापैकी अनेकांच्या डोळ्यात अश्रू होते, तर सोवेटोतील (साऊथ वेस्ट टाऊनशिप) त्यांच्या घरासमोर शेकडो चाहत्यांचे हास्यमुद्रेने नृत्य चालू होते. मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळवून दिले याचा आनंद एकीकडे, व माडिबा सोडून गेले. या वस्तुस्थितीची जाणीव झाल्याने लाखो चाहत्यांची व्याकूळ झालेली मनस्थिति, हे दुसरीकडे, असे अनोखे चित्र दिसले. संकुलात जगातील ९० पेक्षा अधिक देशांचे अध्यक्ष, माजी अध्यक्ष व सर्वोच्च नेते यांच्या उपस्थितीवरून त्यांच्याविषयी असलेल्या नितांत जागतिक आदराची कल्पना यावी. असा नेता आता होणे नाही, असाच भाव प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होता. अब्राहम लिंकन, महात्मा गांधी, मार्टिन ल्युथर किंग यांच्या रांगेत जाऊन बसणारे मंडेला हे एकविसाव्या शतकातील शेवटचे नेते. त्यांच्याइतके उत्तुंग नेतृत्व दृष्टिपथात नाही. देशद्रोहाचा आरोप ठेवून तब्बल सत्तावीस वर्षे तुरुंगात डांबणाऱ्या वर्णभेदी सरकारविरुद्ध मंडेला यांनी गजाआड राहून संघर्ष केला. कारावासात असताना ते व त्यांचे सहकारी यांच्यावर अत्याचार झाले. तुरुंगाबाहेर जनता होरपळत होती. मंडेलांच्या अनुपस्थितीत विनी मंडेला राष्ट्रमाता बनल्या. अत्यंत हालअपेष्टा सहन करीत त्यांनी चळवळीचे सूत्रचालन केले. मंडेला यांना कुटुंबाचा सहवास लाभला, तो ऐन तारुण्याची, उमेदीची २७ वर्षे कारावासात व्यतीत केल्यावर.

११ फेब्रुवारी १९९० रोजी मंडेला यांची मुक्तता झाली. त्यापूर्वी ते व त्यांचे सहकारी केपटाऊननजिक ॲटलांटिक महासागरातील रॉबेन बेटावरील तुरुंगात कैदेत होते. जगातील 'विंडी सिटीज्'मध्ये केपटाऊनचा समावेश होतो. अंटार्क्टिकाच्या दिशेने येणाऱ्या थंडगार वाऱ्याने हे शहर गारठून जाते. अशा हवेत रॉबेन बेटावरील कैद्यांचे शरीर दीर्घकाळ साथ देत नाही. पण मंडेला तरूणपणी चांगले बॉक्सर व पीळदार शरीरयष्टीचे असल्याने वर्षानुवर्षांच्या सक्त मजुरीतील शारीरिक श्रम व त्रास सहन करू शकले. चुनखडी फोडताना त्यांचे डोळे व फुप्फुसांवर व्हायचा. तो परिणाम झालाच. त्या दुखण्याने त्यांना अखेरपर्यंत सोडले नाही. मंडेलाच्या मुक्तीनंतर दक्षिण आफ्रिकेत चैतन्याची लाट पसरली. जल्लोष सुरू झाला. खऱ्या स्वातंत्र्याची पहाट जनतेला दिसू लागली. श्वेतवर्णीयांविरुद्ध रोषाची लाटही दिवसेंदिवस तीव्र होत होती. तिची स्पष्ट चाहूल लागल्याने अध्यक्ष एफ.डब्ल्यू.डी. क्लर्क यांनी सामोपचाराचा मार्ग स्वीकारला. जगात अन्यत्र इतिहासजमा झालेला वसाहतवाद अजूनही दक्षिण आफ्रिकेत आपले वर्चस्व सोडावयास तयार नव्हता. युजीन टेरेब्लांच हे कट्टर व निमदहशतवादी आफ्रिकन नेते श्वेतवर्णीयांना चिथावीत होते. त्यांचे वर्चस्व कायम राहावे यासाठी टेरेब्लांचने सशस्त्र सेनादल स्थापन केले होते. या वातावरणात क्लर्क व मंडेला यांची बोलणी सुरू झाली. १७ जून १९९२ रोजी बोईपटाँग येथे झालेल्या हिंसाचारात ४६ कृष्णवर्णीय ठार व अनेक जखमी झाल्याने निषेधाचा आगडोंब उसळला. मंडेला व अन्य राजकीय पक्षांनी सरकारबरोबर चाललेल्या वाटाघाटींवर बहिष्कार टाकला. गोऱ्या सरकारच्या पोलिसांनी गोळीबार केला होता. दक्षिण आफ्रिकेत संतापाची लाट पसरली. ती शमण्यास व वाटाघाटींचे फलित देशासमोर येण्यास दोन वर्षे लागली. दरम्यानच्या काळात मंडेला व आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची (एएनसी) लोकप्रियता शिगेला पोचली. हे पाहता, श्वेतवर्णीय नेत्यांनी फोडा व तोडाचे धोरण अवलंबून क्वाझुलू नेतालमधील इंकाथा फ्रीडम पार्टीला (आयएफपी) एएनसीविरुद्ध चिथावण्याचा प्रयत्न केला. अखेर २७ एप्रिल १९९४ रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत एएनसीला प्रचंड बहुमत मिळाले व १० मे रोजी दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात प्रथमच कृष्णवर्णीय मंडेला अध्यक्ष झाले. ही ऐतिहासिक कामगिरी व यशस्वी वाटाघाटींसाठी मंडेला व क्लर्क यांना संयुक्त नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पहिले संयुक्त सरकार होते गव्हर्नमेन्ट ऑफ नॅशनल युनिटीचे (जीएनयू). त्यात क्लर्क हे उपाध्यक्ष व इंकाथाचे नेते मोंगोसुथू बुथलेझी हे गृहमंत्री झाले. संसदेच्या अधिवेशाचे वार्तांकन करण्यास मी केपटाऊनला गेलो होतो. त्यावेळी सभागृहातील चित्र मोठे



२८ मार्च १९९७ रोजी माझे दक्षिण आफ्रिकेवरील पुस्तक मंडेला यांना राष्ट्रपती भवनात भेटून देताना दिसत आहे. मुरलीधर भंडारे व आनंद शर्माही दिसत आहेत.

मजेशीर होते. मंडेला हे सत्ताधारी पक्षाच्या बाकांवर बसलेले, तर त्याच्याच मंत्रिमंडळातील क्लर्क व बुथलेझी त्यांच्यासमोर विरोधकांच्या बाकावर बसलेले. तिन्ही पक्षांच्या ऐक्याचे सरकार असूनही त्यातील दुफळी स्पष्ट होती. परंतु, विरोधकांनाही मानाची वागणूक देण्याचे औदार्य मंडेला यांनी सोडले नाही. दक्षिण आफ्रिकेचे 'रेनबो नेशन (इंद्रधनू देश) असे वर्णन त्यांनी केले, तेव्हा त्यांच्या विशाल मनाची कल्पना जगाला आली. ''कृष्णवर्णीय, श्वेतवर्णीय व अन्य वर्णीय या सर्वांचा हा देश आहे,'' हा संदेश त्यांनी दिला. त्यामुळे श्वेतवर्णीयांविरुद्ध संतापाची लाट असूनही दक्षिण आफ्रिका रंगभेदी हिंसाचारापासून वाचला. तो झाला असता, तर ब्रिटन, डेन्मार्क आदी युरोपीय देश पुन्हा सशस्त्र हस्तक्षेप करण्यास धावले असते. ब्रिटिश पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांनी मंडेला हे 'दहशतवादी' असल्याचे जाहीरपणे म्हटले होते. मंडेला यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांना सामावून घेणारे होते, म्हणूनच ते जगन्मान्य झाले. मंडेला अध्यक्ष झाल्यानंतर केलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यात मी जगातील सर्वात गुन्हेग्रस्त सोवेटो या शहराला भेट दिली, तेव्हा तेथील एक झुलू युवक म्हणाला, की लोकांना वाटले, की मंडेला आल्यावर आपल्या घरात फ्रीज, एअर कंडिशनर, मायक्रोवेव्ह यांचा पाऊस पडेल. पण त्यांना समजायला हवे, की हे सारे मिळायला बराच अवधी लागेल व त्यासाठी मंडेला यांना वेळ द्यावा लागेल.

गेल्या जूनमध्ये मी दक्षिण आफ्रिका व केनियाला गेलो होतो. मंडेला यांना प्रिटोरियातील रुग्णालयात दाखल करून तीन दिवस उलटले होते. जनता चिंतेत होती. लंडनचा दौरा रद्द करून त्यांच्या विद्यमान पत्नी ग्रासा माशेल प्रिटोरियास परतल्या होत्या. विनी मंडेलाही पोचल्या. कन्या झेनानी ध्लामिनी अर्जेंटिनाहून आल्या. त्या दक्षिण आफ्रिकेच्या तेथील राजदूत होत. धाकटी कन्या झिंझी वडिलांजवळ राहून शुश्रूषा करीत होती. अध्यक्ष जेकब झुमा यांनी रूग्णालयात जाऊन चौकशी केली. पण शरीर त्यांना साथ देणार काय, अशी पाल प्रत्येकाच्या मनात चुकचुकली. दुसरीकडे, ''मंडेला यांनी सारे आयुष्य देशासाठी वेचले, त्यांना आता खऱ्या अर्थाने चिरशांती हवी आहे व हे सत्य कुणालाही नाकारता येणार नाही,'' असाही प्रवाह होता. त्यामुळे, ''जे टाळता येणार नाही, त्याची खंत कशाला करायची,'' असे काही विचारवंत बोलू लागले होते. तरीही केवळ इच्छाशक्ती व लढवय्याची जिद्द असल्याने मंडेला त्या दुखण्यातून बरे झाले. दक्षिण आफ्रिका त्यांचा ९४ वा वाढदिवस साजरा करू शकला, तो त्यामुळे. त्या आधी त्यांना क्षयरोगानेही ग्रासले होते. त्यातून ते बरे झाले होते. जनतेच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या. तरीही देशाचे व जगाचे लक्ष शेवटपर्यंत त्यांच्या तब्येतीवर खिळून होते.

वसाहतवादाची संपुष्टता ही जगाच्या इतिहासातील सर्वात महत्वाची घटना असल्याने तेथे जाऊन 'सकाळ'साठी तिचे वार्तांकन करण्याची तयारी मी दर्शविली व 'सकाळ'ने त्यास मान्यता दिली. त्यामुळे तेव्हा व त्यानंतर अनेकदा तेथे जाऊन मंडेला यांचे नेतृत्व, व्यक्तिमत्त्व व दक्षिण आफ्रिकेचे अंतरंग जवळून पाहण्याची व मंडेला यांच्या सहकाऱ्यांना भेटून चर्चा व विचारविनिमय करण्याची संधी मला मिळाली. परंतु स्मृतीच्या कोंदणात कायमचे बसले ते दोन प्रसंग. २८ मार्च १९९७ रोजी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात मी मंडेला यांना भेटलो. आदल्या दिवशी काँग्रेसचे नेते आनंद शर्मा यांची भेट झाली, तेव्हा ते म्हणाले, ''मंडेलांनी उद्या राष्ट्रपती भवनात काही मंडळींना सकाळी नाश्त्यास बोलावलं आहे. त्या यादीत तुझंही नाव मी दिलंय. तुझं पुस्तकही त्यांना भेट दे.'' या निमंत्रणाने मी चांगलाच सुखावलो. दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यांवर आधारीत 'मंडेलांच्या देशात' हे माझे पुस्तक मेहता प्रकाशनतर्फे जानेवारी १९९६ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्याची प्रत घेऊन मी राष्ट्रपती भवनात पोचलो. भारत सरकारच्या आमंत्रणावरून मंडेला आले होते. प्रशस्त दालनात त्यांना भेटून त्यांच्या हाती पुस्तक दिले, तेव्हा काही क्षण ते चाळू लागले. दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्याची माहिती मी दिली, तेव्हा कुतूहलाने मुखपृष्ठावरील त्यांच्या व जोहान्सबर्गच्या छायाचित्रांकडे पाहून पाने चाळत त्यांनी माझे अभिनंदन केले. त्यांना प्रत दिल्यानंतर मी दुसरी प्रत पुढे धरता, मंडेलांनी पेन काढले व लिहिले ''टू विजय, बेस्ट वुइशेस!'' त्यावर

स्वाक्षरी करून तारीख लिहिली २८.३.१९९७. या प्रसंगी आनंद शर्मा यांच्याव्यतिरिक्त मुरलीधर भंडारे, एम.ए. बेबी हे काँग्रेसचे तसेच, अन्य पक्षांचे नेते उपस्थित होते. २००० साली त्यांच्या दुसऱ्या भेटीत राष्ट्रपती भवनाच्या प्रागंणात त्यांचे औपचारिक स्वागत व मानवंदना झाल्यावर मी त्यांना पुन्हा भेटलो. त्यावेळी त्यांना म्हणालो, 'माडिबा, मी पुन्हा आपल्या देशाला भेट दिली, तेव्हा मला तुम्हाला भेटायचे होते, परंतु आपण कुनूला गेल्याचे मला सांगण्यात आले. तेथे मी येऊ शकलो नाही, पण इथे भेटताना खूप आनंद होतोय.'' त्यावर मंडेला म्हणाले, 'इन्फॅक्ट, इट वॉज माय बॅड लक दॅट आय कुड नॉट मीट यू, आय हॅड ए कॅटरॅक्ट ऑपरेशन. डॉक्टर्स हॅड टोल्ड मी टु टेक रेस्ट. यू नो लाईम डस्ट ऑन रॉबेन आयलँड हर्ट माय आईज. हेन्स आय हॅड गॉन टु कुनू. बट आय ॲम मीटिंग यू नाऊ.' त्यांच्या विनम्रतेने मी स्तिमित झालो, अन् म्हणालो, ''नो माडिबा, आय वाज नॉट लकी देन, बट आय ॲम नाऊ.'' मंडेलाच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटले. हस्तांदोलन करीत ते पुढे सरकले. क्षणात दुसऱ्याचे मन जिंकून घेण्याची विलक्षण हातोटी मंडेला यांच्यात होती. श्वेतवर्णीय नेत्यांची मने त्यानी जिंकली, ती याच खुबीने. याची आणखी एक प्रचीती मला आली, ती दक्षिण आफ्रिकेतील मफेकिंग येथे १७ डिसेंबर १९९७ रोजी झालेल्या एएनसीच्या ५० व्या खुल्या अधिवेशनात. सकाळतर्फे या अधिवेशनाचे वार्तांकन करण्यासाठी मी गेलो होतो. एएनसीचे नवे अध्यक्षपद व भावी राष्ट्राध्यक्षाच्या पदासाठी मंडेला यांनी ज्येष्ठ नेते थाबो एम्बेकी यांचे नाव निश्चित केले होते. परंतु खुल्या अधिवेशनात ठराव करून त्यावर औपचारिक संमती त्यांना घ्यावयाची होती. दुसरीकडे थाबो यांना विरोध करण्याची जोरदार तयारी एएनसीच्या महिला विभागाच्या अध्यक्ष विनी मंडेला यांनी केलेली होती. मंडपाबाहेरील प्रांगणात विनी मंडेला, पीटर लेकोटा आदी नेते खलबते करीत उभे होते. आम्ही काही पत्रकार नजिकच होतो. मंचावर मोठे नाट्य होणार असे दिसू लागले. आमची उत्सुकता वाढू लागली. मंडेला मंचावर आले. त्यांच्याबरोबर थाबो एम्बेकी आले. सिरील रामफोसा, मॅक महाराज, जय नायडू, दल्ला ओमर आदी नेते आले. विनी मंडेलांच्या हालचालीकडे आम्ही बारकाईने लक्ष देऊ लागलो. त्या सावकाशपणे मंचाकडे गेल्या. पुढे काय होणार याची उत्सुकता शिगेला पोचली होती. मंडेला यांनी काही घोषणा करण्याआधी सावकाशपणे विनी त्यांच्या दिशेने चालू लागल्या. खडाजंगी होणार काय, या विचारात असतानाच ॲन्टी क्लायमॅक्स झाला. विनीने प्रेमभराने मंडेला यांना मिठी मारली, आणि दोघांनी चुंबन घेतले. अधिवेशनाचा सारा नूर पालटला.




**पुस्तकावरील मंडेला यांची सही व रिमार्क**

काही क्षणांपूर्वी निर्माण झालेले तंग वातावरण निवळले. मंडेला यांनी एम्बेकी यांची एएनसीच्या भावी अध्यक्षपदी निवड करण्याचा ठराव मांडला व एकमताने तो संमत झालाही. मंडेला यांचे व्यक्तिमत्त्व इतकेप्रभावी होते, की त्यांना जाहीर विरोध करण्याचा विचार नेत्यांना शक्य नव्हता. मंडेला यांनी पहिल्या मंत्रिमंडळात विनीचा समावेश करून त्यांच्यावर सांस्कृतिक मंत्रालयाचा कारभार सोपविला होता. परंतु त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप होऊन त्यात तथ्य असल्याचे सिद्ध होताच त्यांना राजीनामा देण्यास सांगितले होते. तेव्हापासून त्या मंडेला यांच्यापासून काहीशा दूर गेल्या.

श्वेतवर्णीयांनी केलेल्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी त्यांनी फादर देसमंड टुटू यांच्या अध्यक्षतेखाली 'द ट्रुथ अँड रिकन्सिलिएशन' आयोगाची स्थापना केली. त्याच्या स्थापनेने सर्वांना न्याय मिळाला, असे म्हणता येणार नाही. परंतु गुन्ह्यांची कबूली अनेकांनी दिली व त्यांच्यावर खटले दाखल करण्यात आले. अत्याचारग्रस्तांना काही प्रमाणात न्याय मिळाला. शेकडो वर्षांच्या रंगभेदातून शिगेस पोचलेल्या द्वेषावर उपाय शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचबरोबर राजकारणात सहसा न पाळल्या जाणाऱ्या नैतिकतेच्या संकेतांचे पालन करून राजकीय आदर्श घालून दिला. मंडेला यांची लोकप्रियता इतकी प्रचंड होती, की त्यांना हवे असते तर लोकशाही प्रक्रियेतूनही किमान पंधरा ते वीस वर्षे ते सत्तेवर राहिले असते. परंतु, ससंदेची पाच वर्षे संपुष्टात येताच त्यांनी सत्तेचा त्याग करून देशाची सूत्रे थाबो एम्बेकी यांच्या हाती दिली. राजकीय नेत्याने पदाचा लोभ किती धरावा, किती वर्षे त्याला चिकटून राहावे, शासन करताना शुचितेची तत्त्वे कशी पाळावी व मंत्रिमंडळ हे राजकारण व समाजाच्या दृष्टीने कसे सर्वसमावेशक असावे, याचा आदर्श त्यांनी घालून दिला. तथापि, १९९९ मध्ये एम्बेकी सत्तेवर आल्यापासून सुरू झालेले सत्तेचे, एकमेकावर कुरघोडी करण्याचे व स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे राजकारण याची खंत मंडेला यांनी वेळोवेळी बोलून दाखविली.

गांधीजीच्या अहिंसा व सत्याग्रह यांचा मंडेला यांच्यावर प्रभाव होता, परंतु ही दोन्ही तत्त्वे नेहमीच उपयोगी पडतील, यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्याबाबत 'लाँग वॉक टू फ्रीडम' या आत्मचरित्रात ते म्हणतात, 'द इंडियन कँपेन हर केन्ड बॅक टू द १९१३ पॅसीव रेझिस्टंस कँपेन इन विच महात्मा गांधी लेड ए ट्युम्युल्टस प्रोसेशन ऑफ इंडियन्स क्रॉसिंग इल्लिगली फ्रॉम नेताल टू द ट्रान्सवाल. दॅट वॉज हिस्टरी; दस कँपेन वॉज टेकिंग बिफोर माय आईज. नेताल इंडियन काँग्रेस व ट्रान्सवाल इंडियन काँग्रेसने चालविलेली आंदोलने आमच्या

युवा लीगसाठी आदर्श व अनुकरणीय होती.'' एके ठिकाणी ते म्हणतात, की ''आम्हाला असेही वाटत होते, की सरकारच्या दडपशाहीविरुद्ध लढा देण्यास एएनसीची भूमिका फारच मवाळ झाली आहे, म्हणूनच वेळ आल्यास कायद्याचे उल्लंघन करून स्वतःच्या तत्त्वांसाठी गांधीजी म्हणतात, तसे तुरुंगात जाण्याचीही तयारी एएनसीच्या नेत्यांनी ठेवावयास हवी.'' तथापि, गांधीजींची तत्त्वे एका सीमेपर्यंत वापरली जाऊ शकतात, असे मंडेला यांचे मत होते. भारतातील ब्रिटिशांचे शासन व दक्षिण आफ्रिकेतील वंशभेदी शासन यांत फरक होता. त्यामुळे ''त्यांच्याविरुद्ध लढा देताना अहिसा व सत्याग्रहाबरोबरच सशस्त्र संघर्षाचा मार्गही अवलंबावा लागेल,'' असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच त्यांच्या नेतृत्वाखाली १९६१ मध्ये 'उमखुंटो वी सीझ्वे' (स्पियर ऑफ द नेशन) स्थापन करण्यात आली. तिच्या सशस्त्र उठावाची सूत्रे मंडेला यांच्याव्यतिरिक्त ऑलिव्हर तांबो, जो मोडेसी, क्रिस हॅनी, ऱ्हेमंड म्लहाबा यांच्या हाती होती. या संघटनेने गोरिला पद्धतीने सरकारविरुद्ध उठाव केला व हल्ल्यांचे सत्र सुरू झाले. मंडेला यांच्या या निर्णयाची तुलना सुभाषचंद्र बोस यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यासाठी स्थापन केलेल्या आझाद हिंद सेनेशी करता येईल. मंडेला यांच्या व्यक्तिमत्त्वात गांधी आणि सुभाषचंद्र बोस यांच्या मवाळ व जहाल विचारांचा संगम झालेला दिसतो. ब्रिटिशांविरुद्ध लढा देताना सत्याग्रही आंदोलनाव्यतिरिक्त राजकीय वाटाघाटी करताना गांधीजींनी दाखविलेली सहनशीलता, केलेला युक्तिवाद मंडेला यांच्या कार्यशैलीत आढळतो; तसेच, सुभाषचंद्र बोस यांच्यातील सैनिकी विचारसरणीही त्यांनी अंगिकारलेली दिसते. मंडेला यांची विनम्रता शत्रूलाही हतबल करील अशीच होती. लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले, सरदार वल्लभभाई पटेल या समकालीन दिग्गजांप्रमाणेच वॉल्टर सिसिलू, युसूफ दादू, ऑलिव्हर तांबो, देसमंड टुटू, फातिमा व इस्माईल मीर, अल्बर्ट लुटुली, अहमद कॅथराडा आदी समकालीन नेत्यांनी मंडेला यांचे हात बळकट केले.

मंडेला संथपणे बोलत. त्यांच्या वाक्यावाक्यातून जीवनाचे तत्त्वज्ञान प्रतीत होई. मधूनच विनोदाची पखरण होई. त्याविषयी लिहिताना प्रसिद्ध लेखक व पत्रकार ॲलेक्स पेरी यांनी म्हटलेय, की ते बिल क्लिंटन, दलाई लामा यांच्याबरोबर जितक्या सहजतेने संभाषणात रमत, तसेच स्पाईस गर्ल्सनाही भेटण्यासाठी वेळ देत. श्वेतवर्णीयांना धडा शिकविणारे आपण एकमात्र नेते आहोत, अशी शेखी मिरविणारे झिंबाब्वेचे हुकूमशहा रॉबर्ट मुगाबे एकदा त्यांना तक्रारीच्या सुरात म्हणाले, ''तुरुंगातून तुमची मुक्तता होण्यापूर्वी आफ्रिका खंडात फक्त मीच मुख्य तारा (स्टार ऑफ आफ्रिका) होतो.'' त्यावर मंडेलांनी स्मितहास्य करीत मुगाबेंची फिरकी घेतली. ''द स्टार हॅज बीन रिप्लेस्ड बाय द सन!'' (त्या ताऱ्याची जागा आता सूर्यानं घेतली आहे)

मंडेला यांना चिरशांती मिळाली आहे. दक्षिण आफ्रिकेचे नेते व जनतेपुढे आता त्यांच्या इंद्रधनू देशाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचे आव्हान आहे. त्यासाठी बहुसंख्य कृष्णवर्णीय व अल्पसंख श्वेतवर्णीय, अन्य वर्णीय व भारतीय वंशाच्या दक्षिण आफ्रिकन नागरिकांना एकोप्याने राहावे लागेल. या स्वप्नपूर्तीस अनेक वर्षे लागतील, असे तेथील आजच्या परिस्थितीचे अवलोकन करताना दिसते. विद्यमान अध्यक्ष जेकब झुमा यांनी प्रयत्न चालविले असले, तरी १९९४ मधील एएनसीची लोकप्रियता वेगाने कमी होत आहे. त्यांच्या हाती दक्षिण आफ्रिकेतील नऊ राज्यांपैकी सात राज्ये आहेत. झुमा यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली असून, पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर एएनसीचे नेतृत्व पक्षाचे उपनेते सिरिल रामफोसा अथवा अल्पकालीन अध्यक्ष कालेमा मोटलांटे यांच्या हाती जाण्याची शक्यता आहे. झुमा यांच्या कारकिर्दीत बोकाळलेला भ्रष्टाचार व नेत्यांना लागलेला रँड्चा (चलन) लोभ, यामुळे सर्वसमावेशक विकासाचे ध्येय साध्य झालेले नाही. तथापि, कृष्णवर्णीयांच्या हाती सत्ता येऊन फक्त वीस वर्षे उलटल्याने नेत्यांना किमान आणखी वीस वर्षांचा कालावधी द्यावा लागेल. सत्तेची पाच वर्षे संपल्यावर मंत्रिमंडळातील जय नायडू, मॅक महाराज, टोकियो सेकवाले आदी नेत्यांनी राजकारणातून बाहेर पडून उद्योगधंद्यात पुढाकार घ्यावा, असे मंडेला यांनी सुचविले होते. सेकवाले, नायडू यांनी उद्योग सुरू केले. मॅक महाराज पुन्हा मंडेलांचे सहकारी बनून त्यांच्या अखेरच्या दिवसांत त्यांचे प्रवक्ते बनले. कॅथराडा रॉबेन बेटावरील तुरुंगाच्या स्मारकाचे अध्यक्ष झाले.

मंडेलांच्या निधनानंतर दक्षिण आफ्रिका महत्त्वाच्या राजकीय टप्प्यावर उभा आहे. रंगभेदाची दरी संपुष्टात आलेली नाही. मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे, वृत्तपत्रे, जमिनी आजही श्वेतवर्णीयांच्या ताब्यात आहेत. अंदाजे ६१ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. भारत, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका व ब्राझील या राष्ट्रांनी स्थापन केलेल्या 'ब्रिक्स' व 'इब्सा' या संघटनांनी सुरू केलेल्या परस्परसहकार्यामुळे सामूहिक विकास साधला जाईल, असे मंडेला यांना वाटत होते. त्याबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले होते. आपल्या हयातीत दक्षिण आफ्रिकेच्या समस्या सुटणार नाहीत याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच नवनेतृत्वाला शहाणपणाचा सल्ला देण्याचे त्यांनी अखेरपर्यंत सोडले नाही. त्यांचा वारसा चालवण्याचे नैतिक आव्हान झुमा व त्यानंतर येणारे नेतृत्व पेलू शकेल काय, याचे उत्तर केवळ पुढील काळच सांगू शकेल. जगाला या ऐतिहासिक युगपुरुषाचे कायमचे स्मरण राहील.

**– विजय नाईक**
ए-१७७, समाचार अपार्टमेंट्स,
मयुरविहार, फेज १ एक्स्टेंशन,
नवी दिल्ली-११००९१
भ्रमणध्वनी : ९८१००४१८०२
vijay.p.naik@gmail.com

साहित्य संमेलन विशेषांक

# पहिलेपणाची आठवण...

## रविप्रकाश कुलकर्णी



आज नुसतं फमु म्हटलं की फ.मु. शिंदेच ही नाममुद्रा आलम महाराष्ट्रात ठाऊक झाली आहे. त्यांच्या नावावर तीस-चाळीस कवितासंग्रह आहेत. त्याखेरीज गर्दीला कवितेच्या शब्दांवर कसं झुलवावं ह्याच्यात त्यांचा हात धरणारा नव्हे तोंड धरणारा दुसरा कुणी दाखवणं मुश्कील. त्यासाठी त्यांची भटकंती इतकी असते की त्यांना 'चक्रधर'पासून 'हिंडकेसरी'पर्यंत अनेक नावांनी गौरवलं आहे, तर दस्तुरखुद्द एकेकाळची त्यांची प्रिया आणि नंतरच्या धर्मपत्नीनं घरचा आहेर दिला आहे- सदाबाहेर...

तर असं बरंच काही असलेले फ.मु. शिंदे.

पण ज्याकाळी हे नाव असलंच तर कागदोपत्री होतं. कवीच असल्यामुळे कविता प्रकाशित होणं-करणं हे अपरिहार्यच आणि त्यानंतर लगेच आपला कवितासंग्रह यायला हवा अशी आस लागणं क्रमप्राप्त होतं. शिवाय त्यात भर घालायला मित्रमंडळी पुढे येतातच.

त्यावेळची स्थिती-परिस्थिती काय होती?

छोटेखानी डायरीत मोजून त्रेचाळीस कविता होत्या. त्या आधीच 'अस्मितादर्श', 'वैखरी', 'प्रतिष्ठान', 'सत्यकथा' अशा वाङ्मयीन मासिकांत प्रकाशित झालेल्या होत्या.

डायरीच्या पहिल्याच पानावर कवितासंग्रहाचं नाव लिहिलेलं होतं- 'मुक्त व्यथांचा गाव'.

गंगाधर पानतावणे यांची सुरुवातीपासूनच पाठराखण असल्यामुळे त्यांनी नावात बदल केला आणि 'व्यथालय' हे नाव नक्की केलं. मग हे सगळं भेंडोळं प्रस्तावनेसाठी दि.के. बेडेकरांकडे पाठवलं. दरम्यान 'अस्मितादर्श'मधून एक छोटी जाहिरात देऊन झाली. हे सगळं झालं, पण नगदनारायण? विद्यार्थी असलेल्या फ.मु. शिंदेंचा खिसा रिकामाच होता. पण मग मांडेसर, रा.रं. बोराडेसर आणि पानतावणे या तिघांनी पैसे पुढे केले.

कवितासंग्रहाच्या नावाबद्दल मांडेसरांनी असहमती दाखवली. शेवटी पानतावणे यांनीच नाव नक्की केलं- 'जुलूस'. मुखपृष्ठ होतं- भ.मा. परसवाळे याचं.

छोट्या आकाराचा, अठावन्न पृष्ठांचा, चार रुपये किमतीचा हा कवितासंग्रह एकदाचा प्रकाशित झाला. 'अस्मितादर्श' प्रकाशनाचं हे पहिलं पुस्तक! पण थोडे पैसे कमी पडत होते. मुद्रणालयाच्या मालकापुढे अजिजी झाली- ''शिष्यवृत्ती मिळाली की देतो.''

मालक ज.रा. बर्दापूरकर म्हणाले, ''बाकीचे पैसे कसे दिले?''

''सरांनी दिले.'' - फ.मु. शिंदे.

''पुस्तक कसं झालं आहे?'' मालक

''झकास!''

''कवीच्या पुस्तकाचा हिशोब पूर्ण झाला आहे. त्यांना पावती देऊन टाका.'' बर्दापूरकरांनी निर्णय केला...

'जुलूस' संग्रह शेख सफी आणि गणेश दुधगावकर या दोस्तांना अर्पण केलेला होता.

संग्रहाचं प्रकाशन वा.ल. कुलकर्णी ह्यांच्या हस्ते झालं. अध्यक्षस्थानी प्राचार्य म.भि. चिटणीस होते. रसाळसर प्रमुख पाहुणे होते.

संग्रहाची पहिली प्रत फ.मु. शिंदे यांनी त्यांचं प्रेमाचं स्थळ (फ.मु.नी तेव्हाचं प्रेमाचं स्थळ म्हटलं होतं पण तेच शेवटपर्यंत कायम राहिलं...) कु. लीला चौहान यांना दिलं. पुढे या

संबंधातील फ.मुं.ची कॉमेन्ट – ती प्रतही आता सापडत नाही. प्रेमातल्या पहिल्या गोष्टी नंतर का गहाळ होतात ते समजत नाही! ‘जुलूस’चं स्वागत अनपेक्षित एवढं झालं. पहिलं परीक्षण ‘सोबत’मध्ये डॉ. भालचंद्र फडके यांनी केलं. ‘ललित’मध्ये १९७२ मधला सर्वोत्कृष्ट संग्रह म्हणून प्रा. सुभाष सोमण यांनी त्याचं कौतुक केलं. या संग्रहाला राज्य शासनाचा ‘अधिक पुरस्कार’ देण्याची शिफारस झाली होती. परंतु शिक्षणमंत्र्यांनी ऐनवेळी आर्थिक तुटवड्याच्या सबबीखाली अधिक पुरस्काराची यादीच रद्द केली!

मात्र ‘जुलूस’चं स्वागत चांगलं झालं. ‘जुलूस’चा हिंदी अनुवाद प्रा. रमेश दीक्षित यांनी केला. डॉ. भगवानदासजी वर्मा यांची प्रस्तावना होती. हिंदीतले दुष्यंतकुमार यांना हा संग्रह अर्पण केला होता.

मराठवाडा विद्यापीठानं ‘जुलूस’ पदवी अभ्यासक्रमासाठी नेमला, पण तेव्हा पहिली आवृत्ती संपली होती.

दुसरी आवृत्ती मधुकाका कुलकर्णी यांच्या ‘श्रीविद्या प्रकाशन’तर्फे प्रकाशित झाली. विद्यार्थ्यांची सोय म्हणून डॉ. एस.एस. भोसले यांची टिपणं आणि कवीची मुलाखत झोकात होती. मुखपृष्ठ सुभाष अवचट यांचं.

नंतर कवी म्हणून फ.मु. शिंदे एकेक पुढचं पाऊल टाकत गेले. चाळीसेक संग्रह नक्कीच त्यांच्या नावावर आहेत पण त्याहीपेक्षा तसंच महत्त्वाचं म्हणजे फ.मु. शिंदे यांनी नवोदितांची कायम पाठराखण केली आहे. उत्तेजन, प्रस्तावना ह्या गोष्टी त्यात आल्याच. पण फमुंचं म्हणून एक वेगळं वैशिष्ट्य सांगायला हवं. त्यांनी पाठराखण केलेली किती पुस्तकं असतील? किमान ही संख्या तीनशेच्या घरात असेल. (त्यात एक पुस्तक त्यांच्या पत्नीचं पण आहे!)

इंग्रजी ‘ब्लर्ब’ फ.मु. शिंदेकृत मराठीकरण म्हणजे ‘पाठराखण’!

एकूण फमु आपले उमेदवारीचे दिवस आजही विसरलेले नाहीत. माथा उंच झाला असला तरी पाय जमिनीवरच राहिलेले आहेत तर!

**– रविप्रकाश कुलकर्णी**
३, स्वप्नसाकार,
ध.वां. चौधरी हायस्कूलजवळ
डोंबिवली (पूर्व), ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९२२४८७२८७०

**नीरजा यांचे दोन कवितासंग्रह**




स्त्रीगणेशा

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

‘स्त्री’ ही नीरजा यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. ती तिच्या दैहिक, मानसिक, आत्मिक अनुभूतींसह जशी साकार होते, तशीच ती समाजाच्या ‘स्त्री’विषयक धारणेसह, तिच्या संरचित रूपांसह अभिव्यक्त होते. समाजव्यवस्था आणि स्त्री यांच्यामधल्या ताणांनी या कवितांमधले जग आंदोलित होत असलेले आढळते. ‘मनाच्या पाटीवरचं पारंपरिक चित्र’ आणि वास्तव यातल्या अंतरांनी घडत आलेला स्त्रीनिष्ठ इतिहास या कवितांतून उलगडत जातो. अशा प्रकारच्या इतिहासाची रचना करणे हे नीरजा यांच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य आहे...

– वसंत आबाजी डहाके

चर्चमध्ये घुमणाऱ्या
सगळ्या प्रार्थना
रडून दमल्या
तसे त्यानं
क्रूसावरचे हात वर करून
एक कडकडून जांभई दिली.

निरन्वय

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**



# भालचंद्र नेमाडे लिखित साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण : एक प्रतिक्रिया

डॉ. अनंत लाभसेटवार

नेमाडे हे मराठीतले पहिले सुप्रसिद्ध कादंबरीकारच नव्हे तर उत्कृष्ट व विचारप्रवर्तक समीक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या एका समीक्षाग्रंथाला (टीका स्वयंवर) साहित्य अकादमीचा पुरस्कारदेखील मिळाला. लाभसेटवार प्रतिष्ठानतर्फे त्यांना एक उत्कृष्ट साहित्यिक म्हणून काही वर्षांपूर्वी गौरवण्यात आलं होतं. त्यांची प्रतिष्ठा व प्रसिद्ध वादातीत आहे.

अलिकडे म्हणजे २०११ मध्ये 'जागतिकीकरण, समाज व मराठी साहित्य' या डॉ. रवींद्र शोभणे यांनी संपादित व लाभसेटवार प्रतिष्ठानने प्रायोजित केलेल्या ग्रंथातील वरील शीर्षकाची लेखवजा समीक्षा मला वाचनीय वाटली. अमेरिकेत चार पावसाळे काढल्यामुळे नवीन दृष्टिकोनातून बघण्याचं त्यांच्या अनेक विधानांनी आमंत्रण दिलं. म्हणून ही प्रतिक्रिया लिहिण्याचा मोह अनावर झाला.

सडेतोड मतं व्यक्त करणे हे नेमाडेंचं वैशिष्ट्य. त्यामुळे त्यांचे विचार आणि टीका अमेरिकेत बसून किती वेगळी आणि आगळी आहे याची मला प्रचीती आली. त्यांची अनेक विधानं वादग्रस्त वाटतात. पृष्ठ ३ वर त्यांनी म्हटलं की, ''इंग्रजी संस्कृतीतून आपल्या सुधारणा झाल्या नाही तर इंग्रजी वसाहतवादामुळे आपल्या पोटातून सुधारणा निर्माण झाल्या.'' हे विधान सत्याला धरून नाही.

आंग्लभाषेच्या संपर्कामुळे आपलं विचारविश्व विस्तारलं. ज्ञानाची अनेक दालनं खुलली आणि अंधश्रद्धा, कुजलेल्या परंपरा व प्रथांवर प्रकाश टाकणं शक्य झालं. सती जाण्याची पशुतुल्य परंपरा इंग्रजांनीच बंद केली. म्हणून त्यांच्या प्रभावापासून, काही प्रमाणात का होईना प्रगती झाली नाही असं म्हणणं चुकीचं ठरेल.

वसाहतवादामुळे सुधारणा आपल्या पोटातून निर्माण झाल्या असं म्हणणं देखील धोक्याचं होईल. मग वसाहतवादाची गळचेपी दूर होऊन आज ६७ वर्षं लोटलीत तरी जातपात का नष्ट झाली नाही? अलिकडच्या पुस्तकात नोबेलप्राप्त अमर्त्य सेन व जीन ड्रेझी (Uncertain Glory : India and its Contradiction, Princeton University Press, 2013) म्हटल्याप्रमाणे आपण मानवी विकास निर्देशांकाच्या अनेक घटक परिमाणात जगाच्या तर सोडाच पण बुटकल्या बांगलादेशाच्या मागे का आहोत? आपले ४ ते ८ व्या वर्गातले निम्मे विद्यार्थी २० च्या आकड्याला ५ नं भागू शकत नाहीत की त्यांना धड वाचता देखील का येत नाही ? इंग्रजांनी आपल्याला प्रगतीचा मार्ग दाखवला, पण स्वयंप्रेरणेनं त्यावर प्रवास करता न येणं याला सुधारणा स्वत:च्या पोटातून आल्या असं कसं म्हणता येईल?

ब्रिटिशांना आपल्या सर्वात मोठ्या वसाहतीत जास्त प्रगती करायची नव्हती. गुलाम डोकेबाज झाले असते तर त्यांनी स्वातंत्र्य मागितलं नसतं का? हे महत्त्वाचं आहे, की ज्या ज्या भारतीय नेत्यांनी स्वातंत्र्याची मागणी केली त्यातले जवळपास सर्व इंग्लडमध्ये शिकून आले होते.

मग, सलमान रश्दी या इंग्लडस्थित भारतीय लेखकाचं उदाहरण देऊन सर्व यशस्वी अनिवासी भारतीय साहित्यिकांवर त्यांनी अमाप संपत्ती कमावली म्हणून आग पाखडली. जागतिक स्पर्धेत नुसता सूटबूट घालून यश मिळत नाही. त्यासाठी असामान्य गुणवत्ता लागते. पाश्चात्य वाचकांची अस्मिता लक्षात घेऊन त्यांच्यात दूरस्थ संस्कृतीविषयी, चालीरीतींविषयी रस निर्माण करणं व पर्यायानं लेखकाच्या मायदेशाला प्रकाशात आणणं हे एक भीमकृत्यच असतं. रश्दीला सर्वोत्कृष्ट कादंबरीकार म्हणून ब्रिटनचं 'बूकर' पारितोषिक मिळालं. साहित्यातलं नोबेल समजल्या जाणाऱ्या या पुरस्कारासाठी सर्व जगातून अर्ज येतात. त्यानंतर ते पारितोषिक झुंपा लाहिरी या अमेरिकास्थित तरुण बंगाली लेखिकेला मिळालं. अशा लेखकांविषयी उपरोधानं बोलणं उचित वाटत नाही.

या यादीत विक्रम शेठ या ६० वर्षीय पंजाबी लेखकाचाही समावेश करावा लागेल. ते लंडन आणि दिल्लीत राहतात. वीस वर्षांपूर्वी त्यांनी 'सुटेबल बॉय' नावाची जवळजवळ १४०० पानांची महाकादंबरी जगाला दिली. ती अतिशय लोकप्रिय ठरली. त्यासाठी पेंग्विन नावाच्या प्रकाशकांनी अडीच कोटी रुपयांची आगाऊ रक्कम दिली होती. भारतीय पिढीसातत्यावर लिहिलेल्या या कादंबरीचं यश बघून प्रकाशकांनी त्या पुढचा भाग लिहिण्यासाठी लेखकाला १४ लक्ष पौंड म्हणजे १४ कोटी रुपये आगाऊ देऊन विक्रम केला. नवीन कादंबरी अजून पूर्ण न झाल्यामुळे सध्या सेठ प्रकाशकाशी वाटाघाटी करीत आहे. पण हे सांगायचा मुद्दा असा की, असामान्य प्रतिभेचा आपण उपरोध करण्याऐवजी गौरव करायला हवा. कारण

तो देशाचा विजय आहे. शेवटी लक्ष्मी यशालाच वरते.

खांडेकर सोडले तर मराठीतला एकही लेखक राष्ट्रीय पातळीवर झळकला नाही. वाघ, हत्ती, हरीण किंवा ससा जसे आपल्या भौगोलिक सीमा ओलांडत नाहीत तसंच साहित्यिकांचंही असतं. पण हे पक्ष्यांना लागू पडत नाही. त्यातले काही गरुडभरारी घेऊन देशभर भ्रमंती करतात. खांडेकर त्यातले एक होते. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचं जवळजवळ सर्वच मुख्य भाषांत भाषांतर झालं. त्यामुळे ते मराठी न राहता खऱ्या अर्थानं भारतीय लेखक झाले. हा मान मराठीतल्या दुसऱ्या कुठल्याच लेखकाला मिळालेला नाही. जर भाषिक भिंत ओलांडणं एवढं कठीण तर राष्ट्रीय मर्यादांचं उल्लंघन करून जागतिक पातळीवर झळकणं किती अवघड आहे याची कल्पनाच केलेली बरी. दुर्दैव असं की स्थानिक भाषेतलं साहित्य आपलेच वाचक वाचत नाहीत. मग ते दुसरे कशाला वाचतील?

टागोर हे उत्कृष्ट बंगाली कवी. पण त्यांच्या काव्याचं एका सुटाबुटातल्या चाहत्यानं भाषांतर केलं नसतं तर त्यांच्या प्रतिभेची जगाला ओळख झाली असती का? आणि त्यांना नोबेल तरी मिळालं असतं का? म्हणून जागतिक भाषेत लिहिणं म्हणजे स्वत्व विकून गुलामगिरी पत्करणं, असा जो अप्रत्यक्ष निष्कर्ष नेमाडे काढतात तो बिनबुडाचा वाटतो. अशा यशस्वी देशबांधवाविषयी त्यांच्या मनात आढ्यता का आहे कळत नाही.

परंतु ही वृत्ती फार बोलकी आहे असं मला वाटतं. कुठल्याही यशस्वी व्यक्तीचे पाय ओढणं हा मराठी माणसाचाच नव्हे तर तमाम भारतीयांचा गुणधर्म आहे. या रोगापासून अनिवासी भारतीय मुक्त नाहीत हे पुढील उदाहरणावरून सिद्ध होईल.

टेड केनडी हे अध्यक्ष जॉन केनेडींचे कनिष्ठ बंधू. त्यांचं अमेरिकेच्या अधिसभेत एवढं वजन व दरारा होता की, ते अधिसभेचा (सिनेट) वाघ म्हणून ओळखले जात. त्यांच्या मनात भारत व भारतीयांविषयी खास ओलावा होता. एका सरकारी विधीपदासाठी त्यांनी एका केरेलानच्या अनिवासी भारतीयाचं नामांकन करण्याचं ठरवलं. पण तत्पूर्वी त्यांनी लोकांचा कौल आजमावण्यासाठी अनिवासी भारतीयांना व गोऱ्यांना पत्र लिहून त्यांच्या प्रतिक्रिया मागितल्या. नवलाची गोष्ट म्हणजे सर्वात जास्त नकारार्थी पत्रं त्यांना अनिवारसी भारतीय देशबांधवांकडून आली. याचं त्यांना नवलं वाटलं. शेवटी त्या भारतीयाची पदावर नियुक्ती झाली पण केनेडींना जो कडू प्रतिसाद मिळाला तो बघून ते चकीत झाले होते हे निश्चित. नेमाडेंची टीका यातलाच एक व्रात्य प्रकार वाटतो. स्वातंत्र्योत्तर काळात तिला स्थान नाही.

रश्दींवर फतवा लादण्याचं कारण त्याच्या लिखाणाचा व अमर्याद लालसेचा व पर्यायानं जागतिकीकरणाचा दोष, असं नेमाडे म्हणतात. पण त्यांच्या टीकेचं लक्ष्य चुकलं असंच म्हणावं लागेल. रश्दीनं एक लेखक म्हणून आपल्या धर्मातील उणिवांवर प्रकाश टाकला. ते मुस्लीम धर्मगुरूंना आवडलं नाही. म्हणून त्यांनी त्याला शाप दिला. याचा जागतिकीकरणाशी किंवा अमर्याद लालसेशी काहीएक संबंध नाही. दुसरं असं की रश्दींचं हे पुस्तक १९८१ साली प्रसिद्ध झालं. भारतात जागतिकीकरणाचा गाडा एका तपानंतर सुरू झाला. नेमाडेंची अमर्याद लालसेची टीका इतर अनेक यशस्वी भारतीय लेखकांनाही लागू पडते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे विक्रम शेठ. त्यांच्या लिखाणातून देशी जाणिवा व्यक्त होऊन त्याचं वेगळेपण पाश्चात्य वाचकांना आवडलं. अशा लेखकांचं दैदिप्यमान यश बघून नेमाडेंना पोटतिडिक का होते हे समजत नाही.

मग नेमाडे, इंग्रजांनी त्यांचं साहित्य, संस्कृती व कला आपल्या घशात ओतून आपल्या तत्त्ववेत्त्यांना का डावललं म्हणून आक्षेप घेतात. हे दोन सवतींमधे दोन बहिणींप्रमाणे गुण्यागोविंदाचे संबंध का नाहीत असं विचारण्यासारखं आहे. साम्राज्य हे वसाहतीच्या कल्याणार्थ नसून तिचं शोषण करण्यासाठी होतं याचं त्यांना विस्मरण पडलेलं दिसतं. शिवाय इतिहास जेत्यांनी लिहिलेला असतो. पराजित राष्ट्रांनी लिहिलेल्या दस्तऐवजावरही कुणी विश्वास ठेवीत नाही. म्हणून इंग्रजांनी आपली संपत्ती व स्वातंत्र्यच लुटलं नाही तर त्यांच्या वैचारिक मांडलिकत्वाखाली ठेवलं ही फार आश्चर्याची गोष्ट नाही. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे पाश्चात्य मांडलिकत्व आजही सुरूच आहे. भारतीय मुलांची मानसिक जडणघडण ही रामायण, महाभारतातील आदर्शवादी पात्रांवरून न होता डिसनीच्या (Disney) उंदरांवरून (Tom and Jerry) होते याविषयी कुणी शंका बाळगू नये. आपली मुलं तासन्तास टीव्हीसमोर बसून हा पाश्चात्यांचा सांस्कृतिक कचरा बघत असलेलं मी पाहिलं आहे. यावर नेमाडेंनी प्रकाश टाकला असता तर बरं झालं असतं.

एका ठिकाणी (पान ५) ते गुजराती कुठल्याही अर्थानं हिंदू किंवा मुस्लीम नाहीत असा बाँबगोळा टाकतात. मुद्रणदोष नसेल तर हा शोध मला नवीन आहे. इतिहासात ते भलेही त्यांच्या मते फिजी बेटातून आले असतील, पण गुजराती मनुष्य आज मराठी किंवा मद्रासी माणसापेक्षा अंमळ जास्तच हिंदुत्व बाळगतो. माझे अनेक गुजराती मित्र आहेत. अमेरिकेच्या देवळात मराठी माणसांपेक्षा त्यांचीच संख्या जास्त असते. मग ते हिंदू नाहीत असं 'हिंदू'कार कसे म्हणतात हे कळत नाही. केवळ एका धार्मिक दंग्यात भाग घेतला म्हणून त्यांचं हिंदुत्व कमी होत नाही. महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात बराच अग्रेसर असण्याचं कारण मराठी माणूस नसून गुजराती माणसांचं योगदान आहे. अमेरिकेची आर्थिक नाडी जशी ज्यू (Jew) लोकांच्या हातात आहे तशीच भारताची व्यापारी प्रगती गुजराथ्यांच्या मुठीत आहे हे नाकारता येत नाही. म्हणून त्यांचा द्वेष किंवा हेवा करण्याचं कारण नाही.

देशाच्या प्रगतीच्या मापनासाठी परदेशी मापदंड वापरले जातात म्हणून नेमाडे शोक व्यक्त करतात. खरं म्हणजे प्रगतीचा जगभर एकच मार्ग व माप आहे. मानवी विकास निर्देशांकाची घटक परिमाणं सर्वत्र सारखीच असतात. दारिद्र्यनिर्मूलन करून राहणीमान

उंचावण्यासाठी जी मोजपट्टी वापरण्यात येते त्याचं गणित जगभर एकच. देशांच्या सांस्कृतिक, भौगोलिक किंवा ऐतिहासिक भिन्नत्वामुळे त्यात काहीएक फरक पडत नाही. या मार्गावरचे हिरवे किंवा लाल कंदील सारखेच.

जागतिकीकरणामुळे गरीब देशांचं शोषण होतं, हे सिद्ध करण्यासाठी ते बोलिव्हियासारख्या दूरस्थ व कुणी न ऐकलेल्या एका देशाचं उदाहरण देतात. पण या प्रक्रियेमुळे जगातील सर्वच देशांत आर्थिक उलथापालथ झाली आहे. त्याच्या तावडीतून अमेरिका देखील सुटली नाही. अनेक उद्योग (सुताच्या गिरण्या, जोडे बांधणी वगैरे) उद्‌ध्वस्त होऊन ते मुख्यत: चीनमध्ये स्वस्त मजुरीमुळे स्थलांतरीत झाले आणि लाखो नव्हे तर दशलक्षावधी मजूर रस्त्यावर पडले. जगातल्या सर्वात मोठ्या वाहनकंपनीचं (जनरल मोटर्स) व क्रायस्लरचं दिवाळं निघालं. त्यामुळे लाखो मजूर निष्कासित झाले. पण म्हणून अमेरिकेनं जागतिकीकरणाला दोष दिला नाही. कारण तसं करणं दुबळेपणाचं लक्षण समजण्यात येतं. सरकारनं अशा बेरोजगार झालेल्या मजुरांसाठी नवीन प्रशिक्षणाच्या योजना राबवल्या. जे त्याचा उपयोग करू शकले नाहीत त्यांना बेरोजगारीचं जागतिकीकरणामुळे देशाला फायदा झालाच. राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न (जीडीपी) कितीतरी पटींनी वाढलं. त्याचा उपयोग आपल्या समाजकर्त्यांनी गरिबी हटवण्यासाठी केला नाही हा दोष जागतिकीकरणाचा असू शकत नाही. भ्रष्टाचारग्रस्त लाल फितीच्या कारभारामुळे व चुकीच्या धोरणावर पैसे उधळल्यामुळे जागतिकीकरणाची फळं तळागाळापर्यंत पोचली नाहीत. गरिबांना धन किंवा धान्य वाटल्यानं गरिबी दूर होत नाही. ती त्यांना नोकऱ्या उपलब्ध करून दिल्यानं होते. शिधापत्रक वाटल्यानं त्यात फारसा फरक पडत नाही.

साहित्याचं क्षेत्र सोडून नेमाडे जेव्हा अर्थकारणात शिरतात तेव्हा त्यांची भूमीच नव्हे तर भूमिकाही ढिसाळ आहे हे कळतं. भांडवलशाही राष्ट्रांनी भारतासारख्या राष्ट्रांचं शोषण केलं असं चीनमधला एक लेखक त्यांना म्हणतो. मीही चीनमध्ये एकदा नव्हे तर दोनदा गेलो. त्यावर पुस्तकही लिहिलं. (चीनमधील चैन, नवचैतन्य प्रकाशन). पदोपदी आपण प्रजोत्पादनाचं क्षेत्र सोडून इतर क्षेत्रांत त्या देशाच्या किती मागे आहोत याची प्रचीती आली. भारताचं व अमेरिकेचं कुणी शोषण केलं असेल तर ते चीननं. जगाला स्वस्त माल विकून तो देश श्रीमंत होत आहे. अमेरिकेची, भारताची व इतर अनेक देशांची व्यापारी तूट (Trade Deficit) चीनमुळे निर्माण झाली आहे. हे नेमाडेंना माहीत असलं असतं तर तो चीनमधला त्यांना भेटलेला लेखक किती खोटं बोलला हे त्यांच्या लक्षात आलं असतं. एका माणसाच्या पूर्वग्रहदूषित विधानावर विश्वास ठेवण्याएवढे नेमाडे भाबडे असतील यावर विश्वास बसत नाही.

सर्वांची समृद्धी एकत्र वाटून घेणारा समाज नेमाडेंना हवा. पण हा हेतू व्यक्त करण्यात जेवढी उदात्तता तेवढाच तो आचरणात आणण्यात कठीण. कारण माणसाचा स्वार्थ त्यात आडवा येतो. जेव्हा एकाच कुटुंबातले दोन भाऊ वडिलोपार्जित मालमत्तेसाठी भांडतात तेव्हा एका देशानं गरीब देशाला आपली संपत्ती वाटून देणं किती दुरापास्त आहे हे लक्षात येईल. सर्वांना गरजेप्रमाणे वाटून द्या हा कार्ल मार्क्सचा साम्यवादी विचार सपशेल फसला हे सोव्हियन युनियन पडल्यापासून आणि चीननं अर्थकारणात बाजाराभिमुख तत्त्व स्वीकारल्यापासून जगाला माहीत झालं. तरी या बुरसं लागलेल्या विचारांचा नेमाडेंसारख्या सुज्ञ साहित्यिकावर परिणाम व्हावा याचं नवल वाटतं.

जगातल्या भाषा झपाट्यानं नामशेष होत आहेत म्हणून ते खेद व्यक्त करतात. १९६१ च्या गणतीत १६५२ भाषा सापडल्या. पण त्यांची संख्या आता खूपच घटली म्हणून अश्रू ढाळण्यात अर्थ नाही. कारण नेमाडेंनी उद्‌धृत केलेल्या गणतीत १२२ भाषांना प्रत्येकी १०,००० पेक्षा कमी अनुयायी होते. अशा लघुभाषा इमितहासजमा झाल्या म्हणून जगाचं फारसं नुकसान झालं नाही. अशा विसर्जनातूनच सर्जनशीलता निर्माण होते.

नेमाडे एकीकडून आपल्या भाषेविषयी अभिमान व्यक्त करतात. तर दुसरीकडून ठिकठिकाणी समांतर मराठी शब्द उपलब्ध असूनही आंग्लशब्द वापरुन मातृभाषेचं पावित्र्य भंग करतात. (Semiskilled – अल्पकुशल, पान १५) (Universal - वैश्विक, पान ९), (International Standards – जागतिक मोजमाप, पान ७), (Cold war –शीतयुद्ध, पान १६), (Hopelessly vague – अपेक्षेपेक्षा संदिग्ध, पान १३), (Established – प्रस्तावित, पान २१) असे इंग्रजी शब्द वापरून ते मराठी माऊलीचा खिमा करतात. माझ्यासारख्या हजारो मैल दूर राहणाऱ्याला त्यांनी वापरलेल्या आंग्लशब्दांचे कंसातले मराठी शब्द माहीत असताना त्यांना ते नक्कीच ठाऊक आहेत यात शंका नाही. सर्वसाधारण मराठी लेखक इंग्रजी शब्दांचा वापर करतो ते आपण सुसंस्कृत व सुधारलेले आहोत हे वाचकांच्या नजरेस आणण्यासाठी. पण नेमाडेंना हा न्यूनगंड जडणं शक्य नाही. कारण ते इंग्रजीचे प्रोफेसर होते. म्हणून त्यांच्यासारख्या नावाजलेल्या ज्येष्ठ लेखकानं मराठीची खिचडी करून आमच्यासारख्या सामान्य लेखकांच्या पातळीला उतरावं हे बरोबर वाटत नाही.

या लेखाचा उद्देश नेमाडेंवर टीका करणं हा नसून अनेक बुरसटलेल्या व कालबाह्य विचारांवर प्रकाश टाकणं हा होय. असे लोक आपण टीव्हीवर नेहमीच बघतो. साप कात टाकतो तसं आपण हे विचार त्यागून नवीन शतकात शिरणं आवश्यक आहे.

**– डॉ. अनंत लाभसेटवार**
2 Scond Street,
Unit # 2001
Jersey City, N.J. 07302
USA
latalabh@aol.com

# जालना शहराच्या रस्त्यावरील कलंदर कवी

**लक्ष्मण राऊत**

जालना शहर पूर्वीपासून जसे व्यापारउदीम आणि उद्यमशीलतेसाठी प्रसिद्ध आहे तसे ते उर्दू कवी आणि मुशायऱ्यासाठीही परिचित आहे. अनेक प्रतिभाशाली उर्दू शायर आणि त्यांना दाद देणारे रसिक या शहराने पाहिलेले आहेत. एकेकाळी उर्दू मुशायरे गाजवणारे रामकृष्ण ऊर्फ शोला यांच्या नावाचा महत्त्वाच्या ठिकाणी चौक निर्माण करणारे हे शहर! अशा या शहरातील महम्मद शमसोद्दीन ऊर्फ शम्स जालनवी हे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेर गेल्या अर्धशतकापेक्षा अधिक काळ मुशायरे गाजवत आहेत.



वयाची पंच्याऐंशी वर्षे उलटून गेलेल्या 'शम्स' यांची प्रकृती आजही चांगली आहे. ते एवढे तंदुरुस्त आहेत की आजही सकाळी पाच वाजता उठून सायकलवरून बसस्थानकात पोचतात आणि तेथे बाहेरून आलेली उर्दू वृत्तपत्रे घेऊन त्यांच्या वाटपासाठी मार्गस्थ होतात. शहरभर सायकलवर फिरून वृत्तपत्रवितरण करणे हा त्यांचा चरितार्थाचा व्यवसाय. पूर्वी काही काळ त्यांनी एका ऑईल मिलमध्ये नोकरी करून पाहिली, परंतु ते काही जमेना म्हणून ते वृत्तपत्रवितरणाच्या कामास लागले. त्यांच्या दोन मुलांपैकी एक सध्या या व्यवसायात त्यांच्या मदतीला आहे. उर्दू वृत्तपत्रांचे ग्राहक कमी आणि साहजिकच यामुळे 'शम्स' यांना वितरणामधून मिळणारे उत्पन्नही मर्यादित. परंतु ते मात्र मोठ्या चिकाटीने, जिद्दीने, उन्हाळा असो की हिवाळा-पावसाळा सायकलीच्या पॅडलवरून लांब-लांब टांगा मारत शहरभर फिरतात. जवळपास पावणेसहा फुटांची उंची, पांढरीशुभ्र दाढी असलेल्या आणि अथक वृत्तीने वावरणाऱ्या 'शम्स' यांचा साहित्यरसिकांना जवळचा परिचय!

शिक्षक असलेल्या थोरल्या भावामुळे त्यांनी शायरीत अधिक रस घेण्यास सुरुवात केली. प्रारंभीचा काळ असा होता की काही मंडळी सलोख्यामुळे त्यांच्याकडून प्रसंगानुरूप शेर-शायरी लिहून घेऊन एखाद्या कार्यक्रमात संचलन किंवा अन्य निमित्ताने सादर करत. परंतु त्यांच्या थोरल्या भावाने 'शम्स' यांना स्वत:च्या नावाने शेर-शायरी सादर करण्याची सूचना केली. त्यानंतर 'शम्स' यांचे शेर-शायरी आणि उर्दू गझलच्या प्रांतातील स्वतंत्र अस्तित्व रसिकांना जाणवू लागले. त्यांची पहिली रचना एका हिंदी मासिकात छापून आली त्यास आता जवळपास पंचावन्न वर्षे उलटून गेली आहेत. ती आठवण आजही 'शेम्स' यांच्या मनात अगदी ताजी असल्यासारखी आहे. त्यापूर्वी त्यांच्या रचना कागदावर जरी उतरल्या तरी त्यास मुद्रित स्वरूप प्राप्त झालेले नव्हते.

*जहर-ए-कातील है, अगर*
*हुस्न तो अमृत भी है*
*एक तवायफ की सोचो*
*वो औरत भी है।*

१९५८ साली छापून आलेली 'शम्स' यांची ही पहिली रचना त्यांची उमेद आणि उत्साह वाढवणारी ठरली. त्यानंतर या पहिलवानाने शायरीची मैफलही गाजवणे सुरू केले. त्यांचे वडील पहेलवान होते आणि तो कित्ता 'शम्स' यांनीही बालपणापासून गिरवण्यास प्रारंभ केला होता. त्यांच्या वयाची आज पंच्याऐंशी वर्षे उलटून गेल्यावरही त्यांच्या तंदुरुस्त प्रकृतीचे रहस्य शरीरसंपत्तीकडे बालपणापासून लक्ष दिलेल्या व्यायामातही आहे. त्यामुळेच हा 'सूर्य' (शम्स याचा अर्थ सूर्य) अरुणोदय होण्याच्या आधीच एवढ्या वयातही सायकल घेऊन जालना शहराच्या रस्त्यावर असतो!

'तमाजत' (सूर्याची उष्णता) हा त्यांचा उर्दू रचनांचा संग्रह



प्रसिद्ध झालेला आहे. २००५ मध्ये हाच संग्रह देवनागरी लिपीत 'मध्यान्ह का सूर्य' या नावाने प्रकाशित झाला. भाव-भावना, सुख-दुःखांच्या आठवणी, विविध पातळ्यांवरील संघर्ष इत्यादींच्या कोलाहलातून मनात उमटणारे प्रतिबिंब 'शम्स' यांच्या रचनांमध्ये उमटलेले दिसते. अनेकदा आपल्या वैयक्तिक पातळीवरील या अनुभवविश्वास व्यष्टीकडून समष्टीकडे नेताना त्यास ते समर्थ, वजनदार आणि भारदस्त शब्दांची जोड देतात. रस्त्यावरच्या गर्दी आणि कोलाहलात फिरतानाही स्वतःच्या जगण्यातील अर्थ शोधताना ते परखडपणे सांगूनही जातात की-

*जर्द-जर्द चेहरे है जख्म दिलके गहरे है*
*वक्त है तमाशाई,*
*वो तसल्ली देते है जख्म पर नमक रखकर*
*खुब है मसाहाई!*

(पिवळे चेहरे आणि काळजातील जखमा खूप खोलवर असून काळ आमचा तमाशा बघत आहे. ते तर खोटे दिलासे देताहेत आणि तेही जखमेवर मीठ चोळून! व्वा, काय पण उपचार आहेत!)

जीवनात कितीही अपेक्षा असल्या आणि आजच्यापेक्षा उद्याचा दिवस अधिक चांगला तसेच मनासारखा उजाडावा असे वाटत असले तरी तसे घडेलच असे नव्हे! जीवनातील संघर्षात ही सर्व धडपड चालू असताना एखाद्या वळणावरील अपयशानंतर कुणी सावरण्याचा प्रयत्न करत असेल तर आसपासची माणसे त्याला साथ देण्याची किंवा सहानुभूती व्यक्त करण्याची भूमिका बजावतीलच याबद्दल शाश्वती नसते. त्यामुळे आपल्या एका 'मुक्तका'त ते म्हणतात-

*बिगडने को संवरने नहीं देती दुनिया*
*कश्ती से उभरने नहीं देती दुनिया*
*जख्मोंपर छिडकती है नमक हस हसकर*
*जख्मों को भी भरने नहीं देती दुनिया।*

वर्तमानपत्रे विकतानाच वर्तमानाचे तटस्थपणे निरीक्षण करणाऱ्या या कवीच्या मनात भूतकाळातील अनेक अनुभवांची जंत्री आहे. अनेकदा कळत असूनही माणूस इतरांकडून चांगल्या अपेक्षा करतो, त्याबद्दल 'शम्स' यांची पुढील रचना प्रसिद्ध आहे-

*मेरा मन कितना पागल है*
*कांटोसे खुशबू की आशा,*
*जहर से जीवन मांग रहा है।*
*सुखे पेडसे छाया मांगे*
*पत्थर दिलसे माया मांगे*
*गुंगेसे वह प्यार की बोली*
*निर्धनसे धन मांग रहा है।*
*खुशबू कागज के फुलोंसे*
*ठंडक भडके हुए शोलोंसे*
*अंधोसे आंखोंकी ज्योती*
*और दर्पण मांग रहा है।*

'शम्स' यांची ही रचना मुशायऱ्यात सर्वांची दाद आणि वन्समोअर घेऊन जाणारी असते. कारण ही रचना ते आपल्या दर्दभऱ्या आवाजात गाऊन सादर करतात. त्यांच्या या सादरीकरणात एक अंगभूत लय आणि सहजता असते. त्यांच्या आवाजातील दर्दभरी तलमता रचनेतील आशयाला अधिकच गहिरेपण देणारी असते. कोणताही मुशायरा असो 'शम्स' यांना या रचनेचे सादरीकरण करावेच लागते. समोर किती संख्येने श्रोते आहेत आणि ते जाणकार आहेत की नाहीत याच्याशी 'शम्स' यांना काही देणे-घेणे नसते. दिल्लीतील अखिल भारतीय पातळीवरचा मुशायरा असो की जालना शहरातील गल्लीबोळातील एखाद्या दुकानातील दोन रसिक असोत, 'शम्स' यांना ही रचना सादर करण्याचा आग्रह होतो आणि तेही तेवढ्यात उत्साहाने ती पेश करतात. ही रचना सादर होताना उर्दू भाषेशी संबंध नसणारा किंवा कोणत्याही भाषेतील कवी संमेलनास हजेरी न लावणारा श्रोता उपस्थित असेल तर तो आपसूक 'शम्स' यांच्याकडे ओढला जातो! ही किंवा अन्य कोणतीही रचना ते सादर करतात तेव्हा त्यामागे उसने अनुभवविश्व नसते, तर त्यामागे अस्सल जीवनानुभव असतो. अनेकदा त्यांच्या गीत, गझल किंवा मुक्तकांच्या स्वरूपातील रचना या वैयक्तिक जीवनातील अनुभवांवर आधारीत




असल्या तरी श्रोत्यांनाही त्याच अनुभूतीची आठवण करवून देणाऱ्या असतात! दिवसानंतर रात्रीचे येणे अपरिहार्य असले तरी ती अनेक आठवणी घेऊन येते हे सांगताना 'शम्स' म्हणतात–

*सो गया सूरज, जागे तारे, आग लगाने आयी शाम*
*भुली–बिसरी याद दिलाकर मनको जलाने आयी शाम।*
*चांद का मुखडा, नैन रसिले रह–रहकर याद आते है*
*कट गया दिन तो जैसे–तैसे, फिर तडपाने आयी शाम।*
*किस को खबर थी, ये जालीम भी मेरे लहू की प्यासी है*
*मैं समझा था, लोरिया गाकर मुझको सुलाने आयी शाम।*
*किससे कहू मैं विपदा अपनी, सोने चले अब तारे भी*
*कल आऊंगी, जाते–जाते याद दिलाने आयी शाम।*
*'शम्स' गिले शिकवे रहने दो, मांग सितारोंसे भर दो,*
*ओढ के सर पे लाल चुनरिया, घुंघट ताने आयी शाम।*

एकीकडे अशी रचना करणारे 'शम्स' अनेकदा स्पष्ट बोलताना म्हणतात–

*चिराग–ए–आरजू–ए–दिल को भडकाने नहीं आता*
*हमे झुठी तसल्ली दे के बहलाना नहीं आता*

जीवनानुभवातील वास्तव आपल्या रचनांमधून मांडताना रसिक श्रोत्यांच्या अंतर्मनास स्पर्शून जाण्याची क्षमता त्यांच्या रचनांमध्ये आणि तिच्या 'तरन्नूम'मधील सादरीकरणात असते. अशाच एका रचनेत ते म्हणतात–

*मोहब्बत हदसे बढ जाने पर*
*कोई गम नहीं होता*
*लगा दो आग पानी में*
*तो पानी कम नहीं होता*
*हमेशा चढते सूरज की ही*
*पूजा 'शम्स' होती है*
*बिगड जाती जब किस्मत*
*कोई हमदम नहीं होता*

जीवनातील नकोशा असणाऱ्या अनेक आठवणी मनात घर करून राहतात आणि त्यांना बेचैन करतात. वैयक्तिक स्वरूपात 'शम्स'च्या अंतर्मनास ढवळून करणाऱ्या या कोलाहलातून त्यांच्या रचना आकारास येतात. या सर्व अनुभवातून ते निराश होत नाहीत तर नव्या उभारीने जगण्यासाठी परमात्म्याकडे पुढील मागणी करतात–

*शिशा हूं, पत्थर का जिगर दे अल्लाह*
*फिरसे मुझे जीने का हुनर दे अल्लाह*

जीवनाविषयी आशावाद ठेवून परमात्म्याकडे ते सहन करण्याची आणि त्याचप्रमाणे ते जगण्याची कला मागणारे 'शम्स' कधी–कधी इतरांना समजुतीने वागण्याचा सल्लाही देतात, तो पुढीलप्रमाणे–

*सबको मनकी बात बताना ठीक नहीं,*
*बदनामी का पेड लगाना ठीक नहीं।*
*प्यार के फुले–फले रिश्ते आबाद रहे,*
*आंगन मे दिवार उठाना ठीक नही।*
*इन्साँही इन्सानों के काम आता है,*
*कर के फिर एहसान जताना ठीक नहीं।*
*हिम्मत है तो जुल्म का सीना चाक करो,*
*कमजोरों पर हाथ उठाना ठीक नहीं।*
*शौकसे तुम दिनरात मनाओ रंगरलीयां,*
*बंद कलींको फूल बनाना ठीक नहीं।*
*रौंदी हुई राहों को मूडकर मत देखो,*
*बीती बातों को दोहराना ठीक नहीं।*
*देखो दुनिया को दुनिया की नजरसे,*
*होशमें आओ 'शम्स' जमाना ठीक नहीं।*

दैनंदिन जीवनात विश्वासघाताचे आणि ज्यांच्यावर भरवसा ठेवला त्यांच्याकडूनच फसवणूक झाल्याचे अनुभव आलेल्यांना 'शम्स' यांची पुढील रचना विचार करायला लावण्यावाचून थांबवू शकत नाही.

*फरेब देने लगे जब मेरे ही साथ मुझे*
*किसी के प्यार का कैसे यकीन आये मुझे।*

*मेरी तो उम्रही कांटोमें सरबसर गुजरी*
*न रास आये चमन के गुलों के साए मुझे।*
*उसे भी दौरे तरक्की की देन ही समझो*
*पराए अपने तो अपने लगे पराए मुझे।*

स्वातंत्र्यपूर्व काळात दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कराचीत पुढील शिक्षण झालेले 'शम्स' स्वत:च्या आणि आसपासच्या जीवनातील द्वंद्वाचे तसेच संघर्षाचे साक्षीदार आहेत. अनेकदा या जीवनातील भोक्त्याच्या भूमिकेतूनही त्यांना जावे लागलेले आहे. परंतु स्वत:कडे आणि आसपासच्या व्यक्तींकडे तटस्थपणे पाहण्याची क्षमता असल्याने ते कवितांच्या माध्यमातून या जीवनानुभवाचे भाष्यकारही बनलेले आहेत. परंतु आपल्या रचनांमधून नेमका जीवनानुभव आणि त्यावर मत मांडणारे 'शम्स' स्वत:च्या मर्यादांची जाणीव नम्रपणे व्यक्त करताना म्हणतात की–

तेरे चेहरे का भरम खुल जाएगा
राह में आइनाखाने बहुत।
'शम्स' रखिए अपनी चादर का खयाल
लग गए तुम पाँव फैलाने बहुत।

असा हा जालना शहरातील कलंदर कवी! वयाची पंच्याऐंशी वर्षे उलटूनही कायम उत्साहात असणारा, उर्दू शायरीवर भरभरून बोलणारा. पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ देशभर अनेक प्रसिद्ध उर्दू कवींसोबत मुशायरा गाजवणारा परंतु त्याचा गर्व न बाळगणारा! अतिशय साधेपणाने जगणारा आणि सायकलीवर फिरणारा हा वयोवृद्ध इसम अनेक मुशायऱ्यांवर अधिराज्य गाजवणारा असेल असे त्यांना प्रथमत:च पाहणाऱ्यांना वाटणार नाही. कोणताही डामडौल नाही आणि अहंकाराचा दर्प नाही अशी अवस्था असणाऱ्या 'शम्स' यांचे साधेपण व्यक्त करायचे तर त्यांच्याच पुढील रचनेचा आधार घेता येईल–

मुझे पुछते है वो इस तरह मेरा नाम ले के गैरसे
सर-ए-शाम क्या वही 'शम्स' था जो अभी यहांसे गुजर गया।

**– लक्ष्मण राऊत**
१५, शांता-गोविंद अपार्टमेंट्स,
डबलजीन, जालना ४३१२१३
भ्रमणध्वनी : ९४२२७९६४७३
laxmanr1234@gmail.com

**ग्रंथाली**




# घडत गेलेली गोष्ट

**विजया राजाध्यक्ष**

**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**

''तुमचं काय चाललंय मॅडम? लेखन वगैरे...''
''विशेष काही नाही गं. बघू काही सुचलं तर. ते आपल्या हातात थोडंच असतं? काहीतरी सापडतं अचानक! पण ते जरी लिहिलं तरी वाटतं, अजून काहीतरी उरलं आहे. मी त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही... एका अर्थानं ते बरंच असतं म्हणा! जाऊ दे, उगाच काहीतरी बोलत बसले.''
कॉफी घेता घेता सुजाता म्हणाली,
''मॅडम, तुम्ही एक कथा लिहीत होतात ना! तुम्ही तसं सांगितल्याचं आठवलं. पूर्ण झाली का ती?''
''छे गं! कथा कधी संपूर्ण, समाप्त होतात का? त्या आपल्या मनात घडतच राहतात!''

# अंतरंग

**विजया राजाध्यक्ष**

**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**




'अंतरंग'मधील लेखांचा कदंब, तळ्यात...मळ्यात, अनुबंध व स्वच्छंद या इतर पुस्तकांमधील लेखांसोबत विचार करताना पुन:पुन्हा जाणवते की, ललितलेख निबंध हा प्रकार खरोखरीच लवचीक, मुक्त आहे. कधी ती कथा असते, कधी संक्षिप्त प्रवासवर्णन, कधी व्यक्तिचित्र, तर कधी व्यक्तिचित्रात अंतर्भूत असलेली समीक्षाही. 'सहा दिवसांचा वानप्रस्थ' या माझ्या दीर्घ ललितनिबंधात, त्या घाटाची ही सगळी रूपे सामावलेली आहेत. तो वाचला की वाटते, आपण या वाटेने अजून चालत राहायला हवे...
कालांतराने थोडीफार चाललेही. ते लेख एकत्रित करण्याची इच्छा होती. 'ग्रंथाली'च्या अगत्यामुळे ती फलद्रूप होत आहे. खरे म्हणजे माझा 'फॉर्म' कथा हाच, पण ललित लेखनाच्या वेगळ्या वाटेने जाताना मन नेहमीच ताजेतवाने राहिले, हे मात्र खरे!

# इंग्रजी पुस्तकांच्या जगात

## अपर्णा पाटील

'तुझ्या नावाचा अर्थ काय?..' एका पठाण मैत्रिणीनं मला एकदा अचानक विचारलेला प्रश्न. 'हे पार्वतीचं नाव आहे. जेव्हा ती शंकराच्या प्राप्तीसाठी अन्नपाणी सोडून व्रत करत होती, त्यावेळी तिनं झाडाची पानंही त्यागली होती म्हणून तिला अपर्णा नाव दिलं गेलं.' या उत्तरानंतर तिची उत्सुकता जागी झाली, 'मग ही सती कोण...?' तिचा प्रश्न. मग माझी उत्सुकता ताणली... 'आता हे काय नवीन?...' त्यावर तिचा प्रश्न 'मेलुहा नाही वाचलं?'

तीनेक वर्षांपूर्वीचा हा संवाद माझ्या कायम स्मरणात राहिला. अमिश त्रिपाठीचं 'द इम्मॉर्टल ऑफ मेलुहा' हे पुस्तक आलं होतं. इंग्रजी पुस्तक वाचणाऱ्यांमध्ये या पुस्तकानं तेव्हा धुमाकूळ घातला होता. मुखपृष्ठावर त्रिशूलधारी पाठमोऱ्या भगवान शंकराचं चित्र होतं. अनेकांच्या हातात अचानक ते पुस्तक दिसायला लागलं. अचानक एवढे सगळे धार्मिक वाचन का करायला लागलेत, हे समजेना. बॉलिवूडचा तरुण दिग्दर्शक करण जोहरनं या पुस्तकावर आपण सिनेमा काढण्यास उत्सुक आहोत, असं जाहीर केल्यावर तर काही दिवसांतच या पुस्तकाच्या प्रती वेगानं विकल्या गेल्या. या पुस्तकानं भारतातील पुस्तकखपाच्या विक्रीचे विक्रम केले आहेत. तीन पुस्तकांच्या रूपात प्रकाशित झालेली ही सिरीज, भारतीय पुस्तक प्रकाशन व्यवसाय आता कोणत्या टप्प्यावर पोचलाय याचं उदाहरण आहे.



अरविंद अडीगा

जगभरात मातृभाषा ही आपल्याला व्यक्त करण्याची सर्वोत्तम भाषा मानली जाते. त्यामुळे भारतासारख्या देशात जिथे अनेक भाषा बोलल्या जातात, तिथे अशा अनेक भाषांतलं साहित्यही मुबलक प्रमाणात लिहिलं गेलं. अगदी संस्कृत ही भाषा गेल्या काही दशकांत वापरात नसली तरी त्यात आर्वजून साहित्यनिर्मिती होत आहे. त्यामुळे आपल्या देशातील मूळ साहित्य आणि अन्य भाषांतून भाषांतरित केलेलं लिखाण असं विपुल साहित्य भारतीय वाचकांना कायम उपलब्ध झालं. शिवाय हिंदीतलं साहित्यही मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झालं.

गेल्या वीस वर्षांत प्ले ग्रूपपासूनच इंग्रजी माध्यमात शिकणारी पिढी मात्र मातृभाषेतल्या साहित्यवाचनापासून दुरावली आहे. ते साहजिकच आहे. त्यामुळेच आपल्या मातृभाषेत व्यक्त होण्याचं, लिहिण्याचं प्रमाणही कमी झालं आहे. तरुण पिढीचं वाचनही मातृभाषेपेक्षा इंग्रजीवर भर देणारं आहे. तसंच त्यांची व्यक्त होण्याची भाषाही इंग्रजी आहे. त्यामुळेच गेल्या दशकभरात इंग्रजीतून लिहिणारी भारतीय लेखकांची संख्या वेगाने वाढत आहे.

काही वर्षांपर्यंत इंग्रजी वाचन, तेही परदेशी लेखकांची पुस्तक मिळवून, हे मोठं दिव्यच होतं. फक्त क्लासिक सदरात मोडणारी पुस्तकं भारतीय पुस्तकांच्या दुकानांत उपलब्ध होत होती. तीही अगदी मोजक्या शहरांत, तिथल्या हातावर मोजता येतील अशा स्टोअर्समध्ये. आता तसं राहिलेलं नाही. परदेशी प्रकाशकांची ताजी इंग्रजी पुस्तकं ताबडतोब भारतात उपलब्ध होत आहेत. अमेरिका, इंग्लडमध्ये प्रकाशित होणारी पुस्तकं, तिथली बेस्टसेलर्स इथे घरबसल्या मिळू लागली आहे. इतकंच नाही तर परदेशात दबदबा असलेल्या अनेक प्रकाशक संस्थांची कार्यालयं आता मुंबई, दिल्ली, बंगळुरूपासून अन्य शहरांतही सुरू झाली आहेत.

देशातील आणि परदेशी प्रकाशन संस्थांकडे आज रोज शेकड्यानं पुस्तकं पाठवली जात आहेत. पुस्तकाचा नंबर लागेल,

या आशेनं अनेक तरुण आपल्या पुस्तकांचे प्रिंटआऊट्स त्यांच्याकडे पाठवत आहेत. पण ही पुस्तकं त्या प्रकाशकांच्या पसंतीला उतरणं आणि त्यांच्याकडून प्रकाशित होण्यासाठी होकार मिळणं, हे अनेकांसाठी रात्रीची झोप उडवणारं आहे. इतकी ही स्पर्धा तीव्र झाली आहे. काही वर्षांपूर्वी बॉलिवूडमध्ये ब्रेक मिळावा म्हणून जसे अनेक तरुण मुंबई गाठत होते, तशीच ही नवी उच्चशिक्षित लेखकमंडळी मुंबई, दिल्लीसारख्या शहरांत पूर्णवेळ लेखक होण्यासाठी येत आहेत. बॉलिवूडप्रमाणे पुस्तक प्रकाशन व्यवसायावरही परदेशी गुंतवणूकदारांची नजर गेलीय, हे लक्षात येतं. लेखक म्हणून नाव कमावणं आता मोठं ग्लॅमरस झालं आहे.



चेतन भगत

भारतीय लेखकांची इंग्रजी पुस्तकं, ही काही नवलाईची गोष्ट नाही. कारण तशी परंपरा आपल्याकडे खूप आधीपासूनच आहे. पॉप्युलर लेखकांमध्ये सलमान रश्दी, अनिता देसाई, अरुंधती राय, विक्रम सेठ, खुशवंत सिंग, किरण देसाई, शोभा डे, अमित चौधरी, अमितव घोष अशी कित्येक लेखकमंडळी आहे. हे लेखक भारतात गेल्या काही दशकांपासून सातत्यानं इंग्रजी लिखाण करताहेत. त्यांचा वाचकवर्गही अफाट आहे. मात्र त्यांचा वाचकवर्ग विशिष्ट वर्गातला होता. आता मात्र तसं राहिलेलं नाही. इथल्या वाचकांना उच्चभ्रू वर्ग ओलांडणारा कथानकातला देसी टच आवडू लागला आहे. ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्सचं 'शांताराम', सुकेतू मेहता यांचं 'मॅक्सिमम सिटी' यांसारख्या पुस्तकांचं यश त्यांच्या शुद्ध देसी असण्यात आहे. रविंदर सिंग– आय टू हॅड अ लवस्टोरी, द मिस्ट्रेस ऑफ स्पाइस – चित्रा बॅनर्जी देवकरुणी, प्रीती शेणॉय– द सिक्रेट विश लिस्ट अशी पुस्तकं लोकप्रिय होण्यासाठी वाचकाचा नवा दृष्टिकोनही कारणीभूत आहे. परदेशी कथाकादंबऱ्यापेक्षा आपल्या आजुबाजूचं वातावरण, भारतीय शब्दांची पखरण असलेलं लिखाण इथल्या वाचकांना आवडू लागलं आहे. चेतन भगत, अमिश त्रिपाठी, रविंदर सिंग यांच्या पुस्तकांना मिळालेला प्रतिसाद पाहता, ते भारतीय तरुणांचे किती लाडके बनले आहेत हे लक्षात येतं. अरुधंती राय किवा अरविंद अडीगा आणि रोहिंग्टन मेस्त्री अशी नावं मॅन बुकरच्या पुरस्काराच्या यादीत पाहिली, की त्यांच्या पुस्तकांवर आपोआपच वाचकांच्या उड्या पडतात.

जेफ्री आर्चर, जॉन ग्रिशम, निकोलस स्पार्क, डेव्हिड बाल्डिची, डॅन ब्राऊन यांसारख्या परदेशी कादंबरीकार लेखकांना भारतीय वाचकांमध्ये विशेष स्थान आहे. डॅन ब्राऊनच्या 'इन्फर्नो'ची पहिली कॉपी मिळवण्याची इथल्या वाचकाला उत्सुकता असते, तशी चेतन भगतच्या रिव्होल्युशन २०२० या पुस्तकाविषयीही चर्चा प्रकाशनापूर्वी जोर धरत असते. आता आठवड्यातल्या टॉप टेन पुस्तकांच्या यादीत निम्मी नावं भारतीय लेखकांच्या पुस्तकांची असतात. पण लेखक आता नुसता लेखक राहिलेला नाही. त्याला नुसतं मी लिहून दिलंय, पुढचं तुमचं तुम्ही पाहून घ्या, अशी भूमिका घेता येत नाही.

पुस्तक प्रकाशकाच्या पसंतीला पडून ते प्रकाशित होण्याची लढाई पार पडल्यानंतरही लेखकाचं काम संपत नाही. आता तुम्ही नुसते लेखक असून भागत नाही तर तुम्हाला तुमचं पुस्तक खपवण्यासाठी एक पीआर लागतो. काही हजारांच्या मोबदल्यात तो आपलं क्रेडिट मार्केट तयार करतो. त्यानंतर तुम्ही लिहिलेलं पुस्तक प्रकाशकाकडे सोपवून भागत नाही. तर आपलं पुस्तक खपवण्याची कला तुमच्याकडे असावी लागते. त्यातून आपल्याच पुस्तकाचा ब्रॅण्ड अम्बेसेडर होणं या लेखकांना भाग पडलं आहे. चेतन भगत आणि अमिश त्रिपाठी यांचं शिक्षण आणि मार्केटिंग मानिसकता लक्षात घेतली तर हे सहज लक्षात येतं.

अमिश त्रिपाठीनं तर पुस्तक खपाचे विक्रम केले आहेत. एका मुलाखतीत त्यानं म्हटलं होतं, की आपलं पुस्तक खपवण्यासाठी जे जे करावं लागेल, ते मी करायला हवं, असं मानतो. शेवटी तेही एक प्रोडक्ट आहे, हे लक्षात घ्यायला हवं.' अमिशचं म्हणणं हे आजच्या भारतीय साहित्याचं चित्र नेमकं कसं आहे, हे दाखवून देणारं आहे. 'द इम्मॉर्टल ऑफ मेलुहा' ही भगवान शंकराविषयीची कल्पित कादंबरी आहे. पण तिला भारतीय वाचकांनी जसं डोक्यावर उचलून घेतलंय, त्यावरूनच ताकभात ओळखायला हवा. भगवान शंकराचं आयुष्य आपण आपल्याच घरातल्या पोथ्यापुराणांतून वाचलं, आजीआजोबांकडून ऐकलंय, तेच इंग्रजी पुस्तकात वाचायला मिळालं. तरीही इथल्या वाचकांनी त्याला उचलून धरलं.

आपलं हे पुस्तक लोकांपर्यंत पोचवण्यासाठी अनिशनं जे–जे केलं ते एखादा बिझनेसमॅनच करू शकतो. अगदी लोकांना पहिल्या प्रकरणाची सॅम्पल कॉपी बुकशॉपमध्ये देण्यापासून कॅश काऊंटरवर

उभं राहून कोणाशीही या विषयावर चर्चा करण्याची तयारी दाखवत अनिशनं या पुस्तकाचं मार्केटिंग केलं. त्यामुळे या पुस्तकाच्या साहित्यिक मूल्यापेक्षाही कमाईचे आकडे महत्त्वाचे ठरले. या पुस्तकानं आजवर बावीस कोटी कमवलेत.

चेतन भगतनं आपल्याच इंजिनीअरिंगच्या शिक्षणाच्या काळातले अनुभव 'फाइव्ह पॉइण्ट समवन'मधून मांडले. हे पुस्तक इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांना आवडलं, कारण पहिल्यांदा कोणीतरी इथल्या तरुणाला काय वाटतं हे लिहिलं होतं. मुलांनी डॉक्टर आणि इंजिनीअर बनावं अशा महत्त्वाकांक्षेनं वाढवलेल्या लाखो मुलांच्या आयुष्यात शिक्षणाच्या महत्त्वाची टक्केवारी यात उलगडली होती. हे सगळं नव्या पिढीला भावणारं होतं. त्यामुळेच चेतन भगत हा तरुणांचा लाडका झाला. त्यामुळे त्याच्या प्रत्येक पुस्तकात आजचा तरुण भारतीय वाचक आपलं प्रतिबिंब पाहतोय. त्यानं आजच्या भारतीय तरुणाईची स्पंदनं मोजली आहेत, तेच त्याच्या पुस्तकाचं यश आहे.


शर्मन जोशी आणि चेतन भगत

चेतन भगतनं आपल्याचं आयुष्याला कादंबरीच्या रूपात मांडलं. तेही सोप्या भाषेत. कोणत्याही उपमा, अलंकारांनी न सजलेली आणि एकही अवघड शब्द न वापरता लिहिलेली त्याची पुस्तकं आजच्या तरुणांना आवडतात. त्याला साहित्य म्हणावं असं काही नाही, पण चेतन भगतला लेखक मात्र म्हणावं अशी मात्र स्थिती आहे. त्यांच्या पुस्तकांना भारतीय साहित्य म्हणावं का, हे वादाला तोंड फोडण्यासारखं आहे. पण तरीही आपण भारतीय लेखकांच्या यादीत त्याचं असणं मान्य केलं आहे.

विकास स्वरूप यांचं 'क्यू अँड ए' हे पुस्तक लिहिलं तेव्हा त्याचे हक्क प्रकाशनापूर्वीच विकले गेले होते. खरं तर त्या पुस्तकाविषयी भारतीय वाचकांमध्ये फारशी खळबळ माजेल असं काही नव्हतं. पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर तीन वर्षांनी त्यावरचा डॅनी बोएलचा सिनेमा आला तेव्हा मात्र लोक पुस्तकाविषयी विचारणा करायला लागले. स्लमडॉग मिलिओनिअरच्या रूपात हा सिनेमा मांडला गेला होता. तेव्हा ते पुस्तकही नव्या कव्हर आणि नावासह पुन्हा लाँच करण्यात आलं. एकूणच काय तर पुस्तकाचं ब्रँडिंग करता आलं पाहिजे, हे भारतीय लेखकांना कळून चुकलंय.

आता पुस्तक प्रकाशन सोहळाही साधा राहिलेला नाही. पुस्तक प्रकाशनाला अभिनेते, गायक बोलावणं गरजेचं झालं आहे. त्यांच्याकडून पुस्तकाचा काही भाग वाचून घेऊन वाचकांमध्ये त्याविषयीची उत्सुकता वाढवणं ही लेखकांसाठी आवश्यक बाब झाली आहे. गाणी, नृत्य अशा सोहळ्यांचा भाग झाला आहे. प्रकाशन सोहळ्यानंतरची कॉकटेल पार्टीदेखील प्रकाशनच्या बजेटमध्ये खर्च वाढवणारी झाली आहे. तरीही पुस्तकं लोकांपर्यंत पोचवण्यासाठी ते गरजेचं झालं आहे. नाही तर बॉक्सर मेरी कोमच्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी अमिताभ बच्चन कशाला हवाय, हा प्रश्न आता आपल्याला पडत नाही. ही सगळी पुस्तकं प्रकाशनाची नवी मार्केटिंग स्ट्रॅटजी झाली आहे.

चकाचक पुस्तक प्रकाशन सोहळ्यातून लेखकांची एखाद्या बॉलिवूडस्टारप्रमाणे इमेज मांडण्याचा नवा अजब प्रकार सुरू झाला आहे. शेवटी पुस्तक चांगलं आहे की वाईट त्यावरच त्याचं यश अवलंबून असतं. ते आजच्या या लेखकांनाही मान्य आहे हे विशेष. पण ते आधी लोकांपर्यंत तरी पोचू दे, अशा अपेक्षेनं लेखक मंडळी आपल्या लिखाणाबरोबरच त्याच्या मार्केटिंगमध्ये भाग घेऊ लागली आहेत. त्याहीपेक्षा वाचकाला आता स्वतःच्या आवडीपेक्षा वाचनासाठी काय काय उपलब्ध आहे, याची सहज माहिती उपलब्ध होतेय. सिनेमांच्या रिव्ह्यूप्रमाणे काही दिवसांनी पुस्तकच्या दर्जासाठी स्टार दिले तर तेही आणखी सोप्पं होऊन जाईल.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# व्यंगचित्रांत बुडालेला व्यंगचित्रकार – सुरेश सावंत

**प्रभाकर वाईरकर,** व्यंगचित्रकार



जीवनातील सुरुवातीच्या स्पर्धात्मक काळात व्यक्तीच्या ठायी असलेला एखादाही पूरक गुण त्याच्या आयुष्यात अलौकिक यशाची ओंजळ भरभरून रीती करतो... गायकाला इतर अंगे व्यवस्थित मांडता आली नाहीत तरीही त्याने रागाची ज्या प्रकारे मांडणी केली तो गुण; संपूर्ण चित्रपट रटाळ पण त्याचे उच्च, सुरेख अव्वल संगीत; चौकार-षटकारांची आतषबाजी नाही, परंतु 'कॉपी बुक' स्टाईलने काढलेली एक-एक धाव; कायदे, रेळ, उठाण, तुकडे, पेशकार यांची रेलचेल नसूनही बोलांचा योग्य 'निकास'.. पेंटिंगमध्ये इतर गुणांची कमतरता असूनही त्यामध्ये नीटनेटकेपणा, त्याचप्रमाणे शालेय अभ्यासामध्ये गणित, इंग्रजी, सायन्स अशा विषयांची कमी जाण, परंतु चित्रकला व हस्ताक्षर यामध्ये विशेष कलाकारी. अशाच कलाकारीने एका व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्याला कलाटणी मिळाली. भारतखंडामध्ये एका व्यंगचित्रकाराची 'एन्ट्री' झाली. त्या प्रसिद्ध व्यंगचित्रकाराचे नाव सुरेश सावंत.

मुंबईमध्येच जन्म, आई-वडिलांसोबत, सुरेश व एक लहान भाऊ असे कुटुंब. लहानपणी ऐतिहासिक व पौराणिक चित्रपट डोळ्यांसमोर सतत झळकत. त्यामुळे लहान भावाबरोबर घरातील कोबा लादीवर देवदेवता, राजे-राण्या, महाल, युद्ध, शूर पुरुष यांची चित्रे घरभर सफेद खडूने काढणे हा छंद. चित्रकला व सुवाच्य अक्षर यामुळे गणित-सायन्स यामध्ये 'ढ' असूनही कधीही 'शून्य' मार्क मिळाले नाहीत. चांगले हस्ताक्षर आणि छान आकृत्यांना ५ मार्क मिळायचे!

शालेय शिक्षणाकडून माध्यमिक शिक्षणाकडे पावले पडत होती आणि त्याच वेळी विचार, आवडीनिवडी बदलत होत्या. पुस्तकाच्या जगातून वर्तमानपत्राच्या जगामध्ये मन रमू लागले. वर्तमानाची जाणीव करून घेता घेता त्यामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या व्यंगचित्रकांकडे मन रेंगाळू लागले. नरजेने व मनाने व्यंगचित्रांचा अभ्यास सुरू झाला. फ्री प्रेस जर्नल, नवशक्ती, टाइम्स ऑफ इंडिया, इलेस्ट्रेटेड विकली यामध्ये प्रसिद्ध होणारी व्यंगचित्रे खुणावू लागली. त्यामध्ये बाळासाहेब ठाकरे यांची मार्मिक व्यंगचित्रे पाहण्याचे वेडच लागले. टाइम्स ऑफ इंडियातील 'दि लिटल वुमन' व 'स्कॅप' या चित्रमालिका तर 'इलेस्ट्रेटेड विकली'मधील वॉल्ट डिस्ने यांची 'अंकल रेमन' या चित्रमालिका विशेष आवडायला लागल्या. वेगवेगळी वर्तमानपत्रे, नियतकालिके पाहण्याचा-ती धुंडाळण्याचा ध्यास लागला. असे करत असताना अचानक एके दिवशी 'रमकडू' हे लोकप्रिय गुजराती साप्ताहिक हाती लागले. त्यामध्ये 'सिठी मिठी पेपे' या शीर्षकाखाली प्रसिद्ध चित्रकार अबीद सुरती यांची अफलातून चित्रमालिका प्रसिद्ध होत होती. मालिका गुजराती असूनही सावंत हे त्या चित्रमालिकेच्या प्रेमात पडले. एवढे, की त्यांनी ते साप्ताहिक नेहमी विकत घ्यायला सुरुवात केली व गुजराची भाषा अडखळत-अडखळत वाचून व समजून घेण्याचा प्रयत्न करू लागले.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ मुंबईत टीपेला पोचली होती. त्याच रणधुमाळीत 'नवयुग'मधून बाळासाहेब ठाकरेंची भेदक, मार्मिक व्यंगचित्रे समाजमन ढवळून टाकत होती. त्यांच्या ब्रशचा एक-एक फटकारा 'मुंबईवाल्यांच्या' मनामध्ये संयुक्त महाराष्ट्राचा स्वाभिमान जागृत करत होता. अशा जाज्वल्य व्यंगचित्रांचा परिणाम म्हणजे आपणही व्यंगचित्रे रेखाटली पाहिजेत अशी ऊर्जा सावंत यांच्या मनामध्ये जागृत झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीने मुंबई महाराष्ट्रास मिळाली. (आजच्या परिस्थितीत खरोखरच 'मुंबई महाराष्ट्राची आहे का?') अनेक नेते, लेखक, कार्यकर्ते चळवळीने दिले. तसाच एक व्यंगचित्रकारही 'सावंत' यांच्या रूपात जन्माला घातला, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

सावंत यांचे कॉलेजचे दिवस सुरू झाले, पण मनात ध्येय एकच होते. व्यंगचित्रकार बनण्याचे. रविवारच्या मॉर्निंग शोला जाऊन ॲनिमेशन फिल्म्स पाहण्याचा सपाटा लावला. कॉलेजमध्ये

लेक्चर चालू असताना सावंत वहीच्या मागच्या पानावर नेहमीच व्यंगचित्र काढण्यात मश्गुल असत. त्यांच्या शेजारी विजय केणी बसायचा. त्याला त्यांची 'आवड' एवढी भावली की त्याने स्वत:च्या कमर्शियल आर्टिस्ट भावाकडून चांगल्या प्रतीचे ब्रश, पेन्सिल्स, इंक, रंग सावंतांना व्यंगचित्रे रेखाटण्यास आणून दिले आणि प्रोत्साहितही केले. याच विजयने सावंत यांची भेट बाळासाहेब ठाकरे यांच्याशी घडवून आणली.



बाळासाहेबांनी त्यावेळी 'मार्मिक' साप्ताहिक सुरू केले होते व त्यामध्ये 'रविवारची जत्रा' हे व्यंगचित्राचे सदर बाळासाहेब चितारत. व्यंगचित्र कसे रेखाटावे, त्यांची खुबी, त्यातील विनोद याचे धडे बाळासाहेब सावंत यांना देऊ लागले. अशा या विनोदाच्या निखळ धबधब्याच्या रोमांचित अनुभवात सावंत डुंबू लागले आणि जुलै १९६१ साली त्यांचे पहिले व्यंगचित्र 'मार्मिक'मध्ये प्रसिद्ध झाले.

त्यांची व्यंगचित्रशैली म्हणजे पेन आणि काळ्या शाईच्या रेषा. सर्वसाधारणपणे एकाच जाडीच्या रेषा, क्वचित जाड-बारीक रेषांचा वापर. व्यक्तिचित्रे भारतीयच वाटतात. इतर व्यंगचित्रकारांप्रमाणे पाश्चात्त्य शैलीचा वापर केलेला दिसत नाही. व्यक्तिरेखा रेखाटताना त्यांच्या आकारामध्ये वा प्रमाणबद्धतेत कमीत कमी अतिशयोक्तीचा वापर केलेला आढळतो. परंतु विचार वा




संकल्पनेत भरपूर अतिशयोक्तीचा वापर जाणवतो. आवश्यक त्या ठिकाणी बारकावे काढण्याची पद्धत मनाला भावते. चित्रामध्ये बारकाव्यांचा वापर केला असला तरीही ते समजायला साधे-सोपे वाटते.

सावंत शब्दविरहित व्यंगचित्र काढण्यात तरबेज आहेत. तरीही जो संदेश द्यायचा त्याच्या परिणामामध्ये तसूभरही कमतरता जाणवत नाही.

उदा. १. पाऊस भरपूर असूनही शहराच्या ठिकाणी नळाला थेंबभरही पाणी नाही, हे दाखवण्यासाठी भरपावसात छत्री घेऊन नळातून पाणी मिळण्यासाठी प्रतीक्षा करणारी व्यक्ती. अतिशय मार्मिक संकल्पना.

२. स्वतंत्र भारतामध्ये लग्न झाल्यानंतर भारतीय नारीवर पुरुषी वर्चस्वाची बंधने कशी पाडतात हे दाखवण्यासाठी सौभाग्य लेणं असलेलं कुंकू हाच न पेलणारा लोखंडाचा गोळा साखळदंडाने डोक्यावर अडकवलेला दाखवला आहे. समाजामध्ये स्त्रीला पुरुष कसा बंधनात ठेवून आपली गुलाम बनवतो याचे उत्तम चित्रण त्यांनी केले आहे.

३. राजकीय भाष्य करताना मनमोहन सिंग यांचे सरकार सोनिया गांधींपुढे कसे हतबल आहे हे दर्शवण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग हे सुपरमॅन (पंतप्रधान) असूनही त्यांच्या हालचाली, विचारस्वातंत्र्य, निर्णयक्षमता वगैरे कचकड्याच्या बाहुलीसारखी आहे आणि भ्रष्टाचार, धर्मांधता, अतिरेकी अशा समाजविघातक प्रवृत्ती मोकाट असूनही सोनिया नियंत्रित डॉ. मनमोहन सरकार निष्क्रिय दाखवण्यासाठी (डॉ. मनमोहन सिंग यांच्या) सुपरमॅनच्या वस्त्राखाली समाजविघातक व्यक्ती लपलेल्या दाखवल्या आहेत. अतिशय परिणामकारक भाष्य...!

४. समाजामध्ये श्रीमंत-गरीब यांची दरी एवढी रुंदावली आहे की एकजण पोट फुटेपर्यंत अन्न घशात कोंबतो आहे तर दुसऱ्या व्हिज्युअलमध्ये गरीब आई आपल्या भुकेने तडफडणाऱ्या मुलाला सांगते, 'आज उपवास कर आणि उद्यासाठी अन्नाची साठवण कर'... समाजाच्या डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन...

मार्मिकमध्ये व्यंगचित्र प्रसिद्ध झाली आणि सावंतांनी अनेक प्रकाशनांसाठी व्यंगचित्रे चितारण्यास सुरुवात केली. त्यात किर्लोस्कर, स्त्री, मनोहर वगैरेचा समावेश आहे.

आजारी आईचे पाय चेपत असताना अचानकपणे पाच रुपयांची किर्लोस्कर मासिकामधून व्यंगचित्रासाठी आलेली मनिऑर्डर सावंताच्या हाती पडताच त्यांच्या आजारी मातेने कृश हाताने पाठीवर जी 'माया' पांघरली ते सांगताना ते आजही भावुक होतात, तेच त्यांचे पहिले बक्षीस!




ते सतत व्यंगचित्रे चितारत होते. 'टाइम्स ऑफ इंडिया' समूहातील व्यंगचित्रे पाहताना आपलीही व्यंगचित्रे 'टाइम्स'मध्ये प्रसिद्ध व्हावीत अशी आशा त्याच्या मनामध्ये उचंबळून येत होती आणि एके दिवशी 'टाइम्स'च्या मराठी विभागासाठी 'भाषांतरकार-कारकून' पाहिजे अशी जाहिरात आली आणि त्यासाठी सावंतांनी आपल्या सुबक अक्षरामध्ये अर्ज केला... त्यांची निवड झाली. परंतु व्यंगचित्रकार होण्याची आस पूर्ण होत नव्हती. पुन्हा एकदा सावंतांच्या मोत्याच्या दाण्यासारख्या हस्ताक्षराने हात दिला. त्यावेळी इंद्रजाल कॉमिक्स प्रसिद्ध करण्याचे योजत होते व त्यासाठी चांगलं हस्ताक्षर असणाऱ्या सावंतांची निवड झाली. आता सावंत टाइम्सच्या कला विभागात 'लेटरिंग असिस्टंट' म्हणून रुजू झाले. त्याच वेळी 'धर्मयुग', 'पराग', 'माधुरी' या हिंदी नियतकालिकांमधून त्यांची चित्रे तर इलेस्ट्रेटेड विकली या इंग्रजी साप्ताहिकातही त्यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध होत होती. 'बंबैया', 'इव्हिनिंग न्यूज' सायंदैनिकामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या व्यंगचित्रमालिकेमुळे सावंत प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहू शकले नाहीत. त्यांचे आवडते व्यंगचित्रकार, पेंटर, नाट्यलेखक, समीक्षक अबीद सुरती यांच्याशी ओळख झाली. आंधळा मागतो एक... या उक्तीप्रमाणे सुरती यांनी 'रंग' या हिंदी नियतकालिकेचे मुखपृष्ठ व इतर व्यंगचित्रे चितारण्याची जबाबदारी त्या नियतकालिकाच्या संपादकांकरवी सावंत यांच्यावर सोपवली. आता सावंत यांची घोडदौड सुरू झाली. गेली ४० वर्षे सावंत 'रंगा'साठी मुखपृष्ठ व व्यंगचित्रे चितारत आहेत.

जशी बाळासाहेब ठाकरे यांनी सावंतांमध्ये व्यंगचित्रकलेची ज्योत निर्माण केली, त्याचप्रमाणे इकॉनॉमिक टाइम्सचे संपादक, अर्थतज्ज्ञ, संयुक्त राष्ट्र संघटनेत उच्च पदावर काम केलेले डॉ. हॅनन इझिकल यांच्या प्रोत्साहनाने टाइम्स समूहाच्या इंग्रजी वर्तमानपत्राच्या मुखपृष्ठावर व्यंगचित्र प्रसिद्ध होण्याचे स्वप्न, 'इकॉनॉमिक टाइम्स'च्या मुखपृष्ठावर व्यंगचित्र प्रसिद्ध झाल्याने पूर्ण झाले. अतिशय हुशार, मनमिळावू, स्पष्ट वक्ता असलेल्या डॉ. इझिकल या संपादकाबरोबर घालवलेले क्षण सावंतांच्या कलाजीवनात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्याजोगे आहेत. परिसाच्या संपर्कात आल्यानंतर लोखंडाचे जे होते, तोच परिणाम डॉ. इझिकेल यांच्या संपर्कात आल्यानंतर सावंतांच्या बाबतीत झाला... त्यांच्या व्यंगचित्रकार जीवनाला संपूर्ण कलाटणी मिळाली.

इकॉनॉमिक टाइम्समुळे सावंतांची व्यंगचित्रे जग धुंडाळू लागली. आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये पुनर्मुद्रित होऊ लागली.

असाच प्रवास सुरू असताना कॅनडातील मॉंट्रियल येथे विश्व व्यंगचित्रप्रदर्शनात सावंत यांचे लागलेले व्यंगचित्र हंगेरियन/अमेरिकन व्यंगचित्रकार 'जो झॅबो' यांच्या पाहण्यात आले. झॅबो हे त्यावेळी आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र मासिक काढत होते. त्या मासिकाच्या संपादक मंडळात भारतीय संपादक म्हणून सावंत यांची निवड त्यांनी केली. १९८६ साली 'विटी वर्ल्ड' या नावाने ते प्रसिद्ध झाले, ज्यामध्ये जगातील नामवंत व्यंगचित्रकारांची व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली.

अशा प्रकारे सावंत यांची मजबूत आणि विश्वासपूर्वक पावले जगाच्या पाठीवर पडू लागली. १९८७ साली त्यांना रशियाला जाण्याचा योग आला. तिथे त्यांनी अनेक ॲनिमेशन स्टुडिओंना भेटी दिल्या व त्यातून नाविन्याचा अनुभव घेतला. १९८८ टाइम्स ऑफ इंडियामधून निवृत्ती पत्करली. २४ वर्षांच्या सेवेनंतर पुढे




मुक्त व्यंगचित्रकार म्हणून वाटचाल सुरू केली.

जर्मनीतील एका पाक्षिकासाठी ते व्यंगचित्रे पाठवत राहिले. १९९० साली हंगेरीतील बुडापेस्ट येथे विश्व व्यंगचित्र संमेलनात त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. या संमेलनाच्या निमित्ताने त्यांनी युरोपमधील अनेक आर्ट म्युझियम्स, व्यंगचित्र संग्रहालय, नियतकालिकांच्या कचेऱ्या, संपादक, लेखक, चित्रकार यांच्या गाठीभेटी घेतल्या व भन्नाट कल्पना असलेल्या अनेक व्यंगचित्रांचा आनंद लुटला. १९९३ साली अमेरिकेतील टेम्पल विश्वविद्यालयातील प्राध्यापक डॉ. जॉन लेन्ट यांनी व्यंगचित्रकार व व्यंगचित्रकला या विषयावर जगभर फिरून संशोधनपूर्ण मौलिक लिखाण केले. त्या द्वैमासिकाचे नाव 'दि जर्नल ऑफ इंटरनॅशनल कॉमिक आर्ट' आणि याच नियतकालिकाच्या संपादक मंडळावर सुरेश सावंत यांची नेमणूक झाली.

२००० साली दूरदर्शनने तयार केलेल्या माहितीपटात (डॉक्युमेंटरी) 'दि एमिनन्ट कार्टुनिस्ट ऑफ इंडिया' यामध्ये सावंत यांच्या जीवनातील मौल्यवान प्रसंगांवर २९ मिनिटे चित्रण केले आहे. सावंत यांना अनेक पुरस्कार मिळाले. परंतु त्यातील महत्त्वाचा म्हणजे २००५ साली, जागतिक पातळीवर प्रसिद्ध अशा विश्व व्यंगचित्र स्पर्धेमध्ये, 'युनायटेड नेशन्स मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स' या विषयावर मिळालेला पहिल्या क्रमाकांचा पुरस्कार.

२००६ साली फ्रँकफर्ट-जर्मनी येथे 'इंडिया अॅट अ ग्लान्स' या भारतीय व्यंगचित्रकारांवर आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक झाली आणि त्यांचा त्या ठिकाणी सन्मानही करण्यात आला.

२०१० साली भारतातील 'कार्टुन वॉच' नावाच्या मासिकाने जीवनगौरव पुरस्कार देऊन सावंत यांच्या व्यंगचित्र जीवनाला मानवंदना दिली.

उत्तरोत्तर चढत जाणाऱ्या प्रगतीच्या आलेखाबद्दल काय वाटते असे विचारता नेहमीचे विश्वासपूर्ण हास्य आणि किलकिले डोळे ते करून सांगतात, ''ईश्वराने, मला तीन वरदानं दिली- उत्तम हस्ताक्षर, चांगली प्रकृती व बऱ्यापैकी व्यंगचित्रं काढण्याची कला.''

आज ७२ व्या वर्षीही, बाळासाहेब ठाकरे यांनी १९६१ जो उपदेश केला त्याचे तंतोतंत पालन ते करत आहेत- ''सतत प्रॅक्टिस करत राहा. काहीही झालं तरी व्यंगचित्रं काढण्याचा 'रियाज' थांबवू नकोस...''

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# मला स्वत:पेक्षा माझं आणि माझ्या संस्थेचं नाटक रंगभूमीवर यावं असंच वाटत राहिलं – अरुण काकडे

**आशुतोष गोडबोले**




''मला, मी स्वतः कलाकार असलो तरी स्वतःपेक्षा माझं आणि माझ्या संस्थेचं नाटक रंगमंचावर यावं असंच वाटत राहिलं. आजही वाटतं. इथून पुढेही तेच करण्याची इच्छा आहे'' ज्येष्ठ नाट्यकर्मी अरुण काकडे यांनी दादर –. माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये रंगलेल्या 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन', 'साने केअर ट्रस्ट' आणि 'ग्रंथाली' यांच्या विद्यमाने आयोजित 'माधवबाग कृतार्थ मुलाखतमाले'त अशी भावना व्यक्त केली. नाटकाचा प्रवास चालू राहिला पाहिजे अशा आशयाच्या त्यांच्या बोलण्यातून ते आणि त्यांची नाटके यांच्यातील एकात्मता प्रत्ययास येत राहिली. कार्यक्रमात विश्वास काकडे लिखित 'ग्रंथाली' प्रकाशनाच्या 'मनाचे कवडसे' या पुस्तकाचे अरुण काकडे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

नाट्यसमीक्षक रवींद्र पाथरे यांनी अरुण काकडे यांना बोलते करत त्यांच्या आयुष्याचा पट उलगडला. नाट्यक्षेत्रात काकडेकाका या नावाने ओळखले जाणारे 'काका'ही आठवणींमध्ये रमले. त्यांनी त्यांच्या लहानपणीचा काळ कष्टप्रद अन् हलाखीचा होता असे सांगत नाटकाचे सादरीकरण आणि वाचिक अभिनयाचे बीज लहानपणच्या घटनांमध्ये रूजले गेले असावे असा अंदाज व्यक्त केला. नाट्यक्षेत्रातील स्वतःच्या पहिल्या प्रयत्नांचा मागोवा घेत त्यांनी शिक्षणासाठी पुण्याला येणे, तिथे भालबा केळकर यांच्याशी झालेली ओळख, मग एकत्रितपणे बसवलेली महाविद्यालयीन नाटके अशा घटना सांगितल्या. पुढे अरुण काकडे पीडीएतला झदः पाठीशी घेऊन मुंबईला आले. त्यांची तिथे ओळख अरविंद देशपांडे आणि विजया मेहता यांच्याशी झाली. त्या भेटीच्या आठवणीने काकडे यांचा स्वर कातर झाला होता.

'तुघलक' नाटकात प्रसिद्ध अभिनेते अरुण सरनाईक (२ ऑगस्ट १९७१) काकडे त्यांच्या शांत, हळुवार आवाजात बोलत राहिले. त्यांच्या सांगण्यात 'रंगायन'च्या उभारणीआधीचा काळ, विजया मेहता–अरविंद देशपांडे–भालबा – विजय तेंडुलकर – श्री. पु. भागवत अशा मोठ्या व्यक्तींचा त्यांना लाभलेला सहवास, रंगायनची झालेली स्थापना, त्यांनी केलेली नाटके, त्यांना आवडलेल्या इतरांच्या भूमिका, 'शितु', 'मी जिंकलो ... मी हरलो... ' किंवा 'शांतता कोर्ट...', 'तुघलक' यांसारख्या मैलाचा दगड ठरलेल्या नाटकांची निर्मिती अशा बऱ्याच घटना येत राहिल्या. त्या साऱ्यांतून ते आपसूकच मराठी नाट्यक्षेत्राचा एक महत्त्वाचा काळ प्रेक्षकांसमोर उभा करत गेले. शेवटी नाटक उभे करण्याची हातोटीच त्यांची! त्यांच्या कथनामधूनच नाटक उभे राहिले. काकडे यांनी त्यांच्या प्रांजळ बोलण्यातून कडू – गोड आठवणी सांगितल्या. त्यांनी 'शांतता ... कोर्ट चालू आहे' या नाटकातील सुलभा देशपांडे यांनी साकारलेली बेणारेबाई आणि 'चांगुणा' या नाटकातील रोहिणी हट्टंगडी यांनी उभी केलेली सगुणा या मराठी रंगभूमीवरील दोन अजरामर भूमिका असल्याचे सांगितले. मुलाखतीस उपस्थित असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे, रामदास भटकळ, सुधीर नांदगावकर, सतीश जकातदार, श्रीकांत लागू, अनंत भावे अशा नामांकित व्यक्तीदेखील प्रेक्षकांप्रमाणे

त्या आठवणींमध्ये रंगून गेल्या होत्या.

पाथरे यांनी काकडे यांना विजया मेहता आणि तशाच इतर व्यक्तींच्या त्यांच्या संस्थेशी असलेल्या मतांतरांबद्दल विचारले. अरुण काकडे यांनी त्या सर्व प्रश्नांना मोकळेपणाने उत्तरे दिली. छबिलदासमध्ये प्रयोगशीलता नव्हती असे विजयाबाईंचे म्हणणे आहे, या पाथरे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना काकडे म्हणाले, ''प्रयोगशीलता ही व्यक्तिसापेक्ष असते. छबिलदासने एवढी चांगली नाटके रंगभूमीवर आणली, ती प्रयोगशीलता असल्याशिवाय का? आणि शेवटी प्रयोगशीलता म्हणजे तरी काय, तर संहिता वाचून डोक्याला झिणझिण्या येतात आणि मनास अस्वस्थता येते आणि तो प्रयोग करणे ही निकड वाटून तो उभा केला जातो. त्यालाच तर प्रयोगशीलता म्हणायचे ना!'' काकडे यांनी पुढे असे नमूद केले की, विजया मेहता छबिलदासमध्ये कधीही आल्या नाहीत. मात्र त्या सांगण्यात कटुतेचा स्पर्श नव्हता.

काकडे केवळ आणि केवळ त्यांच्या नाटकांबद्दल, त्यातील माणसांबद्दल आणि नाट्यसंस्थांबद्दल बोलत राहिले. त्यांच्या बोलण्यातून प्रत्येक टप्प्यानुसार नाट्यसंस्थेमधील त्यांची जबाबदारी आणि बदलती भूमिका स्पष्ट होत गेली. त्यांचे आधी असलेले कलाकाराचे रूप, मग त्यास चढलेला सूत्रधाराचा रंग आणि त्यानंतर संस्थेचा आधारस्तंभ अशा कलाकार ते पडद्यामागचा सूत्रधार या त्यांच्या बदलत्या भूमिकांचा प्रवास आणि वेळोवेळची विचारधारा प्रत्ययास येत गेली.

काकडे यांनी सांगितलेल्या आठवणींमधून नाटक हे माध्यम, त्यांनी निर्मिती केलेली नाटके, उभारलेल्या संस्था यांबद्दलची त्यांची बांधिलकी व निष्ठा संयतपणे व्यक्त झाली. त्यांनी रंगमंचावर न राहता रंगमंचामागे सूत्रे सांभाळल्यानंतरही त्यांची सावली रंगमंचावर दिसत राहिली. त्यांनी चालवलेल्या छबिलदास चळवळीच्या धडपडीच्या काळात त्यांनी जुन्या विचारांना फाटा देत सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा जो प्रयत्न केला तोच पुढे त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग ठरला. त्यांचा एकूण नाटक आणि नाट्यकलावंत यांकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोन जाणवत राहिला. तेच त्यांचे कर्तृत्व होय. त्यांनी त्या संदर्भात 'दुर्गा झाली गौरी' या पिढ्यानुपिढ्या चालू असलेल्या नाटकाचा उल्लेख केला. ते म्हणाले, ''असे नाटक मराठी काय भारतीय रंगभूमीवरही झालेले नाही.'' तीच गोष्ट महेश एलकुंचवार यांच्या 'नाट्यत्रयी'बद्दलही त्यांनी सांगितली. ते म्हणाले, की सलग आठ तास चाललेले आणखी नाटक आहे कुठे? 'आविष्कार' ने तो प्रयोग साधला.

पाथरे यांनी 'आविष्कार'च्या पुढील वाटचालीकडे कटाक्ष टाकताना 'तुम्ही आतापर्यंत दुसरे काकडेकाका का तयार केले नाहीत? असा प्रश्न केला असता काकडे म्हणाले, की दुसरा काकडे तयार करता येत नाही. तो उपजत असावा लागतो.

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'कडून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात आले असून संयोजकांकडून इच्छुकांना त्या टेप्स उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**– आशुतोष गोडबोले**
thinkm2010gmail.com
022 hasta 24.183.710




# सारांश शून्य

## संजय कळमकर

आपल्या भोवतीचं एकही क्षेत्र असं नाही की ज्यात आज भ्रष्टाचार अनुभवास येत नाही. या स्थितीचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे, तिनं माणसातलं माणूसपण, संवेदनशीलता, उपक्रमशीलता हे आणि असे सगळेच गुण गिळून टाकले आहेत आणि माणसाला अंतर्बाह्य हिडीस, ओंगळवाणं करून टाकलं आहे.

अशा परिस्थितीत, या सडलेल्या व्यवस्थेच्या विरोधात आजची तरुण पिढी निकरानं, अभिमन्यूच्या त्वेषानं लढू पाहते आहे.

या व्यवस्थेतच असणारे आणि सजगपणे परिस्थितीला सामोरं जाणारे तरुण लेखक संजय कळमकर हे त्यापैकी एक. त्यांनी शिक्षणक्षेत्रातली भ्रष्ट व्यवस्था थेटपणे, पण डोळसपणे; चिंतनशील वृत्तीनं अनुभवली आहे; याचं भान देणारी, नारायण जगदाळे या शिक्षकाची, व्यवस्थेत राहूनच तिच्या विरोधात लढण्याचा निश्चय करणाऱ्या तरुणाची ही कथा... चित्रदर्शी आणि प्रत्ययकारी...

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

# हितवर्धिनी सभेचे स्वा. सावरकर वाचनालय व

# ग्रंथाली ठाणे केंद्र आयोजित

## वाचकदिन : संवेदनशील कवयित्री इंदिरा संत जन्मशताब्दी

विद्यार्थी मित्रांनो,

मराठीतील एक श्रेष्ठ कवयित्री, इंदिरा संत ह्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या कविता, कथा, बालकविता तसेच अन्य प्रसिद्ध कवयित्रीची एक कविता – अशा दोन साहित्य कृतीवर आधारित कार्यक्रम, आपण करणार आहात. कार्यक्रमस्थळी वेळेवर या.

**लक्षात ठेवा :**

१) प्रत्येक शाळेची इ. ७ व ८ मधील, शक्यतो ५ मुले भाग घेतील.

२) कोणत्या दोन कविता / कथा सादर करावयाच्या आहेत; हे आपल्या शिक्षकांनी आपणास सांगितलेच आहे.

३) ८ ते १० मिनिटांत तो प्रसंग सादर करावयाचा आहे.

४) शाळेच्या युनिफॉर्ममध्ये यायचे आहे. नृत्य/नाट्य सादर करणारे अनुरूप पोषाखात येतील.

५) येताना स्वत:ची पाण्याची बाटली आणण्यास विसरू नका.

६) प्रत्येक भाग घेणाऱ्यास एक पुस्तक व खाऊ दिला जाईल.

७) दोनही दिवशी प्रत्येकाने हजर राहायचे आहे.

विशेष सूचना :

१) **कार्यक्रमस्थळी 'ग्रंथाली'ची उपलब्ध पुस्तके ४०% सवलतीचे मिळतील. त्याचा लाभ घ्यावा.**

२) कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. तेव्हा आपले पालक, मित्रमैत्रिणींना मुद्दाम बरोबर आणा.

**शनिवार, दि. ११ व रविवार, दि. १२ जानेवारी २०१४**
**वेळ : दोनही दिवशी दुपारी ३ ते ६.३० पर्यंत**
**स्थळ : स्वा. सावरकर वाचनालय, उमा नीळकंठ व्यायामशाळा मैदान, ब्राह्मण सोसायटी, ऑफ गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.)–२**

**विद्याधर दामले** — अध्यक्ष
**प्रशांत नवरंगे** — कार्याध्यक्ष
**समीर काळे** — कार्यवाह

स्वा. सावरकर वाचनालय, ठाणे

सौ. नंदिनी बर्वे – अविनाश बर्वे
बी–१०६, सुचेता, सिद्धेश्वर तलावाजवळ, पाटीलवाडी, ठाणे–१. फोन : २५३३७२५

श्रीधर गांगल
डी–९०६, सुमेर कॅसल, मीनाताई ठाकरे चौक, लालबहादूर शास्त्री मार्ग, ठाणे–१. फोन : २५४७१७९५

STATE BANK NRI SERVICES
Your global link to India

*It's like taking a loan from family, for family !*

SBI NRI loans that fulfill your dreams , back home.

**Loans** With easy loan facilities from SBI, you can fulfil your dream of buying a house or a car at the lowest rates.

With 156 foreign offices in 32 countries, correspondent banking relations with 491 global banks, 44 dedicated NRI branches and over 13,000 branches in India, SBI will never let you feel away from home.

SBI NRI Services : NRI Home Loans | NRI Car Loans

INDIAN HEART. GLOBAL BANKING.



For more details on our products and services, step into any of the SBI branches near you or log on to : www.onlinesbi.com/nri

**Toll Free Nos.: Australia:** +1800012473, **Bahrain:** +80081724, **Belgium:** +80076562, **Canada:** +18663284209, **France:** +800740849, **Germany:** +8001830736, **Hong Kong:** +800932045, **Italy:** +800789407, **Japan:** +00 6633812439, **Netherlands:** +8000223031, **New Zealand:** +800449909, **Russia:** +81080029301012, **Singapore:** +8001012333, **South Africa:** +0 800 982 360, **UAE:** +80009119005, **UK:** +0 8081017633, **USA:** +18663284209


ATTRACTIVE DEPOSIT SCHEMES
Fixed Deposits
Short term
Long Term
Savings Account
Super Savings &
Dignity Savings
Current Account
Gold Plus &
Platinum Plus
Student Power
NRE Account
Housing Society Account
Unit Scheme
Fixed Deposits in Units
NO PENALTY
Lakhpati scheme
Save every month become Lakhpati
Auto Sweep
LOAN PRODUCTS
HomeLoan
Consumer Loan
Education Loan
Car Loan
Profina
Medifina
SME Loan
VALUE ADDED SERVICES
Demat
Franking Facility
Life & Non Life Insurance
Pan Card Facility
I-Connect
Easy Tax Payment
Aadhaar Enabled Savings Account
Nishchint Society Account
Society's Bill Mangement
Pension Account
Maharastra State Government
Travel Currency Card
Money Transfer
$
₹
MoneyGram
XPRESS MONEY
QuickMobil
Mobile Banking
QuickNet
Internet Banking
QuickSMS
SMS Banking
QuickATM
Pan INDIA ATM Nework
ESTD. 1917
NKGSB
CO-OP. BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)
Regd. Office: Laxmi Sadan, 361, V.P. Road, Girgaum, Mumbai, India - 400004
Customer Care No.: 022 2860 2000 www.nkgsb-bank.com
SAAD


APPSOLUTELY AMAZING!
Umobile
Bank in your pocket
UMobile makes banking quick and easy!
• Banking App for mobile phones and tablets
• Secure, convenient and instant IMPS (Immediate Payment Service)
- Transfer up to ₹ 2,00,000 instantly
- Mobile to Account / Mobile to Mobile Funds Transfer
• Instant Mobile Recharge
• Bill Payments, Air & Movie Ticketing
• Cheque Book Request, Stop Payment Facility
• 'Hotlist' card and many more
App Store
Google play
BlackBerry App World
Security Assured
यूनियन बैंक ऑफ इंडिया
अच्छे लोग, अच्छा बैंक
Union Bank of India
Good people to bank with
Download "PointART" mobile app Visit: pointart.mobi
Open App & Capture this advertisement
Available on all App stores & on all leading Mobile platforms
Call 1800-2222-44 or log on to www.unionbankofindia.co.in
Your dreams are not yours alone



# विश्वासाची परंपरा... पिढ्यानुपिढ्या

किती छान वाटतं ना... जेव्हा तुमच्या सोबतीला असं कुणीतरी असतं, जे तुमच्या मनातील भीती दूर पळवतं आणि तुम्हाला चिंतामुक्त बनवतं. तुम्हाला प्रेरणा देतं तुमची स्वप्नं साकारण्यासाठी. एक 'शक्ति – स्तंभ' बनून तुम्हाला आधार देतं, सुख असो वा दुःख, जीवनातील कोणत्याही प्रसंगी. अशी अनुभूती... अशी शक्ती... असा आधार... ज्यावर असतो तुमचा अतूट विश्वास.

5 दशकांपेक्षाही अधिकच काळापासून केलेल्या निरंतर वाटचालीत, आपल्या अथक प्रयत्नांमुळे एलआयसी आज देशभरातील कोट्यवधी लोकांसाठी जीवाभावाची सोबती बनली आहे. साहजिकच, एलआयसीला अनेक पुरस्कारांनी आणि सन्मानांनी गौरवण्यात आले आहे. मात्र, आमच्यासाठी सर्वात मोलाचा पुरस्कार आहे तो म्हणजे तुम्हा सर्वांचा आमच्यावर असलेला दृढ विश्वास आणि आगामी वर्षांमध्येही आमच्याकडून असलेल्या तुमच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करू.

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ

LIC/09-10/07 MAR

विमा ही आग्रहाची विषयवस्तु आहे.

www.licindia.in




## 'ग्रंथाली' तर्फे आयोजित 'वाचकदिनास'

**आपल्या हक्काच्या सारस्वत बँकेच्या हार्दिक शुभेच्छा !**

**सारस्वत बँक**

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेडयुल्ड बँक)

**(देशातील सर्वात मोठी, प्रथम क्रमांकाची सहकारी बँक !)**

कॉर्पोरेट सेंटर : सारस्वत बँक भवन, ९५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. दूरध्वनी (०२२) ६६०० ५५५५.

Website:www.saraswatbank.com email:customerservicecentre@saraswatbank.com

**ग्रंथाली**

संपर्क: वुलन मिल, म्युनि. शाळा, यशवंत नाट्यगृह शेजारी, माटुंगा, मुंबई – ४०० ०१६
फोन २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com
वेळ: सकाळी ११ ते ७

# २५ डिसेंबर वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके



**हुमान**
संगीता उत्तम धायगुडे
नियतीनं घातलेली हुमानं सोडवत स्वत:ला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन



**गुलजारांची कविता**
रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
अनुराधा मोहनी
गुलजार यांच्या कवितांचा अनुवाद



**शापित भूमी**
उमेश कदम
आफ्रिकेतील सत्यघटनांवर आधारित कथा



**स्पर्श हरवलेले**
सुलभा कोरे
कवितासंग्रह



**मला समजलेले पाच हिंदू धर्म**
शरद बेडेकर
हिंदूधर्मविषयक तत्त्वचिंतन



**सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे
१२५ नवीन बोधकथा (भाग २)



**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१३**
सुधीर / नंदिनी थत्ते
यंदाच्या नोबेलप्राप्त शोधांच्या कहाण्या

**७ पुस्तकांचा संच केवळ ६०० रुपयांत!**
**मूळ किंमत १२१५ रु.**
**टपालखर्च ७० रु.**


कल्पनाच करा नुसती..
क्षितीजापर्यंत फुललेली अब्जावधी रानफुलं आणि मधोमध उभे असलेले तुम्ही..
आणि हे सारं निसर्गवैभव तुमच्या माझ्या महाराष्ट्रात,
तुम्हा आम्हाला परमप्रिय असणाऱ्या सह्यागिरीच्या माथ्यावर..
सातारा जिल्ह्यातलं हे कास पठार..
महाराष्ट्राची फ्लॉवर व्हॅली म्हणून ओळखलं जाणारं..
१५०० हून अधिक प्रकारच्या वनस्पती, १५६ प्रकारची वानसशास्त्रीय घराणी..
६८० प्रजाती, १४५२ वनजाती, ४०० औषधी वनस्पती.. आणि त्यातल्याही 33 दुर्मिळ प्रजाती..
महाराष्ट्रात पसरलेली अशी दोनशेहून अधिक पर्यटनस्थळं..
प्रत्येक स्थळाचं वैशिष्टच वेगळं, प्रत्येकाची कहाणी वेगळी..
आपण यातल्या एकातरी पर्यटनस्थळाला कधी गेलायत..
चला मग, बेधुंद भटकू या..!!
MAHARASHTRA TOURISM
Incredible India
स्थळ - कास पठार, सातारा, महाराष्ट्र
MAHARASHTRA
unlimited
Kautilya/222
टोल फ्री क्रमांक : १८००-२२९९३०
www.maharashtratourism.gov.in

# ग्रंथाली



**तांबट**
**प्रल्हाद जाधव**
सुखाच्या शोधात भटकत राहणं
हा माणसाचा स्वभाव आहे.
पण बऱ्याचदा ते सुख
आपल्या जवळच कुठंतरी असतं,
बघण्याची दृष्टी असली म्हणजे झालं.
**मूल्य १५० रु. सवलत ९० रु.**



**'संकल्पनाकोश'चे पाच खंड**
**सुरेश वाघे**
इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच
**संच मूल्य ३२०० रु. सवलत २४०० रु.**



**डॉ. रघुनाथ माशेलकर :**
**भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता**
**अ.पां. देशपांडे**
डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे चरित्र
**मूल्य २२५ रु. सवलत १३० रु.**



**बोल महामानवाचे (एक ते तीन खंड)**
**अनुवाद आणि संपादन : डॉ. नरेंद्र जाधव**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे**
१. आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन;
२. सामाजिक, आर्थिक, धार्मिक,
कायदा-संविधान; ३. राजकीय
**संच मूल्य १२०० रु. सवलत ८०० रु.**



**तांडव हरवताना**
**रवी परांजपे**
वैचारिक लेखन
**मूल्य २५० रु.**
**सवलत १५० रु.**



**प्रज्ञा महामानवाची (भाग १ ते ४)**
**सारांश, संपादन आणि अनुवाद : डॉ. नरेंद्र जाधव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखनकार्य
१. राजकीय, २. अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन,
३. मानववंशशास्त्रीय लेखन, ४. बुद्ध आणि त्यांचा धम्म
**संच मूल्य ८५० रु. सवलत ५०० रु.**



**जैतापूरचे अणुमंथन**
**राजा पटवर्धन**
अणुऊर्जेसंबंधी वैज्ञानिक-
सामाजिक अंगांनी
आलेख रेखाटणारा दस्तावेज
**मूल्य ३०० रु. सवलत १८० रु.**



**घडत गेलेली गोष्ट**
**विजया राजाध्यक्ष**
कथासंग्रह
**मूल्य २२५ रु. सवलत १३५ रु.**



**जेनटिक्स कशाशी खातात?**
**डॉ. उज्ज्वला दळवी**
एकविसाव्या शतकात जनुकशास्त्र
अफाट विस्तारलं आहे.
या शास्त्राची सोपी तत्त्वं उमजून घेऊन
शास्त्रीय जाणीव वाढवणारं सुबोध कथन
**मूल्य २५० रु. सवलत १५० रु.**



**बोधिवृक्ष आणि बुद्ध परंपरा**
**हेमा साने**
बुद्धपरंपरेतील बोधिवृक्षांची सचित्र माहिती
**मूल्य १५० रु. सवलत ९० रु.**

वुलन मिल, म्युनि. शाळा, यशवंत नाट्यगृह शेजारी, माटुंगा, मुंबई - ४०० ०१६
फोन २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com
वेळ: सकाळी ११ ते ७

## 'ग्रंथाली'चे चाळिशीत पदार्पण!
**त्यानिमित्त खास ग्रंथभेट**
**४०० पुस्तकांचे केवळ १०० संच उपलब्ध**
**फक्त २५००० रुपयांत**
**मूळ किंमत ६०००० रुपये**

### वाचकदिनी रंगलेला परिसंवाद

# आमचं जग – आमची भाषा

## स्वाती पेंडसे

गेल्या तीसेक वर्षांत माणसाची जीवनशैली झपाट्याने बदलत गेली. परंपरेतून येणारा साचलेपणा जाऊन मोकळेपणा आला. प्रत्येक गोष्टीचा विवेकाने विचार होऊ लागला. त्यातून विविध प्रयोग झाले. जगण्याचे वास्तव अधिक थेट मांडणारे साहित्य, सिनेमा, नाटक निमार्ण होऊ लागले, संगीताने बाज बदलला. कालसुसंगत विचार करणारी तरुण पिढी अधिक वेगवान झालेल्या, गुंतागुंत-तणाव वाढलेल्या काळाला समजून घेत व्यक्त होऊ लागली. जुन्यातले सोने त्यांनाही मान्य आहेच: पण ते काळाच्या कसोटीला पारखून. ते :वीकारताना या पिढीने बदलत्या जगण्याचा वेध घेतला. हा वेध, हे बदल समजून घेण्यासाठी 'आमचं जग आमची भाषा' या परिसंवादाचे आयोजन 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी, २५ डिसेंबर, २०१३ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमात नृत्य, नाट्य, अभिनय, लेखन या क्षेत्रातले मान्यवर सहभागी झाले होते. ज्यामध्ये फुलवा खामकर, रवी जाधव, अंबर हडप, इरावती कर्णिक, वीणा जामकर, धमकीर्ती सुमंत, अतिशा नाईक आणि कौशल इनामदार यांचा समावेश होता. या आगळ्यावेगळ्या विषयावरच्या परिसंवादात सहभागी झाल्याने आपल्याच क्षेत्राबद्दलचे काही नवे पैलू विचारात आले असे सहभागींनी सांगितले.

परिसंवादाची सुरूवात कौशल इनामदार यांनी केली. संगीत क्षेत्राबद्दल बोलताना 'मराठी साहित्य आपल्या आयुंयात काहीसे उशीराच आले. काही प्रसंग असे घडले ज्यामुळे मायबोलीबद्दलचा अभिमान दुणावला. शोध घेतल्यानंतर तिची महत्ता कळली. पण आपल्याच लोकांना आपल्या भाषेबद्दल किती माहिती आहे, किती प्रेम आहे हा प्रश्न आहे' असं ते म्हणाले. गाण्यांच्या चालींबद्दल बोलताना प्रदेशाप्रमाणे चालींमध्येही बदल होतात. उत्तरेकडच्या गाण्यांच्या चाली तुलनेने सोप्या असतात, आपल्याकडे गाण्याच्या प्रत्येक कडव्याच्या चालीमध्ये कमालीचे वैविध्य असते. चित्रपटाच्या चालीमध्ये जेव्हा हिंदी आणि मराठी गाण्यांची तुलना केली जाते तेव्हा त्यांची आथिर्क गणिते प्रचंड मोठी असतात हाही एक मोठा फरक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

रवी जाधव यांच्या मते 'चित्रपट हा एक खेळ आहे जो १४ तंत्रांच्या मदतीने रंगतो.' ते पुढे म्हणाले, 'त्याच्या भाषेचा वेध घेणे ही एक आयुष्यभराची प्रक्रिया आहे. जाहिरातक्षेत्रामध्ये काही काळ काम के ल्यानंतर आलेला साचलेपणा दूर करण्यासाठी चित्रपट हे क्षेत्र निवडले. चित्रपट अतिशय सोप्या रीतीने लोकांपर्यंत पोचवावा असा आपला प्रयत्न असतो. नटरंग, बालगंधवर्सासाठी तयारी करताना भाषेचे अनेक रंगढंग समोर आले. विविध ठिकाणी फिरताना तिथल्या बोली कुतूहल निर्माण करणाऱ्या ठरल्या आणि मग त्यातूनच बालक-पालक करताना भाषेचे अनेक पैलू दाखवण्याचा प्रयत्न केला.' त्यांनी जाहिरात क्षेत्रामधील भाषेबाबत आपले विचार मांडले. जाहिरातीच्या भाषांतराच्या दजार्वर देखील त्यांनी आपले मत मांडले. सतत काहीतरी वेगळे करण्याची धडपड अधोरेखित केली.

इरावती कर्णिक, धर्मकीर्ती सुमंत यांनी लेखनक्षेत्रामधले आपले अनुभव आणि विचारप्रक्रिया मांडली. 'भाषेने मला खिळवून ठेवायला हवे नाहीतर ती माझ्यासाठी कंटाळवाणी होते. तीव्रपणे प्रकट होणारी, व्यक्त होणारी भाषा कुतूहल निमार्ण करते' असे धमकीर्ती सुमंत म्हणाले. काहीशी शिवराळ भाषादेखील कधीकधी वळून पाहायला भाग पाडते. भाषेतला औपचारिकपणा कधीकधी असह्य होतो आणि नकोसा वाटतो. भाषा, तिची लवचीकता, तिचे सौंदर्य याबाबतीत अधिक जाणून घेण्याची गरजदेखील त्यांनी मान्य केली. इरावती कर्णिक यांनी नाट्यलेखन करताना गोष्ट कोणाला सांगायची आहे, का सांगायची आहे, कशी सांगायची आहे याचा विचार होतो असे म्हटले, तसेच नाटकाच्या बाबतीत सामूहिक रीत्या कला सादर करणे आणि तेव्हा मग केवळ नाटक हाच ध्यास असणे, भाषा, प्रांत महत्त्वाचे न ठरणे याबद्दल सिव:तर विचार मांडले.

अंबर हडप यांनी पटकथालेखन, कथालेखन, संवादलेखन या तिन्ही क्षेत्रांमधला फरक तसेच एकांकिका आणि मालिका यामधील भाषेचे प्रेक्षकांच्या अनुषंगाने होणारे बदल याबद्दल सविस्तर विचार मांडले. 'कमीत कमी संवाद असणारा पण तरीही विचार प्रभावीपणे पोहचवणारा चित्रपट आव्हानात्मक असतो. त्यामध्ये लेखक, दिग्दर्शक या सर्वांचाच कस लागतो' असे मत व्यक्त करत ते म्हणाले, मराठी प्रेक्षकांनी जगभरातल्या चित्रपटांचाही वेध घ्यायला हवा. विविध महोत्सवांत सादर होणारे चित्रपट आवर्जून पाहायला हवेत.' त्यांच्या आगामी 'यलो' या चित्रपटामध्ये मतिमंद मुलींच्या व्यक्तीरेखेबद्दल बोलताना, त्यांच्याबरोबर राहणे, त्यांचे जग जाणून घेणे आणि त्याचे संवादलेखन हा अनुभव त्यांनी सांगितला.

अतिशा नाईक यांनी अभिनयाच्या क्षेत्राबद्दल बोलताना सांगितले, की 'आसपासचे अनुभव माणूसपण समृद्ध करतात आणि

ते अभिनयासाठी उपयुक्त ठरतात. लहानपणी अगदी नकळत्या वयात पाहिलेल्या उत्कृष्ट नाट्यकृती मनावर नकळत कोरल्या गेल्या. त्याच्या आठवणी धूसर असल्या तरी काहीतरी चांगले पाहिल्याचे समाधान महत्त्वाचे ठरले. आजही प्रत्यक्ष जगण्यातल्या भूमिका, त्यांचे कंगोरे, यातून भूमिका गहिऱ्या करता येतात. असे परिसंवाद म्हणजे समोर आरसा धरल्यासारखे असतात. ज्यातून आपसूक स्वत:लाच पडताळता येते.' जुन्या नाटकांचा प्रवाह, नवे करण्याची इच्छा या सगळ्यांबाबत त्यांनी मतूदर्शन केले.

अभिनेत्री वीणा जामकर अभिनक्षेत्राची ओळख करून दिली. त्या म्हणाल्या, 'आपल्याला नेहमीच ग्रामीण भूमिका मिळतात असे विचारले जाते. पण प्रत्येक भूमिका, तिचे जगणे, विचार करणे वेगळे असते. तुकाराम चित्रपटातली आपली भूमिका ४०० वर्षांपूर्वीची होती. जी ग्रामीण असूनही वेगळी होती. आसपासच्या लोकांच्या मनातली खंत, त्यांच्या वेदना जेव्हा जाणवतात त्या व्यक्त करण्याचे माध्यम अभिनय असतो. ज्याचे एक वेगळेच समाधान असते.' त्याचबरोबर 'लेखक, दिग्दशर्क यांचा मान राखत आपल्या अनुभवविश्वाशी नाळ जोडत भूमिका साकारते. यामध्ये जर दिग्दशर्काने स्वातंत्र्य दिले तर भूमिकेला चांगला न्याय देता येतो. त्यामुळे प्रत्येक भूमिकेचीही एक भाषा असते' असे त्या म्हणाल्या.

फुलवा खामकर यानं नृत्यक्षेत्राबाबत बोलताना सांगितले, 'नृत्य प्रशिक्षणाच्या निमित्ताने तरुण, लहान मुले या सर्वांशी संबंध येतो; तसेच चित्रपटासाठी नृत्यदिग्दर्शन करताना सेलिब्रिटींबरोबर काम करावे लागते. तेव्हा एकाच क्षेत्रात वेगवेगळ्या पातळ्यांवर भाषा बदलते. पण त्याचबरोबर नृत्याला भाषेचे बंधन नसते. भारतीय असो वा पाश्चिमात्य; प्रत्येक नृत्यप्रकाराचा एक अस्सलपणा असतो. एकच मुद्रा वेगवेगळ्या प्रकारामध्ये करण्याची पद्धत वेगळी असते. सध्या फ्यूजन लोकप्रिय होते आहे. विविध प्रकारांची सांगड घातली जाते आहे, पण त्याचबरोबर प्रत्येक प्रकाराचा अस्सलपणा टिकवला पाहिजे. शब्दांशिवायही नृत्यामधून विचार मांडता येतात.' प्रसंगाधारित नृत्य शब्दाशिवाय सादर करण्याचा अनुभव त्यांनी यावेळी सांगितला.

उपस्थितांमध्ये अनेक मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमाची सांगता कौशल इनामदारांनी गायलेल्या, त्यांच्याच संगीतातल्या मराठी अभिमानगीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत असताना विविध क्षेत्रांमधल्या मान्यवरांच्या दृष्टिकोनातून त्यांच्या जगाची झलक पाहणे हा अनुभव खूपच समृद्ध करणारा होता.

**– स्वाती पेंडसे**
३०४ ए, विजय केसर सोसायटी,
धीरज गंगा सोसायटीच्या बाजूला, चिंचोली बंदर रोड,
भंडारवाडा, मालाड (पश्चिम), मुंबई–६४
rjswati1@gmail.com

**ग्रंथालीची चार महत्त्वपूर्ण प्रकाशने**

**'अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन, कथा, कविता यांचे बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी केलेले संकलन–संपादन**



**आंबेडकरी विचारधारा**
('अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन)
**बबन लोंढे**
**सुधाकर गायकवाड**
**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३६० रुपये**

**काळोखगर्भ**
('अस्मितादर्श'मधील निवडक कथा)
**बबन लोंढे**
**सुधाकर गायकवाड**
**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**





**निर्णायक युद्धानंतर...**
('अस्मितादर्श'मधील निवडक कविता)
**बबन लोंढे**
**सुधाकर गायकवाड**
**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**



**एका कवीचे जीवनगाणे**
वामन कर्डक यांची चरित्रकथा
**बबन लोंढे**
**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

# वाचकदिनी सात नवी पुस्तकं




'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेले 'संकल्पनाकोशा'चे पाच खंड हे फार महत्त्वाचे व मोलाचे काम आहे. ग्रंथ प्रकाशित होऊन कपाटात बंदिस्त राहत असतील तर त्याचा काही उपयोग नसतो. छोट्या गावांमध्ये वाचनाची भूक प्रचंड आहे. 'ग्रंथाली'ने त्यांची पुस्तके गावोगाव नेली. गावाकडचे अनेक लोक आता लिहिते होत आहेत आणि या लोकांसाठी 'ग्रंथाली' मोठे कार्य करत आहे.

**– सतीश काळसेकर**

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने गेली अनेक वर्षे 'ग्रंथाली'चा वाचकदिन महाविद्यालयाच्या पटांगणावर साजरा होतो. या वर्षी 'ग्रंथाली' चाळिसाव्या वर्षात पदार्पण करत आहे. हा अडतिसावा वाचकदिन होता. यावेळी सात नवीन पुस्तकांचे प्रकाशन प्र.ल. मयेकर, उषा तांबे, सतीश काळसेकर आणि व्ही.एन. मगरे यांच्या हस्ते झाले.

या साऱ्यांनीच ग्रंथाली चळवळीचा गौरव केला. उमेश कदम यांच्या 'शापित भूमी' आणि सुधीर-नंदिनी थत्ते यांच्या 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१३' या पुस्तकांचे प्रकाशन उषा तांबे यांच्या हस्ते झाले. थत्ते दाम्पत्य ज्या सुबोध शैलीत, कथारूपात नोबेलप्राप्त शोधांच्या कहाण्या सांगते ते महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. आफ्रिकेतील वर्णद्वेष आणि अत्याचार याबाबत उमेश कदम यांनी लिहिलेल्या कथा आपल्याला विचार करायला लावतात असे त्या म्हणाल्या. व्ही.एन. मगरे यांनी शरद बेडेकर यांच्या 'मला समजलेले पाच हिंदू धर्म' तर दिलीप पांढरपट्टे यांच्या 'सव्वाशे बोधकथा भाग २' पुस्तकांचे प्रकाशन केले. प्र.ल. मयेकर यांच्या हस्ते संगीता धायगुडे यांच्या 'हुमान' या आत्मकथनाचे प्रकाशन झाले. संगीता धायगुडे यांनी नियतीने घातलेली कोडी सोडवली ती आत्मबळावर. आव्हान स्वीकारून पुढे चालले पाहिजे; निराश होऊन प्रगती होत नाही असे मयेकर म्हणाले.

सतीश काळसेकर यांना नुकत्याच जाहीर झालेल्या साहित्य अकादमी पुरस्कारानिमित्त त्यांचा सत्कार प्र.ल. मयेकर यांच्या हस्ते झाला. काळसेकर यांच्या हस्ते रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ आणि अनुराधा मोहनी यांनी अनुवाद केलेल्या 'गुलजारांची कविता' या व सुलभा कोरे लिखित 'स्पर्श हरवलेले' या, अशा दोन कवितासंग्रहांचे प्रकाशन झाले. कवीने संगणकावर कविता लिहून पुढे ती अनेक दिवस न पाहण्यात काही हंशील नाही. कविता हाताने लिहिली व ती पुन्हा पुन्हा वाचली तर सकस होते असे मत व्यक्त करताना या दोन्ही काव्यसंग्रहातील कविता उत्तम असल्याचे त्यांनी सांगितले. 'गुलजारांची कवितां'मध्ये मूळ कविता व अनुवाद समोरासमोर छापण्याबद्दल त्यांनी कौतुकोद्गार काढले. सर्वच लेखकांनी आपली मनोगते यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली यांनी केले.

**– प्रतिनिधी**

# महिला आणि दलित संमेलनाध्यक्षांचे विचारमंथन

रमेश दिघे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळणे हा कोणत्याही लेखकासाठी मोठा मानाचा तुरा असतो. शिक्षणाच्या जोरावर येथील साहित्याचे क्षेत्र प्रथमपासून समाजातील उच्चवर्णीयांनी व्यापलेले असल्याने बहुतेक संमेलनांच्या अध्यक्षपदी या उच्चवर्णियांची वर्णी लागणे हे स्वाभाविक होते. आजवरच्या ८६ संमेलनांपैकी फक्त सात वेळा अध्यक्षपदाचा बहुमान दलित अथवा महिलेस मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दुसऱ्या वर्षी राज्याच्या बाहेर ग्वाल्हेर येथे, १९६१ साली ४३ वे संमेलन भरले तेव्हा कुसुमावती देशपांडे यांच्या रूपाने महिलेस सर्वप्रथम अध्यक्षपद मिळाले. खुद्द महाराष्ट्र राज्यात महिलेस हा मान मिळाला ते १९७५ साली. कराड येथे ऐन आणीबाणीत भरलेल्या संमेलनाचे अध्यक्षपद नावाप्रमाणेच पराक्रम गाजवणाऱ्या दुर्गा भागवत यांना मिळाले. दलित व्यक्तीस हा बहुमान मिळायला शंभर वर्षांचा कालावधी लोटावा लागला. १९८४ साली जळगाव येथील साहित्य संमेलनाचे शंकरराव खरात हे पहिले दलित अध्यक्ष झाले. साहित्य संमेलनाच्या १०६ वर्षांच्या काळात ५७ संमेलने झाली. त्यानंतर दलित लेखकाकडे अध्यक्षपदाची सूत्रे आली.

महिलांमध्ये सर्वप्रथम अध्यक्षपद मिळवणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी 'स्त्रीला हे पद याआधीच मिळायला हवे होते. गेल्या अर्धशतकात आपल्यापेक्षा लायक लेखिका होऊन गेल्या. त्यांना हे पद मिळाले नाही,' असे खेदाने नमूद करून 'मला स्वत:ला याबाबत स्त्री-पुरुष भेद करणे आवश्यक वाटत नाही' हे स्पष्ट केले. आद्य मराठी कवयित्री महादंबा हिच्या धावळ्यापासून बहिणाबाई चौधरी यांच्या साध्याभोळ्या ओव्यांपर्यंत, रमाबाई रानड्यांपासून लक्ष्मीबाई टिळकांपर्यंतच्या लेखिकांचा गौरवाने उल्लेख केला. लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांना आत्मचरित्रांमध्ये तोड नाही असे म्हणत काशीबाई कानिटकरांच्या लेखनाने हरी नारायण आपटे यांना साश्चर्य आनंद झाल्याचे कुसुमावतीबाईंनी सांगितले.

साहित्य संमेलनाच्या पहिल्या स्त्री अध्यक्ष कुसुमावती देशपांडे यांनी मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाचे विचार अतिशय मुद्देसूदपणे मांडले. देशाची भावनात्मक एकता कायम टिकवण्यासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषांचा दर्जा समान असावा. परभाषेच्या दास्याच्या दडपणाखाली मराठी दबून जाता कामा नये, असे त्यांचे मत होते. राज्यातील साहित्य संस्थांच्या संघीकरणाच्या प्रयत्नांचा आढावा घेऊन त्यांनी असे निदर्शनास आणले की, मराठी महामंडळ हे साहित्यप्रेमी जनतेने स्थापन केले आहे. सत्ता, संपत्ती व विद्वत्ता यांच्या परस्परसहकार्यातून महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन संपन्न, तेजस्वी होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्याची स्थापना नुकतीच झालेली आहे याचे भान राखून कुसुमावतीबाईंनी त्यांचे विचार मांडले आहेत. मराठी साहित्याचा योग्य अभ्यास व विकास हेच मराठी संस्कृतीच्या प्रसाराचे योग्य साधन आहे, असे सांगून त्यांनी राज्यातील मराठीचे अध्ययन व अध्यापन याविषयी टिप्पणी केली. 'शालेय अध्यापन पद्धतीची चिकित्सा वेळोवेळी केली जाते. परंतु दैनंदिन अध्यापनाचा दर्जा काय असतो, विद्यार्थ्यांच्या पदरात काय पडते?' असा परखड प्रश्न विचारून त्या म्हणतात, 'शुद्धलेखन म्हणजे काय हे विद्यार्थ्यांना शेवटपर्यंत समजत नाही. शिक्षकांचे अक्षर लागत नाही. ऐतिहासिक दृष्टी नाही व व्यापक रसज्ञतेच्या अभावी मराठी अध्यापनात बहुश्रुतता व इतिहासनिष्ठ तारतम्याचा अभाव पडतो.'

अध्यापकांची 'हजेरी' घेतल्यावर मराठी मासिकांवर दृष्टिक्षेप टाकताना कुसुमावतीबाईंनी, 'मराठी जीवनातील विचारांचे, भावनांचे, परिस्थितीचे प्रतिबिंब उमटावे' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मासिकातील कथा हीन दर्जाच्या, बीभत्स असतात असे म्हणताना मासिकांमधील कविता निरर्थक असून त्यांना बोजडपणाचा रोग जडलाय. या मासिकांच्या वाचनातून वेळेचा अपव्यय होतो असे त्या स्पष्टपणे सांगतात.

१९७५ साली ऐन आणीबाणीत दुर्गाबाई भागवत कराड येथील संमेलनाच्या अध्यक्ष झाल्या त्यावेळी अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर बरीच बंधने होती. त्याचे भान राखून दुर्गाबाईंनी त्यांचे मुद्दे अतिशय कौशल्याने मांडले. इतिहासाशिवाय, भाषा, व्याकरण, साहित्य यांची सखोल जाण असलेल्या इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांना अध्यक्षपदाचा बहुमान न मिळाल्याची खंत त्यांनी सुरुवातीलाच व्यक्त केली. याशिवाय प्रसंगनिष्ठ विनोदात वाकबगार असलेले चिं.वि. जोशी हे सुद्धा या पदापासून वंचित राहिल्याचे त्यांनी

सांगितले. बौद्ध वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती तेलंग इत्यादी विद्वानांनी मराठीऐवजी इंग्रजी लिहिण्यावर भर दिल्याचे नमूद केले. त्याचवेळी, आपल्या लहान मुलाला घेऊन मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात, छोट्या खोलीत भाषांतर करत बसणाऱ्या विदुषी शीलावती केतकर, उपाशीपोटी लेखन करणारे सानेगुरुजी यांचे कौतुक करताना त्या 'आर्थिक स्वास्थ्याला विचारवंत कधी मुकेल याचा नेम नाही' असे म्हणत येथील समाजातील सत्य सांगतात.

'राजवाड्यांनी आपल्या काळातल्या ज्ञानाच्या क्षेत्रातील परिस्थितीचा सूक्ष्म विचार केला होता. पारतंत्र्याच्या काळात त्यांनी विचारवंतांना कर्तव्याची जाणीव दिली. स्वत्व नसेल तर तेजच नाही ही जाण त्यांनी समाजाला नव्याने करून द्यायचा प्रयत्न केला' असे सांगून आणीबाणीच्या काळातील सद्यस्थितीचे विश्लेषण करताना दुर्गाबाई इशारा देतात, 'सरकारच्या मानभावी कळकळीवर भिस्त न ठेवता व महाराष्ट्रातील उच्च मंडळींच्या पूर्ववयातील अनास्थेकडे दुर्लक्ष न करता आपण आपले कर्तव्य यथाशक्ती बजावले पाहिजे. त्याची हलगर्जीपणे हेळसांड केली तर पुढील पिढीचे अभिशाप आपल्याला घ्यावे लागतील.'

'जनसंपर्काची साधने अधिक उपलब्ध झाली. यातून जनतेच्या अभिरुचीचा विविध अंगांनी विकास करून नवनवीन कला व ज्ञानक्षेत्र यांचा वाढता परिचय लोकांना घडवण्यासाठी स्वत:ची प्रतिभा आणि ज्ञानमान वाढवण्यासाठी झटण्याचा प्रयत्न करण्याऐवजी अनेक थोर लेखकांनी व विचारवंतांनी रेडिओ, टी.व्ही. व इतर रंजन माध्यमांचा वापर करताना त्यासाठी काही मूल्य, कसोट्या नि मानदंड यांचा त्याग करणे अपरिहार्य आहे अशी समजूत करून घेऊन स्वत:ची मूळ पातळी गमावलेली दिसते.' हे दुर्गा भागवत यांनी १९७५ साली केलेले भाष्य आजच्या मनोरंजन वाहिन्यांच्या जमान्यात तंतोतंत लागू पडणारे आहे. लेखकांनी रंजनावर भर दिल्यावर वाचकही रंजनाला प्राधान्य देतात. त्यामुळे 'साहित्य' दुय्यम ठरते असे त्यांनी पुढे नमूद केले आहे.

आत्मचरित्रांमधील अप्रामाणिकपणाबद्दल त्या म्हणतात, 'शैली म्हणजे सत्य नव्हे. राजकारणी पुरुषसुद्धा आत्मचरित्र लिहिताना प्रामाणिकपणा पाळत नाहीत. स्वत:ची प्रतिमा घडवण्यासाठी लोक झटत असतात. याला अपवाद फक्त म. गांधी.' असे व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण उपस्थित असताना दुर्गाबाईंनी स्पष्टपणाने सांगितलेय. त्याच्याही पुढे जाऊन आणीबाणीचे निर्बंध झटकून त्या म्हणतात, 'राजकारणाच्या चर्चेची समस्त दालनेच बंद झाल्यावर व्यक्तिचित्रण कुठले? डोळ्यांसमोर घडणाऱ्या घटनांना आम्ही साहित्यबद्ध करू शकत नाही. आताच कुठे आमचा लेखक विविध क्षेत्रांतल्या लहानमोठ्या घटना व व्यक्ती यांना अपुऱ्या ज्ञानात का होईना पण चाचपून पाहू लागला होता. राजकारणाला हात घालावे असे आताच कुणाच्या क्वचित मनात येत होते. त्याच सुमारास बंधनं आली की विचारांचा ओघच खंडित होतो.'

दुर्गाबाईंनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला तो लेखकांच्या आर्थिक स्थैर्याचा. त्या म्हणाल्या, 'भारतीय लेखक केवळ लिखाणावर जगू शकत नाहीत. त्यांच्यावर परिस्थितीचे बंधन असते. त्यात आणखी बंधने लादून घेतल्यास त्यांच्या अस्तित्वाचाच लोप होईल.' भाषणाच्या शेवटी सत्ताधाऱ्यांसमोर मान तुकवणाऱ्या लेखकांना त्यांनी तुकाराम महाराजांचेच उदाहरण दिले. 'शिवाजी महाराजांसारख्या लोकोत्तर राजानं भेटीला यावे असे म्हटले. तेव्हा तुकाराम महाराज जे म्हणाले, तोच संदेश तुम्ही शिरोधार्य मानावा–

तुम्हांपाशी आम्ही येऊ नये काय ।
वृथा सीण आहे चालण्याचा ।।'

संमेलनाला जे जत्रा म्हणून संबोधले जाते त्याबद्दल ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके यांनी ६९ व्या संमेलनात (१९९६–आळंदी) सुरुवातीलाच भाष्य केले. त्या म्हणाल्या,'जत्रा हा आमच्या सांस्कृतिक परंपरेतला एक महत्त्वाचा घटक आहे आणि तो फार सुंदर आहे. आपण इतर अनेक गोष्टींवर पैसा खर्च करतो, त्यातला थोडा साहित्यावर खर्च झाला तर त्यात बिघडले कुठे?'

शांताबाईंनी आपल्या भाषणात जुन्या जमान्यातील विविध मालांकडे लक्ष वेधले. 'त्या काळच्या अनेक माला याक्षणी मला आठवत आहेत. भारत गौरव ग्रंथमाला, हिन्द एजन्सीमाला, महाराष्ट्र कुटुंब माला, सरस आणि सुरस वाङ्मय रत्नमाला अशा मालांनी आपले रंजन केले. वाचनाची भूक प्रज्वलित केली. त्यातले अनेक लेखक जरी सामान्य होते तरी त्यांनी ठोस मराठमोळी भाषा वाचण्याचा आनंद दिला.'

'हिंद एजन्सी मालेमधून अच्युत बळवंत कोल्हटकरांसारखा हरहुन्नरी लेखक छोट्या पण वेधक कादंबऱ्या लिहीत होता. 'वत्सला वहिनींची पत्रे' वाचल्यावर असे वाटले की पुरुष लेखकाने स्त्रीची मनोव्यथा आणि तिची भाषेची लकब इतकी उत्कृष्टपणे आत्मसात केल्याचे दुसरे उदाहरण– हरिभाऊंची यमू, गतभर्तुका असे काही अपवाद सोडून – अन्यत्र क्वचितच आढळेल.' याप्रकारे कोल्हटकर यांच्या शैलीची प्रशंसा करत त्यांनी त्यांच्या लेखनाचा नमुना सादर करताना बरोबर आजच्या काळात लागू होणारे वाक्य निवडले, ते असे 'इश्य मेलं! भावजी, मी म्हणते, आमच्या बायकांची अक्कल तर बोलून चालून चुलीपुरतीच पण तुमच्यासारखे चांगले शहाणेसुरते पुरुष तरी असेंब्लीत जाऊन काय दिवे लावतात हो!'

जुन्या मालांमधील उदाहरणे उद्धृत करताना शांताबाईंनी एक मौलिक सूचना केली. त्या म्हणाल्या, 'मराठीमध्ये अनेक पुरस्कार दिले जातात, काही पुरस्कार तर लाखभर रुपयांचे असतात. या पुरस्कारांमधील काही रक्कम जुन्या, दुर्मिळ पुस्तकांची पुन्हा छपाई करण्यासाठी आणि ती पुस्तके वाचकांना कमी किमतीत उपलब्ध करण्यासाठी वापरावी. विविध ज्ञानविस्तारापासून,

मनोरंजन, पारिजात, रत्नाकर, यशवंत, ज्योत्स्ना, अभिरुची, सत्यकथा या नियतकालिकांमधून येणारे लेख, कथा, क्रमश: कादंबऱ्या, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक चिंतनात्मक लेख यांनी आपली अभिरुची संपन्न केली. यातून अज्ञात प्रतिभावंतांचा शोध लागला. साहित्यात येऊ लागलेली नवी वळणे कळली, शैलीबद्दलची जाण विकसीत झाली.'

१९६१ साली मराठी मासिकांवर कुसुमावती देशपांडे यांनी सडकून टीका केली. त्यानंतरच्या काळात मराठी साहित्यात नवतेची लाट आली. शांता शेळके यांचे विवेचन हे मुख्यत्वे साठोत्तरी मराठी मासिकांबद्दल आहे. तसा दोघींच्या वृत्तीत भेद आहे. कुसुमावतीबाई दोषांवर टीका करतात तर शांताबाई त्यातल्या चांगल्या गोष्टींचे कौतुक करतात. भाषणाच्या शेवटी त्यांनी समीक्षकांचे महत्त्व पटवून देणारा मुद्दा मांडला आहे, 'सर्जनशील लेखकाइतकेच उत्तम समीक्षकांचे महत्त्व आपण ओळखायला हवे. सर्जनशील कलावंत जेव्हा समीक्षेकडे वळतो तेव्हा तिथेही तो नवनिर्मिती करतो आणि कलाकृतीतील अज्ञात सौंदर्य तो आपल्याला दाखवून देतो.'

माध्यमांचे अतिक्रमण, हिंसाचार, लैंगिकता यावर भर देणारे भडक चित्रपट यामुळे समाजाची संवेदन क्षमता बधीर होत चालली आहे असे नमूद करून रसिक वाचकांना शांताबाई उपदेश करतात. 'तकलादू नाविन्याच्या झगमगाटाने दिपून न जाता जे अस्सल आहे ते अचूक ओळखून रसिकांनी त्यांचे रसिकत्व निकोप ठेवले पाहिजे.'

स्वत: एक समीक्षक असलेल्या विजया राजाध्यक्ष ७४ व्या साहित्य संमेलनाच्या (२००१-इंदूर) अध्यक्ष होत्या. त्यांनी वेगवेगळ्या संमेलनांची उपयुक्तता आपल्या भाषणातून पटवली. त्या म्हणाल्या, 'विदर्भ साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद, गोमांतक साहित्य सेवक मंडळ' यांच्यामार्फत झालेल्या संमेलनाची अध्यक्षीय भाषणे ग्रंथरूपाने उपलब्ध आहेत. ती वाचल्यावर त्यांचे योगदान व महत्त्व जाणवते. दलित, विद्रोही, ख्रिस्ती, मुस्लिम, समरसता, कामगार, जनवादी या संमेलनांची गंभीरपणाने दखल घेतली पाहिजे. या संमेलनांच्या भाषणांचा एकत्रित विचार केल्याखेरीज आपल्या विचारवंत, लेखकांना कोणते प्रश्न त्या त्या वेळी निकडीचे वाटले याचे सर्वसमावेशक चित्र आपल्यासमोर येणार नाही.'

साहित्य नावाचा अथांग समुद्र कसा तयार होतो हे डॉ. विजयाबाईंनी विशद केलंय. 'साहित्याची अनेक रूपे असतात. ते वेगवेगळ्या भाषेत लिहिलेले असते. एखाद्या प्रादेशिक विभागात निर्माण होणाऱ्या साहित्याला स्थानिक संदर्भांची जोड असते. स्थानिक बोलीच्या छटा त्यात असतात. हे सगळे प्रवाह मिळून साहित्य नावाचा अथांग समुद्र अस्तित्वात येतो.'

लेखकाने विषयाचे भान ठेवणे आवश्यक आहे असा विजयाबाईंचा सल्ला आहे. त्या म्हणतात,'लेखकाला त्याच्या विषयासंबंधी, आशयरूपासंबंधी एक भान नेहमी ठेवावे लागते. त्याने त्याच्या विषयाचे तऱ्हेतऱ्हेने पोषण केले पाहिजे. ते झाले तरच प्रतिभेची किमया त्यातून रसप्रसन्न फुलोरे निर्माण करते. सांगणे महत्त्वाचे आणि त्या सांगण्यात प्रस्तुतता असणे महत्त्वाचे.' आजूबाजूच्या जगात होणारे बदल आणि त्याचे साहित्य व्यवहारांवर होणारे परिणाम याचे नेमके विवेचन विजयाबाईंनी केले आहे. त्या म्हणतात, 'गेल्या पंचवीस-तीस वर्षांतील वाङ्मयीन व अवाङ्मयीन अशा दोन्ही स्वरूपाच्या विविध घटनांनी जग ढवळून निघाले. या उलथापालथीचा परिणाम साहित्यावरही झाला. लेखकांची एकंदर मानसिकता बदलली. संताप, विद्रोह ही त्या मानसिकतेची प्रमुख केंद्रे बनली. मराठीतील अनियतकालिकांची चळवळ ही या विद्रोहातूनच आली. त्यावेळी काहींनी केलेली सत्यकथेची होळी प्रतिकात्मक होती.'

गेल्या पंचवीस वर्षांतील स्त्रीवादी साहित्य हाही प्रस्थापिताविरोधी दृष्टिकोनाचाच एक भाग आहे. त्यामागे स्त्री-मुक्तीची भक्कम चळवळ आहे. स्त्रीवादी साहित्याने एका नव्या जगाचे दर्शन घडवले. पुरुषी अहंकाराचा, त्यातून होणाऱ्या स्त्रीच्या शोषणाचा सर्वतोपरी निषेध या साहित्याने केला. डॉ. विजया राजाध्यक्ष यांचा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा होता सांस्कृतिक दहशदवादाचा. 'साहित्याच्या क्षेत्राला आज एक प्रकारच्या सांस्कृतिक दहशतवादाची लागण झालेली आहे' असे नमूद करून त्यांनी तक्रार केली की, या दहशतवादाचा प्रतिवाद विरळपणाने होताना दिसतो. आपण जे साहित्य मानतो तेवढेच फक्त अस्तित्वात आहे असे गृहीत धरून उरलेल्या साहित्यावर एक मोठी फुली मारली जाते.

२१ व्या शतकातील पहिल्या वर्षातील भाषणाच्या शेवटी विजयाताईंनी तंत्रविज्ञानाच्या वापराचा नवा मुद्दा मांडला. त्या म्हणाल्या, 'तंत्रज्ञान हा आणखी एक नवा भोवरा आहे. या नव्या युगाच्या पाऊलखुणा आहेत. त्या नव्या पिढीच्या वाटा आहेत. नवीन तांत्रिक कौशल्ये आत्मसात करून घेण्यात काहीच गैर नाही. पण ते करताना मूळ वाटेचे विस्मरण घडता कामा नये. तसे झाले तर स्वायत्त लेखन-वाचनाची संकल्पना बदलणार का? साहित्याचा अधिकार कमी होणार का? अशी शंका येते.'

७४ व्या साहित्य संमेलनात डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी दलित आत्मकथनांसंबंधी मतप्रदर्शन केले होते. त्या म्हणाल्या होत्या, दलित आत्मकथनांच्या संदर्भात 'आमचा बाप अन् आम्ही' या आत्मकथनाचे रूप वेगळे आहे... आज प्रस्थापित दलितांची वाङ्मयीन भूमिका कोणती आहे, कालचे बंडखोरच आज प्रस्थापित झाले आहेत का? दलित साहित्य प्रामुख्याने कविता व आत्मकथने या दोन रूपांतच का अडकल्यासारखे झाले? या साहित्यातील स्त्री चित्रण पुरेसे समग्र आहे का? असे मुद्दे त्यांनी दलित साहित्याबद्दल बोलताना व्यक्त केले.

अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे जे दलित लेखक अध्यक्ष झाले त्यांनी या व इतर मुद्यांसंदर्भात काय मतप्रदर्शन केले ते पाहण्यासारखे आहे.

१९८४ साली जळगाव येथे भरलेल्या ५८ व्या साहित्य संमेलनात प्रथम दलित लेखकाला अध्यक्षपद मिळाले. शंकरराव खरात यांना हा बहुमान मिळाला. खरात यांनी याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिले. ते म्हणाले, 'डॉ.आंबेडकर यांनी मुक्या दलित समाजाला वाचा दिली; बोलके केले आणि हा मूक ठेवलेला दलित समाज बोलू लागला. यामुळेच मी तुमच्यासमोर उभा राहून बोलू शकतोय.' संमेलन जळगावला आहे याचे भान राखून ते पुढे म्हणाले,'जळगाव परिसरातील 'असोदे' या गावच्या बहिणाबाई चौधरी यांनी विचारलेला 'मानसा मानसा कधी होशील मानूस?' हा प्रश्न मी माझ्या काळजावर कोरून ठेवलेला आहे. एका दलित लेखकाला संमेलनाचा अध्यक्ष करून एक ऐतिहासिक स्वरूपाचे; सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने पुढचे पाऊल या संमेलनाने टाकले आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या कृतीमुळे शतकानुशतके, वरिष्ठ समाजाकडून दडपल्या गेलेल्या, शोषण केल्या गेलेल्या उपेक्षित अशा दलितांच्या मनोवेदनांवर फुंकर घातल्यागत झाले असल्याचे खरात म्हणतात.

विद्रोही दलित साहित्य कसे निर्माण झाले याचा ऊहापोह खरात यांनी केला. ते म्हणाले, 'रुढी, परंपरा, धर्मशास्त्र यांना नकार देण्याचा क्रांतिकारक विचार डॉ.आंबेडकर यांनी दिला. त्याचबरोबर समता, बंधुता व न्याय अशा श्रेष्ठ मूल्यांवर आधारित नवा समाज निर्माण करण्याचा मूलगामी विचार बाबासाहेबांनी दलितांना दिला. यातूनच विद्रोही साहित्य जन्मले.'

आपल्या लेखनाच्या प्रेरणा त्यांनी अशा सांगितल्या- 'दलित समाजाचा प्रतिनिधी म्हणून, दलित जाणिवेतून मी माझे साहित्य लिहिले. दलितांचे वास्तव, अस्सल जीवनानुभव मी प्रामाणिकपणे लिहिले आहेत. माझ्या वैचारिक लेखनाचा तोच पाया आहे... अस्पृश्य, आदिवासी, झोपडपट्टी, भटके-विमुक्त यांच्या वेदना, त्यांचा जीवनसंग्राम यांना मी माझ्या वाङ्मयात, कलाकृतींमध्ये स्थान दिले म्हणून मी स्वत:ला दलित साहित्यिक मानतो. मी वाचलेल्या मध्यमवर्गीय साहित्यिकांच्या कथा, कादंबऱ्यांत दलितांच्या व्यथा, वेदना, आशा, आकांक्षा दिसत नव्हत्या म्हणून मी ठरवले की, आपणच जे जगलो त्यातील अनुभव लिहायचे. महार म्हणून गावकीची कामे करताना, बलुतेदारीच्या जीवनाचे अंतरंग मला कळले, ते मी उतरवून काढले.'

आपल्या समन्वयवादी भूमिकेबद्दल प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ दलित लेखक, प्रा. केशव मेश्राम हे ७८ व्या साहित्य संमेलनाचे (२००५-नाशिक) अध्यक्ष होते. त्यांनी प्रस्थापित मराठी लेखकांना 'वाङ्मयीन माफिया' असे संबोधून या लेखकांचे जग हे आपला अभिजनवर्गाचा दर्जा टिकवण्यापुरते मर्यादित असते', असे सांगून, या लेखकांपैकी किती जणांनी आपल्या सुरक्षित जीवनाच्या पलिकडे जाऊन दलितांच्या हालअपेष्टा समजावून घेण्याचे धाडस दाखवले. आपला (पैसे कमावण्याचा) उद्योग व्यवस्थित चालू राहावा म्हणून पांढरपेशा लेखक, प्रकाशक आणि वाचनालये यांची कंपूशाही चालू असते, याप्रकारे प्रस्थापितांवर टिकास्त्र सोडल्यावर तथाकथित विद्रोही लेखकांनाही त्यांनी फटकारले. प्रस्थापित वर्गाला सणसणीत शिव्या घालणे, याच्यापलिकडे जाऊन विद्रोही लेखक फारसे काही करत नाहीत असा त्यांचा आक्षेप होता.

'साहित्य संमेलनाचे बहुसंख्य अध्यक्ष मराठी भाषेच्या ऱ्हासाबद्दल इंग्रजी भाषेला जबाबदार धरत असतात. ही परंपरा मोडून कोणतीही दुसरी भाषा एका भाषेच्या ऱ्हासास कारणीभूत होऊ शकत नाही', असे मत मेश्राम यांनी ठामपणे मांडले. ते म्हणाले,'अशा प्रकारे दुसऱ्यावर दोषारोप करून आमची समस्या सुटू शकत नाही. इंग्रजीच्या नावाने खडे फोडणारे स्वत: आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात आणि ही मुले परदेशात कशी जातील याची काळजी करतात.

मेश्राम यांनी मराठी भाषेचा ऱ्हास थांबवण्यासाठी चार शब्द शासनालाही सांगितले. 'मराठी भाषेतील चांगल्या पुस्तकांचे इतर प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करण्यासाठी आणि इतर भाषांमधील चांगले साहित्य मराठीत आणण्यासाठी शासनाने एका अकादमीची स्थापना करावी', अशी त्यांची सूचना होती.

जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या बेकारीच्या संकटाने निराश होण्याऐवजी आपली गुणवत्ता आणखी वाढवून त्या समस्येचा मुकाबला कसा करता येईल असा विचार मागासवर्गीय, दलित तरुणांनी करावा, असा सल्ला मेश्राम यांनी दलित तरुणांना दिला.

८४ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे (ठाणे-२०११) यांनी केवळ दलित लेखकांपुरती आपली मते मर्यादित ठेवली नाहीत. त्यांनी 'बहुजन, दलित समाजातून जे नवे साहित्य येतेय त्याचे मी स्वागत करतो' असं सांगून जागतिकीकरणाच्या रेट्यातून जे नवे संघर्ष निर्माण होत आहेत त्यांचे चित्रण आता साहित्यातून होऊ लागलेय, ही चांगली बाब असल्याचे सांगितले. याप्रकारे ज्येष्ठ दलित साहित्यिक विद्रोहाच्या त्याच त्या कल्पनांमधून बाहेर पडून ते समाजातील सर्वच दुर्बल घटकांचा विचार करू लागलेत. नव्या युगाची नवी आव्हाने स्वीकारण्यासाठी नवी पिढी सज्ज होऊ लागली आहे. ती आक्रोशी आत्मकथांच्या पलिकडे जाऊ लागली आहे ही समाधानाची बाब म्हणायला हवी!

**- रमेश दिघे**
भ्रमणध्वनी: ८३०८१४२४३६

# आधुनिकता आणि बांधिलकी ; साथ-साथ

## विनोद शिरसाठ

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्याबरोबर मी एकूण पंधरा वर्षे काम केले. यापैकी १० वर्षे मी युवा संपादक होतो. नंतर आधी कार्यकारी संपादक आणि आता डॉक्टरांच्या दुर्दैवी हत्येनंतर माझी साधना ट्रस्टने एकमताने संपादक म्हणून नियुक्ती केली. 'साधने'च्या विश्वस्तांनी माझ्या क्षमतांवर दाखवलेला हा विश्वास म्हणायला हवा. मी साधनात आलो त्यावेळेस आमचा प्रकाशन विभाग हा स्थगित करण्याचा विचार होता. नेहमीपेक्षा जास्त कमिशनने पुस्तके विकली जात होती. अशा स्थितीत मी साधनाचे काम पाहू लागल्यावर काही कॉलम असे प्लॅन झाले की त्यातून पुस्तके निर्माण होऊ शकली. मी येथे आल्यापासून जवळपास शंभर स्तंभ वेळोवेळी साधनातून प्रसिद्ध झाले. हा मजकूर जसाच्या तसा प्रसिद्ध झाला नाही. त्यात पुस्तकांच्या गरजेनुसार थोडेफार फेरफार करावे लागले. माहिती अद्ययावत करणे, वाचकांनी दाखवून दिलेल्या चुका, उणिवा दूर करणे असे बदल करून ही पुस्तके तयार झाली.

साप्ताहिक स्तंभाचे पुस्तक तयार करताना त्याचे अनेक फायदे असतात. विषयाची वाचकांमध्ये चर्चा झालेली असते. त्यात ज्या व्यक्ती, घटना, संस्था यांचा उल्लेख असतो त्यांना व त्यांच्यासारखेच कार्य करणाऱ्या इतरांना एकत्रित मजकूर पुन्हा वाचताना नवा अनुभव येतो. आमच्या नामदेव माळी यांच्या 'शाळाभेट' या पुस्तकाचेच उदाहरण घ्या. ज्या चांगल्या जिल्हा परिषद शाळेबद्दल साधनातून लेख यायचा तो लेख त्या शाळेचे विद्यार्थी, शिक्षक जपून ठेवायचे. पण लेखमाला प्रसिद्ध होत असताना माळी यांना इतर आणखी शाळांमधून भेट देण्याबद्दल निमंत्रणे येऊ लागली. हे जे सकारात्मक वातावरण तयार झाले ते खूप महत्त्वाचे होते. ज्या वेळेला ती लेखमाला पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली तेव्हा त्याला उदंड प्रतिसाद मिळाला. आजवर दहा टक्के दराने या पुस्तकाच्या लेखकाला साधनाने एक लाख रुपये मानधन दिले. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की आमच्याकडे वितरणाची कोणतीही यंत्रणा नसताना पुस्तकाला एवढे यश मिळाले. आमची विक्री- वितरण व्यवस्था आणखी सक्षम असती तर हे यश निश्चितपणे वाढले असते.

फक्त 'शाळाभेट' पुस्तकाचेच नव्हे तर गेल्या दोन-तीन वर्षांतील आमच्या पुस्तकांच्या लेखकांना आम्ही भरभरून मानधन दिले. साधना साप्ताहिकाच्या पलिकडे जाऊन फारशी जाहिरात करणे आम्हाला तेवढे शक्य नसते. पुस्तकाची किंमत सर्वसामान्य वाचकाला परवडणारी असली पाहिजे असे साधनाचे नेहमीचे धोरण राहिले आहे. त्याचप्रमाणे लेखकाला त्याचा योग्य तो मोबदला देता आला पाहिजे असा आमचा प्रयत्न असतो.

एखादा नवा कॉलम सुरू करताना त्याचे पुस्तक करायचे असे आधीच ठरलेले नसते. कॉलम प्रसिद्ध होऊ लागल्यावर, त्याचे पहिले चार-पाच भाग प्रसिद्ध झाल्यावर, पुस्तक होण्याबद्दलचा अंदाज येऊ लागतो. ज्येष्ठ पत्रकार गोविंद तळवलकर हे ग.प्र. प्रधान सरांचे मित्र. सरांच्या हयातीत त्यांच्या विनंतीवरून तळवलकर यांनी आंतरराष्ट्रीय घडामोडींबद्दल, अमेरिकेच्या राजकारणाबद्दल साधनात काही लेख लिहिले. या लेखांचे पुस्तक तयार होऊ शकले नाही. या लेखांवर ज्या प्रतिक्रिया आम्ही छापल्या त्यावरून तळवलकरांचा असा समज झाला, की या लोकांना आपले लेखन नकोय. त्यांनी साधनाकडे लिहिणे थांबवले. तेव्हा, आम्ही लेखकाइतकाच आमचा वाचक महत्त्वाचा मानतो, वाचकाला त्याची मते मांडण्याचे स्वातंत्र्य देतो, अशी साधनाची भूमिका समजावून सांगणारा एक मेल मी तळवळकरांकडे पाठवला. त्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रे-नियतकालिकांचे गोविंदरावांचे वाचन असते हे ध्यानात घेऊन त्या वर्तमानपत्रांविषयी त्यांनी साधनातून लिहावे असे मी त्यांना सुचवले. आम्हाला आमच्या वाचकाला आणखी ज्ञानसमृद्ध बनवायचे आहे ही इच्छापण व्यक्त केली. त्याप्रमाणे तळवलकर यांनी लेख लिहायला सुरुवात केली. तेव्हा या लेखांचे पुस्तक करावे असे अनेक नामवंतांनी आम्हाला सुचवले. परंतु तळवलकरांच्या यादीत फक्त सेमिनार या एकाच भारतीय नियतकालिकाचा समावेश होता. त्यात टाइम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी दैनिकांची नावे नव्हती. तेव्हा त्याबद्दल विचारणा केली असता तळवलकरांचे उत्तर होते, 'कधी काळी ही वृत्तपत्रे वैचारिक व्यासपीठे होती. आज ती तशी नाहीत.' मग मी परत मेल पाठवला. त्यात म्हटले 'ही वृत्तपत्रे ज्या काळापर्यंत तुम्हाला वैचारिक व्यासपीठे वाटतात त्या काळापर्यंत लिहा.' असे करण्यामागे माझा उद्देश असा होता, की लेखमालेचे पुस्तक तयार करायचे, तर

लेखांची तेवढी संख्या हवी. माझी सूचना तळवलकर यांनी मान्य केली. दरम्यान डॉ. दाभोलकर यांचे बंधू दत्तप्रसाद दाभोलकर यांचे टीकात्मक पत्र साधनात प्रसिद्ध झाले. त्यातून लेखमाला थांबते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनाच नव्हे तर रा.ग.जाधव यांनाही असे वाटले की अता तळवलकरांना पुन्हा लिहायला सांगणे कठीण आहे. मी पुन्हा मेल पाठवला. त्यातून तळवलकरांचे गैरसमज दूर झाले. आमच्या अपेक्षेप्रमाणे त्यांनी लेखमाला पूर्ण केली. त्यातून 'वैचारिक व्यासपीठे' हे पुस्तक तयार झाले. त्याची विक्रीही उत्तम झाली.

हे सर्व एवढ्या विस्ताराने सांगण्याचे कारण असे, की साधना हे एक विशिष्ट विचारांशी बांधिलकी मानणारे साप्ताहिक आहे. त्या विचारांच्या पलिकडचा वाचक प्रकाशनाच्या पुस्तकांना मिळणे कठीण असते असा सर्वसाधारण समज आहे. परंतु वैचारिकतेची चौकट तशीच ठेवून पुस्तक प्रसिद्ध केले तर त्यालाही वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळतो. त्यासाठी वैचारिकतेला वाचनीयतेची जोड असावी लागते. तळवलकरांमध्ये हा भाग प्रकर्षाने जाणवतो. ते म.टा.चे संपादक असताना महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय वाचकांनी याचा अनुभव घेतला होता. 'वैचारिक व्यासपीठे' या पुस्तकाच्या निमित्ताने तळवलकरांचा 'वाचस्पती' रूपाचा आम्ही अधिक चांगला उपयोग करून घेतला असे मी अभिमानाने नमूद करीन. आपली भूमिका पारदर्शक असेल तर समोरची व्यक्ती कितीही मोठी असली तरी तिला आपण भूमिका पटवून देऊ शकतो याचा मला विश्वास आहे.

नोकरशाहीचे रंग- ज्ञानेश्वर मुळे, नक्षलवादाचे आव्हान- देवेंद्र गावंडे ही आमची अलिकडच्या काळातील पुस्तके चांगली खपली. विषय क्लिष्ट असूनही त्यातला नेमका कोणता मुद्दा घ्यायचा त्याबद्दल लेखकाला योग्य सूचना केल्यास लेखक आमच्याकडे त्याप्रमाणे लिखाण करतो. गावंडे यांचे नक्षलवादाबद्दलचे लेख ते ज्या वर्तमानपत्रात काम करतात - त्यापेक्षा साधनातील त्यांचे लेख जास्त गाजले. शेवटी वर्तमानपत्राची चौकट आणि आमच्या अधिक खुलेपणाच्या अपेक्षा यात फरक पडतो.

साधनाने थेटपणावर भर दिला तो वाचकांना भावला. कमीत कमी बंधने टाकून लेखकाला मोकळेपणाने लिहू दिले तर त्यातून विषय चांगला उतरतो. वाचकांना प्रतिक्रिया पाठवण्याचे आवाहन करावेच लागत नाही. तसा साधनाचा वाचक प्रगल्भ असल्याने तो त्याला खटकणारा मुद्दा लगेच मांडतो. त्यातून लेखकाला दिशा मिळते. त्याचे पुढचे लेख आणखी टोकदार होतात. यामुळे मी लेखक-वाचक यांच्यातील संवाद जास्त महत्त्वाचा मानतो.

'शाळाभेट'च्या(नामदेव माळी), दीड वर्षात १३ हजार प्रती संपल्या. 'कवाडे उघडताच'(प्रतिभा भराडे) या पुस्तकाच्या अडीच वर्षांत ६ हजार तर 'माझी काटेमुंढरीची शाळा' (गो.ना. मुनघाटे) या पुस्तकाने तीन वर्षांत अकरा हजार प्रतींचा आकडा ओलांडला. व्यावसायिक प्रकाशकांची एक हजार प्रतींची आवृत्ती संपवताना दमछाक होते. मग प्रकाशन विभाग बंद करायला निघालेल्या साधनाचे हे यश काय सूचित करते? आमचे विषय गंभीर, लेखन फारसे परिचयाचे नाहीत. वर्गणीदार जेमतेम पाच ते सहा हजार. आणि आधी म्हटल्याप्रमाणे विक्रीची सक्षम यंत्रणा नाही. असे असूनही आमची पुस्तके वेगाने खपतात. याची कारणे अशी संभवतात की आजूबाजूच्या राजकारणात-समाजकारणात बरीच गोंधळाची परिस्थिती असताना एखादी रचनात्मक गोष्ट, विचार लोकांच्या समोर आल्यास त्यांना तो आवडतो. आम्ही नेमके हेच केले. मजकूर तयार असल्याने, मोठा नफा कमावण्याचा उद्देश नसल्याने माफक किंमत ठेवणे आम्हाला शक्य होते. या किमतीच्या पलिकडे जाऊन आम्ही सवलत देत असतो. त्याला नवा मध्यमवर्गीय वाचक प्रतिसाद देतो. संस्थात्मक खपाच्या बरोबरीने व्यक्तिगत वाचकांकडून आमची पुस्तके खरेदी केली जातात, याची नोंद व्हावी.

साधनाच्या पुस्तकनिर्मितीत आम्ही आणखी काही नवीन गोष्टी केल्या. प्रत्येक पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार करण्यासाठी चित्रकार एकच ठेवला व लेखासोबत वर्तमानपत्र, साप्ताहिकाप्रमाणे इंट्रो छापले. जेथे शक्य असेल तेथे फोटोंचा वापर केला. यामुळे पुस्तकात दृश्यात्मकता आली. विषयाचा रुक्षपणा घालवण्यास याचा उपयोग झाला. साधेपणा कल्पकतेने वापरण्यास त्याचा उपयोग होतो. पुस्तकांचा खप वाढू लागला की त्या प्रकाशनाकडे हस्तलिखितांचा ओघ वाढतो. त्याप्रमाणे आमच्याकडेही आता विचारणा होऊ लागल्यात. परंतु सध्या तरी कॉलमचे पुस्तक करण्यावर आमचा भर आहे. त्यातही आम्ही एक असा प्रकार करतो, की विशेष लेखनवृत्ती देऊन एखाद्या सामाजिक भान असलेल्या कार्यकर्त्याकडून एखादा विषय साधनासाठी लिहवून घेतो. नंतर त्याचे पुस्तक करतो. राजा शिरगप्पे यांचे ईशान्य भारतावरील पुस्तक याच प्रकारातील आहे. एखाद्यावेळेस असा प्रकार फसतोसुद्धा. पण त्याची तयारी ठेवावी लागते.

थोडक्यात असे आहे, की पुस्तकनिर्मितीत, विक्रीत आधुनिकता हवीच. पण तेवढेच पुरेसे नाही. तुमची झोकून देण्याची वृत्ती, बांधिलकी तेवढीच महत्त्वाची असते. असे भारावून जाऊन संपादक-लेखकांनी काम केले तर त्याला वाचकांचा प्रतिसाद मिळतो.

**- विनोद शिरसाठ**
साधना प्रकाशन
४३१, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०
दूरध्वनी : ०२०-२४४५९६३५
भ्रमणध्वनी : ९८५०२५७७२४
sadhana@gmail.com
Web : weeklysadhana.com

# आधुनिक तंत्र व संपादकीय कौशल्याचा मिलाफ

रोहन चंपानेरकर

माझ्याच नावाचे आमचे रोहन प्रकाशन. या व्यवसायातील अनेक गोष्टी मी लहानपणापासून पाहत आलेलो आहे. व्यवसायाचा भाग घरात अजिबात बोलायचा नाही अशी 'शिस्त' आमच्याकडे कधीच नव्हती. उलट माझे वडील प्रदीप चंपानेरकर नव्या पुस्तकाचे विषय, छपाई, कामातील अनुभव, लेखकाचे लिखाण इत्यादी सर्वच गोष्टी घरात बोलायचे. इतकेच काय, पुस्तकाच्या मुखपृष्ठाची चर्चा ते आमच्याशी करायचे. पुस्तकाच्या मागच्या पानावरचा मजकूर बरोबर वाटतो का, हे विचारायचे. अर्थात त्यांचा निर्णय योग्य असायचाच. तरी ते आम्हाला दाखवायचे, विचारायचे हा संस्कार खूप महत्वाचा होता.

मी इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर होऊन एका आय.टी. कंपनीत चार-साडे चार वर्षे चांगली नोकरी केली. तिथे काम चांगले होते. पगारही गलेलठ्ठ होता. असे असूनही ती स्थिर नोकरी सोडून स्वत:च्या खुशीने घरच्या प्रकाशन व्यवसायात आलो. यासाठी वडिलांनी माझ्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण आणले नव्हते. 'तुला काय करायचंय हे तुझे तू ठरव' अशी त्यांची पूर्ण मोकळीक होती. मी सुद्धा एकदम व्यवसायात आलो नाही. सुरुवातीला दोन-अडीच वर्षे दर शनिवार-रविवार येथे प्रकाशनाच्या कार्यालयात बसून व्यवसायातले बारकावे शिकत गेलो. माझ्या नोकरीतल्या कोणत्या गोष्टी व्यवसायात आणता येतील याचा विचार करू लागलो. तेव्हा माझ्या असे लक्षात आले, की व्यवसायाचे व्यवस्थापन, कामाचे नियोजन आणि काम करण्यातील शिस्त यातील गोष्टींकडे प्रथम लक्ष द्यायला हवे. त्यानंतर प्रगत माहिती-तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल याचा विचार सुरू झाला. पुस्तकांच्या प्रतींचा हिशोब, कार्यालयीन जमाखर्च यातील हाताच्या नोंदींची जागा संगणकाने घ्यायला हवी. त्याप्रमाणे संगणकाचा वापर वाढवून कार्यालयीन कामात अचूकता आणली.

परंतु एवढे पुरेसे नव्हते. बाजारपेठेत काय चाललेय, गावोगावी निर्माण होणाऱ्या नव्या वाचकांच्या काय अपेक्षा आहेत हे जाणून घेणे आवश्यक होते. त्यासाठी मी फिरायला सुरुवात केली. पुस्तक प्रदर्शनात वाचकांशी संवाद साधू लागलो. 'क्रॉसवर्ड'सारख्या प्रदर्शनापासून दिल्लीच्या प्रगती मैदानावरील जागतिक प्रदर्शनापर्यंत सगळीकडे मी जायचो. विक्री-पद्धतीचे, स्टॉलच्या मांडणीचे निरीक्षण करायचो. प्रदर्शनात पुस्तकांची मांडणी महत्त्वाची असते हे मला समजत होते. 'रोहन'चा पाककलेवरच्या पुस्तकांचा वैशिष्ट्यपूर्ण असा विभाग आहे. अशा पुस्तकांमध्ये मुखपृष्ठावरील फोटो आणि पुस्तकाचे शीर्षक यात प्रमाणबद्धता असावी लागते. मुखपृष्ठासंबंधात संगणकाचा वापर करून अतिशय नाविन्यपूर्ण अशा आकृत्या, रंगसंगती तयार करता येतात. त्यासाठी मुखपृष्ठकाराबरोबर बसून वेगवेगळ्या पर्यायांची चर्चा करावी लागते. पुस्तक पाहिल्याबरोबर वाचकाला ते हातात घ्यावेसे वाटायला हवे. मी केलेला, असे म्हणण्यापेक्षा मी प्रकाशनात आल्यानंतर झालेला आणखी एक बदल म्हणजे आम्ही संपादकीय विभाग वाढवला. आजचे बदलते जग लक्षात घेऊन मराठी प्रकाशन व्यवसायातही आता स्वतंत्र संपादक बाळगण्याचा विचार बळावू लागलाय. केवळ नवे विषय हुडकणे नव्हे तर ते विषय समजदारीने लिहू शकतील असे लेखक शोधणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. यामध्ये केवळ पगारी संपादक बाळगणे पुरेसे नसते. सुनिल कर्णीक यांच्यासारखे अभ्यासू, मेहनती संपादक वेगवेगळ्या प्रकाशकांसाठी पुस्तकांचे प्रस्ताव तयार करत असतात. येणारी हस्तलिखिते योग्य वेळेत मार्गी लावणे हे एक प्रकाशनातले प्रमुख कार्य असते. त्याची व्यवस्था लावण्यावर माझा सध्या भर आहे. कारण चांगले हस्तलिखित जास्त काळ अनिर्णित अवस्थेत राहणे योग्य नाही असे मला वाटते. तसा आमचा पुस्तक निर्मितीचा वेग मर्यादित असतो. कारण भरमसाठ संख्येने पुस्तके साठून राहिल्याने भांडवल प्रवाही राहत नाही.

व्यक्तिमत्त्व विकास हा आजच्या तरुण पिढीसमोरील कळीचा मुद्दा आहे. इंग्रजीमध्ये या विषयावर अनेक बाजूंनी लिखाण केले जाते. मराठीत अशी पुस्तके तयार करताना इथल्या परिस्थितीचा विचार करावा लागतो. आपल्या देशाच्या नव्हे तर राज्याच्या स्थानिक समस्या, विषय यांचा विचार करून, वेगवेगळ्या भागातील तरुणांची गरज लक्षात घेऊन नव्या पुस्तक निर्मितीचे वेगवेगळे प्रयोग करण्यावर माझा भर आहे. बदलती जीवनशैली, नवीन माध्यमे, सामाजिक स्पंदने आणि तंत्रविज्ञानातील नवे शोध यांची

माहिती घेण्यासाठी मी केवळ वर्तमानपत्रे, नियतकालिके, पुस्तके यांच्यावर अवलंबून राहत नाही. मी वेगवेगळी संकेतस्थळे, साईट्स शोधतो, पाहतो. त्यातून पुस्तक निर्मितीच्या नव्या कल्पना सुचतात. त्यांची वडिलांशी चर्चा करतो. तेही काही दुरुस्त्या सुचवतात. सूचना करतात. त्यानुसार पुढचे बदल करतो.

आता मराठी प्रकाशन व्यवसायात 'इ-बुक्स'चा जमाना चालू झालाय. याचे भान ठेवून आम्ही त्यादृष्टीने प्रयत्न चालू केलेत. पुस्तके ही 'रीडर फ्रेंडली' असावीत असे मला वाटते. एखादा क्लिष्ट विषयसुद्धा सोप्या पद्धतीने मांडता येतो. आकृत्या, चित्रे यांच्यापेक्षा फोटोंचा वापर करावा. नेत्रसुखद काय आहे याचा विचार करावा. याच प्रकाराने मी जेव्हा नव्या बालवाङ्मयाचा विचार करू लागलो तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर राजीव तांबे यांचे नाव येते. त्यांच्या 'पिवळे भूत' या पुस्तकाच्या निर्मितीत आम्ही असेच रंगसंगतीचे नवे प्रयोग केले. त्याला बालवाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

नोकरीत जेवढा पगार मिळायचा तेवढाच प्रकाशन व्यवसायातून मिळतो का, असा मर्यादित विचार करून चालत नाही. एखादे पुस्तक थोडे कमी खपेल, परंतु ते तुमच्या प्रकाशन संस्थेला नाव मिळवून देणारे असेल तर त्याचा फायदा जास्त असतो. कारण त्यामुळे आणखी चार जास्त लेखक तुमच्याकडे येतात. याचे समाधान पैशांपेक्षा जास्त आहे. यालाच मी तंत्रविज्ञानाकडून मानवी चेहऱ्याकडे वाटचाल असे म्हणेन. तसे झाले तर रोहनने प्रकाशनाचे नाव आणखी 'रोशन' केले असे तरी लोक म्हणतील!

**शब्दांकन – रमेश दिघे**

भ्रमणध्वनी : ८३०८१४२४३६


## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रसिद्ध विचारसंचित

**मराठी ग्रंथविश्वातील अपूर्व घटना!**

**आमचा बाप आन् आम्ही नाबाद १,६०,००० प्रती**




**मूळ किंमत १२० रुपये**
**सवलतीत ८० रुपये**
**टपालखर्च २० रुपये**

**'लसावि–माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' या ग्रंथामध्ये नरेंद्र जाधवांच्या विचारांची झेप, त्यांचे समृद्ध अनुभवविश्व–व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक– त्यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा झपाटा यांचा 'प्रोमो' वाचायला/पाहायला मिळतो.**




**जनआवृत्ती मूळ किंमत ४०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**
**टपालखर्च २० रुपये**

**डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या 'बोल महामानवाचे' आणि 'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी**

**'रवींद्रनाथ टागोर' – डिलक्स आवृत्ती संच मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत अधिक टपाल खर्च १०० रु.**









# शुद्ध हेतूने तंत्रशुद्ध!

## डॉ. सतीश देसाई

'पुण्यभूषण फाउंडेशन' ही आमची संस्था गेली पंचवीस वर्षे पुण्यात सांस्कृतिक महत्त्वाचे उपक्रम राबवत आहे. याशिवाय गणेश उत्सवानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या पुणे फेस्टिव्हलमध्ये माझा प्रथमपासून महत्त्वाचा सहभाग आहे. याप्रकारे सुमारे तीस वर्षे मी पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात वावरत आहे. या दीर्घ कालावधीच्या सार्वजनिक सहभागामुळे मी सर्वसामान्य पुणेकरांचा विश्वास संपादन करू शकलोय. डॉ. देसाई जे करतील ते उच्च दर्जाचे, भव्यदिव्य असेच असेल असा लोकांना भरवसा वाटतो. आमच्या पुण्यभूषण संस्थेने २०१० साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजकत्व स्वीकारले ते पुणेकरांच्या या विश्वासाच्या जोरावरच!

आमचे पुण्यभूषण फाउंडेशन आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ८३ व्या साहित्य संमेलनाचे आयोजन करायचे ठरवले तेव्हा आम्ही पहिला निर्णय घेतला की हे संमेलन हायटेक करायचे. 'हायटेक' म्हणजे उच्च तंत्रज्ञानाचा पूर्ण वापर. संमेलनासाठी एक कोटीहून अधिक निधी जमा होऊ लागल्यापासून दिमाखदार, भव्यदिव्य संमेलने साजरी व्हायची. पण तो फक्त दिखाऊ भपका असायचा. संमेलनाच्या संदर्भात 'हायटेक' हा शब्द आम्हीच प्रथम प्रचारात आणला. 'आमचे संमेलन हायटेक असेल' असे मी जाहीरपणाने सांगितले तेव्हापासून पुण्यात हायटेक संमेलनाची चर्चा सुरू झाली. संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन पुण्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी सुद्धा संमेलन हायटेक व्हावे अशीच इच्छा प्रदर्शित केली. या उच्च तंत्रज्ञानाच्या वापरासाठी खर्चही तसाच येणार याची कल्पना असल्याने महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात होणाऱ्या या संमेलनासाठी शासनाने पन्नास लाख रुपये द्यावेत अशी सूचनाही अजितदादांनी केली. इतकेच नव्हे, तर या संमेलनासाठी एक कोटी रुपये निधी जमा करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. याच्याच जोडीला पुणे महापालिकेने संमेलनाचे सहप्रायोजकत्व स्वीकारून ५१ लाख रुपये दिले. याशिवाय आमच्या ८३ व्या संमेलनाच्या आधी जी ८२ संमेलने झाली त्यांची स्मृती जागवण्यासाठी आम्ही त्या संमेलनांची, त्यांच्या अध्यक्षांची माहिती देणाऱ्या ८२ कमानी शहरभर उभारण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक कमानीसाठी एक लाख रुपये प्रायोजकाकडून घेण्याचे ठरवले. संमेलनात प्रत्येक सामान्य पुणेकराचा सहभाग असावा यासाठी 'संमेलनासाठी माझे दहा रुपये' ही अभिनव कल्पना राबवली. त्याला महाराष्ट्र बँकेने सक्रिय सहकार्य केले. अशा विविध कल्पनांचा अवलंब करत आम्ही चांगला निधी जमवला. केवळ हायटेक संमेलनाच्या पाठीमागे न लागता आम्ही संमेलनातील शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी दोन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. मुलांना पतंग उडवायची आवड असते हे ध्यानात घेऊन आम्ही मोठमोठ्या पतंगांवर वेगवेगळ्या पुस्तकांची रंगीबेरंगी मुखपृष्ठे चिकटवली. यामुळे 'ययाती', 'स्वामी', 'उपरा', 'व्यक्ती आणि वल्ली' अशी मराठी पुस्तके आणि त्यांचे लेखक मुलांना समजले. सोबत त्यांनी पतंग उडवण्याची मौज लुटली ती वेगळीच. 'एक शाळा एक लेखक' या उपक्रमात विद्यार्थ्यांनी एका लेखकाशी चर्चा करायची, निबंध, वक्तृत्वस्पर्धा घ्यायच्या. शाळेला लेखकांनी भेट द्यायची. विद्यार्थ्यांनी मशाल मिरवणूक काढायची असे या उपक्रमाचे स्वरूप होते. यामुळे शहरभर संमेलनाची वातावरणनिर्मिती चांगली झाली.

संमेलनाला आलेल्या लेखक-पाहुण्यांची आम्ही उत्तम बडदास्त ठेवली. त्यांच्यासाठी खास वाहनव्यवस्था ठेवली. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी हे अलिकडेच पुण्यात वास्तव्याला आले. त्यांच्या दिमतीला आम्ही मर्सिडीज गाडी दिली. त्याबद्दल काहीजणांनी आमच्यावर टीका केली. परंतु मी म्हणतो, की आमच्या साहित्यिकांनी चार दिवस ऐषोआरामात राहिले तर बिघडले कुठे? शेवटी ते आहेत म्हणून तर साहित्यसंमेलन आहे. मग त्यांच्या आदरातिथ्यावर चार पैसे जास्त खर्च केले तर बिघडले कुठे? केवळ साहित्यिकच नव्हे तर संमेलनासाठी आलेल्या प्रतिनिधींची राहण्या-जेवण्याची आम्ही उच्च दर्जाची सोय ठेवली.

८३ वे साहित्य संमेलन हायटेक करण्याचा निर्णय आम्ही घेतल्यावर पहिला मुद्दा होता, की त्याची आखणी-आराखडा कोण करणार? हा विचार चालू असताना पहिले नाव डोळ्यांसमोर आले ते एम.के.सी.एल. अर्थात 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळा'चे

व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांचे. भारतात संगणक युग राजीव गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत सुरू झाले. त्यांच्याच प्रेरणेने डॉ. विजय भटकर यांनी देशातील पहिला सुपर कॉम्प्युटर तयार केला. या अतुलनीय कामगिरीत विवेक सावंत हे डॉ. भटकर यांचे प्रमुख सहकारी होते. याच सावंत यांच्याकडे आम्ही संमेलनाच्या तंत्रज्ञानाची बाजू पूर्णपणाने सोपवली. संमेलन हे आम्हाला पुण्यापुरते मर्यादित ठेवायचे नव्हते. संगणक तंत्रज्ञानाच्या मदतीने ते आम्हाला राज्यभरच नव्हे तर जगभर पोचवायचे होते. महाराष्ट्रातील दहा शहरांशिवाय अमेरिकेतील मराठी मंडळींना आम्ही संमेलनातील चर्चांमध्ये सहभागी करून घेतले होते. नाशिकमधील रसिक चर्चेतील साहित्यिकांना थेट प्रश्न विचारू शकत होता. त्याचवेळी शिकागोमधील मराठीचा अभिमानी ऑनलाईन चर्चेचा आस्वाद घेऊ शकत होता. मी तर असे म्हणेन की एका अर्थाने मराठीतील इ-संमेलनाची सुरुवातच आम्ही केली. अमिताभ बच्चन त्यांचे पिताश्री हरिवंशराय बच्चन यांच्या कविता वाचतात आणि त्याचवेळेला जगभरातील रसिक त्याचा आस्वाद घेतात हा अनुभवच अद्वितीय होता. याशिवाय संमेलनस्थळी उभारलेल्या भव्य पडद्यावर हा कार्यक्रम उपस्थित रसिक श्रोत्यांना पाहता येत होता. संमेलनाला पस्तिशी पुढच्या परिपक्व रसिकांची गर्दी जास्त असते. त्या मानाने नव्या पिढीतील तरुणवर्ग संमेलनाकडे फारसा फिरकत नाही. मात्र पुण्यातील आमचे संमेलन याला अपवाद म्हणायला हवे. रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या कवीसंमेलनापासून अमिताभ यांच्या काव्यवाचनापर्यंत तरुणांची उपस्थिती लक्षणीय होती. त्यासाठी आमच्या पुण्यभूषणच्या कार्यकर्त्यांनी कसून प्रयत्न केले होते. प्रसारमाध्यमांनीसुद्धा हायटेकचा मुद्दा उचलून धरला होता. त्यांनी दिलेल्या प्रसिद्धीने संमेलनाबद्दल तरुणवर्गात कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. एक तर पुण्यात माहितीतंत्रज्ञानाचे वातावरण चांगले आहे आणि माहितीतंत्रज्ञान, संगणक यांच्या साहाय्याने संमेलनाचे कार्यक्रम होणार म्हटल्यावर टेक्नो-सॅव्ही तरुण पिढीने त्याला भरभरून प्रतिसाद दिला.

पुस्तक प्रदर्शनाच्या रचनेचा येथे मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. संमेलनाच्या दोन दिवस आधी पुस्तकांचे स्टॉल्स नावासहित तयार होते. मोठ्या मैदानावर लागलेले पुस्तकांचे स्टॉल्स, संमेलनाला उपस्थित राहणारा प्रत्येक रसिक येथे पायधूळ झटकणार, त्यातून ती पुस्तके खराब होणार; असा कोणताच प्रकार येथे नव्हता. असे हिरवेगार जाड गालिचे पसरले होते की ते पाहूनच मन हरखून जायचे. ऊन येणाऱ्या बाजूला मोठा पडदा लावल्याने प्रदर्शनाच्या स्वयंसेवकांना उन्हाचा ताप सहन करावा लागला नाही. संपूर्ण वातानुकूलित असा पुस्तक प्रदर्शनाचा मंडप होता. सतत कचरा गोळा करत फिरणाऱ्या सेवकांमुळे कागदाचा कपटा कुठे पडलेला दिसायचा नाही. एका बाजूला पुस्तकांचे वैचारिक खाद्य आणि त्याच्या जवळच बाहेरच्या बाजूला खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, पुणेरी पुरणपोळी, बटाटेवडे, अप्पे, पन्हे, थालिपीठे असे खास मराठी पदार्थ इथे होते.

